0-12-0

१

धनुर्धारी रचित

प्रापंचिकांचा पुस्तकसंग्रह.

---

# आतां पुढें काय करावें?

# पैसा कसा मिळेल.

---

महादेव गुर्जर बुकसेलर आणि ...

रामवाडी

मुंबई.

किंमत [illegible] आणे.

# धनुर्धारी.

केसरीपत्रांत **"वाग्बाण"** सोडणारे लेखक **"धनुर्धारी"** यां कडून निरनिराळीं पुस्तकें आह्मीं लिहविलीं आहेत, तीं छापण्य काम चालू आहे. तीं स्वस्त व सत्वर मिळावीं यासाठीं आह्मीं ए लील योजना केली आहे. मूळपासून वर्गणीदार झालें पाहिजे.

धनुर्धारीचीं पुस्तकें हवीं असणारांनीं आमच्या दुकानीं **दोन रु** **आगाऊ** भरावेत. निघालेलीं पुस्तकें देऊन निघतील तशीं पाठव जाऊं व पोस्टेजसुद्धां हिशेब कळवूं.

सदरप्रमाणें दोन रुपये भरणारांस, पुस्तकांवरील किंमतीचा **पाउ णपटीनें** तीं मिळतील. पोस्टेज पडेल. असें नेहमीं चालेल. आग रु. न भरणारांस पुरी किंमत व पोस्टेज.

---

## ह्या सदरांखालीं पुस्तकें निघतात:—

**१ महाराष्ट्रकुटुंबसंग्राह्य पुस्तकावली.**

**२ मुलांचें चिमुकलें पुस्तकालय.**

**३ प्रापंचिकांचा पुस्तक संग्रह.**

**४ कुलवधूंचा ज्ञानकोश**

**जनार्दन महादेव गुर्जर, दुकान** रासवाडी, **मुंबई.**

---

# केरळकोकिळमासिकपुस्तक.

## आगाऊ वर्षाची वर्गणी १॥३ ट. ख. सह.

हा, कोकिळ प्रतिमहिन्यास नेमानें, सुबक, सुरेख व अपूर्व चि दाखवितो. मलबार, इतर प्रांत आणिं देश ह्यांतले अद्भुत, अलौकिक गु व व्यवहार सांगतो. सरळ, सोप्या व रसिक कवितांचा प्रसाद करित नीतिधर्मतत्वांचा उपदेश ठसवितो. लोकोत्तर चमत्कारांचें दर्शन देतो ह्याच्या मनोरंजक व स्फुट गोष्टींनीं हृदयांत गुदगुल्या होतात. हा पुस्तकपरीक्षा निःशंकपणें गुणदोषविवेचनानें सणसणीत करतो. हा अने

व्यवहाराच्या व ज्ञानाच्या गोष्टी सांगत सांगत देशोदेशीं हजारों विद्वान, रसिक, व मार्मिक गृहस्थांच्या घरीं सारखा ६ वर्षे जाऊन भेटत आहे. किती लोकांनीं ह्याला कुरवाळलें आहे, व साधु साधु, धन्य धन्य, ह्मणून स्तुतिपत्रें दिलीं आहेत. हा लहानमोठ्यांबरोबर, बायकामुलांबरोबर अधिकारासारखें बोलतो. असा हा **"केरळकोकिळ"** एक रुपया तीन आण्यांत प्रतिमासीं वर्षभर भेट देतो. हें पुस्तक प्रत्येक महिन्याच्या पंधरा तारखेचे आंत प्रसिद्ध होतें. (१) ह्याचा वर्षारंभ जानेवारीपासून असल्यामुळें केव्हांही मध्यंतरीं वर्गणीदार होणारांस त्या वर्षाचे मागील सर्व अंक पाठवून पुढें सुरू करण्यांत येतें. (२) वर्गणी आगाऊ पाठवावी किंवा **व्हा. पे.** नें पाठविण्यास लिहावें. (३) पत्त्यावरील नंबर पत्रांत, व मनिआर्डर कूपनांत वगैरे दर्शविल्यानें विनचूक काम होईल. (४) किरकोळ अंकाची किंमत ।.

**जनार्दन महादेव गुर्जर, दुकान** रामवाडी, **मुंबई.**

---

# केरळकोकिळ वर्ष ५ वें.

(आवृत्ति २ री, सन १८९१ चे बाराही अंक एकत्र, सुरेख, जाड कापडी पुठ्ठ्यानें बांधलेले.)

ह्यांत निरनिराळीं सुरेख अपूर्व **चित्रें** १३, **अनेक विषय** २५, **कविता** भिन्न भिन्न विषयांच्या व छंदांच्या ६ वेळ, **मलबारवर्णन** ७ वेळ, **लोकोत्तर चमत्कार** १६, अनेक ग्रंथकारांनीं पाठविलेल्या पुस्तकांपैकीं ४४ पुस्तकांची **पुस्तकपरीक्षा** कर्त्यांच्या नांवासह १०, **स्फूट विषय** ४, **नवीन शोध** १०, **किरकोळ** २, आणि **सिंहावलोकन** ह्मणजे सन १८९१ मध्यें जगांत घडलेल्या **ठोकळ गोष्टीं**ची थोडक्यांत तारीखवार अनुक्रमणिका, **हरपलेलीं नररत्नें** आणि शेवटीं **संवत्सरमाहात्म्य,** यांत हिंदुस्थानच्या लोकांस १८९१ चें साल कसें काय सुखासमाधानांत गेलें ह्याचा थोडक्यांत विचार केला आहे. **किंमत १॥ रु. ट. ख.** ०≡. व्हा. पे. पाठवूं.

---

सचित्र

# लोकोत्तर चमत्कार.

प्रथमशतक–भाग १ ला.

किंमत ·॥≈ आणे, ट. ख. ८≈.

श्वेतगज, शिंगाचीं माणसें, १५ शें रुपयांचें पुस्तक, पिपांत राहाणारा मनुष्य, बर्फाचा वाडा, चित्तविभ्रम, जलबिंदूतील चर्मचक्षूस अगम्य असे सूक्ष्म प्राणी, तारवातमी, पक्ष्यादिकांचें युद्ध, बुद्धाचा दांत, दगडाच्या नद्या, राक्षसी गुलाब, मुंग्यांचा राक्षस, भविष्याचे टोकताळे, नरमांसभक्षक लोक, २१ शें वर्षांचा वटवृक्ष, विजातीय कुत्रा, २२०॥ रुपयांचा शब्द, विमान, बर्फात गढलेली बाई, खरा शूर, झाडावर चढणारे मासे, पूर्वयुगांतील प्राणी, स्वप्नसृष्टि, हातभर उंचीचीं मनुष्यें, याप्रमाणें चित्तवेधक उपयुक्त करमणुकीचें साधन आहे.

---

# मुलांची स्मरणवही.

**किं० ८≡ आणे. ट. ख. ८॥·**

**रावबहादूर महादेव गोविंद रानडे** ह्यांचा अभिप्राय:—
पुणें, तारीख २५।६।९१.

रा. रा. दत्तो कृष्ण सांडू मुक्काम मुंबई, यांस साष्टांग नमस्कार वि० वि० तुमचें पुस्तक समग्र वाचून पाहिलें. पुस्तकाचें नांव 'मुलांची स्मरणवही' यापेक्षां 'मुलांना उपदेश' हें दिलें असतें तर बरें झालें असतें. पुस्तक लहान मुलांच्या फार उपयोगी आहे. व तें सर्वांनीं संग्रहीं ठेवण्यासारखें आहे. त्यांतील भाषा साधी व मुलांना समजण्याजोगी आहे. कळावें हे विनंति.

**रानडे.**

---

**जनार्दन महादेव गुर्जर**, रामवाडी, **मुंबई.**

धनुर्धारी रचित

प्रापंचिकांचा पुस्तकसंग्रह.

# आतां पुढें काय करावें?

# पैसा कसा मिळेल.

हें पुस्तक,

जनार्दन महादेव गुर्जर,

रामवाडी-मुंबई, ह्यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

अक्टोबर सन १८९२ इ.

( सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत ८ आणे.

# प्रस्तावना.

या जगांत आपलें पाऊल पडल्यानंतर कांहीं काळपर्यंत आपणांस सर्वस्वी दुसऱ्यावर अवलंबून राहवेंच लागतें; तें कधीं चुकत नाहीं. आपल्या वयाच्या सहाव्या वर्षापर्यंत आपणांला हवें काय आणि तें मिळवावें कसें हें कळत नाहीं; एवढेंच नव्हे, तर, आपलें काम आपणांस कांहींएक करितां येत नाहीं. अमुक झालें, अमुक होतें किंवा अमुक पाहिजे, आणि त्याप्रमाणें हवें तें मिळालें नाहीं व तसें झालें नाहीं ह्मणजे जिवास होणारें दुःख आईबापांस रडून दाखवावें या पलीकडे त्या वेळीं कांहींएक आपणांस करितां येत नाहीं. आपल्याला काय हवें, आपलें कोठें काय व कसें बिघडलें इत्यादिकांची चांगली नीट चौकशी करून अडचण व दुःख हीं नाहींशीं होऊन सुख वाटेल असें करण्यांत अहर्निश झटणारीं व झटण्यांत सुख मानणारीं अशीं धन्य व ईश्वरासमान आईबापें असतात तीं होतां होईल तितकें करून आपल्यास कोठें कांहीं कमी पडूं देत नाहींत. ह्मणजे आमचें **शिशुपण** आह्मांस नकळत आईबापांच्या अनुग्रहानें, सुखासमाधानांत निघून जातें. पुढें बालपण येतें त्या वेळीं आह्मांस स्वतः आपापलीं कामें करितां येण्याला अत्यावश्यक अशीं साधनें आह्मीं आपण होऊन मिळवावींत अशा हेतूनें आमच्या पाठीमागें, तीं आमचीं आईबापें उद्योग लावून देतात. आपणांस ज्या उद्योगांत यश मिळालें किंवा ज्या उद्योगानें आपला संसार चालला आहे, अथवा जो उद्योग मुलांस फायदेशीर होऊन आपल्या नांवालौकिकास शोभेसा होईल तो शिकविण्याकडे आईबापांची साहजिक प्रवृत्ति असते. काम, उद्योग किंवा धंदा करण्याचें सामर्थ्य यावें ह्मणून प्रयत्न करण्याची वेळ

आली कीं, आईबापें ती सहसा टळूं देत नाहींत, त्यांत हयगय करीत नाहींत किंवा त्या संबंधानें स्वतःस पडणाऱ्या श्रमाकडे तीं काडीमात्र पहात नाहींत. आपला उद्योग आपल्या पोरांबाळांस केव्हां एकदांचा शिकवून संरक्षणाचा भार त्यांचा त्यांच्यावर टाकूं अशा प्रकारची साहजिक प्रवृत्ति पशुपक्ष्यादिकांतही ढळढळीत दिसून येते; मग ती मनुष्यांत कशी असणार नाहीं ? अर्थात असलीच पाहिजे. आणि असते ह्मणूनच तर, सुतार आपल्या मुलाच्या हातांत किकरें देईन, लोहार घण ठेवीन, शिंपी सुई देईन, कुंभार माती तुडवावयास लावीन, परीट कपडे बडवावयास लावीन आणि **पांढरपेशा** दऊत लेखणी हातीं देईन असें इच्छित असतो. जगाच्या राहटीस अनुसरून प्रपंच सुरळीत चालण्यासाठीं अनेकांस अनेक धंदे करावे लागतात. गंवडी, मजूर, पाथरवट, सुतार, लोहार, शिंपी, परीट, सोनार, वाणी, सावकार, भट, पुरोहित, वकील, वैद्य, गुरु, कारकून इत्यादि लोकांचे यच्चयावत् धंदे, व ते धंदे करणारे लोक मनुष्यमात्रांच्या वसाहतींत असणें अत्यावश्यक आहे. धंद्यांतल्या धंद्यांत दोन प्रकारचे मोठे भेद असतात. एक शारीरिक व दुसरा मानसिक. शारीरिक ह्मणजे शरीराच्या सामर्थ्यावर सिद्धीस जाणारे व मानसिक ह्मणजे मनाच्या श्रमानें सफल होणारे धंदे. कामकरू मजूर ह्मणजे शारीरिकश्रमाची पराकाष्ठा आणि न्यायाधीश ह्मणजे मानसिकश्रमाची कडेलोट. शारीरिकश्रमाला मोल थोडें असून मानसिकश्रमाला फार असतें. हें खरें आहे, पण, राष्ट्राची संपत्ति वाढते ती शारीरिकश्रमाच्या योगानेंच. शारीरिकश्रमांत मानसिकश्रमाचा मिलाफ झाला ह्मणजे ईश्वरनिर्मित पंचमहाभूतांस बंदे गुलाम करून त्यांजकरवीं काम कसें करून घेतां येतें, त्यांच्या अद्भुत शक्तीनें थक्क करून सोडणारी राष्ट्रीयसं-

पत्तीची वाढ कशी होते वगैरे गोष्टी सांगत बसण्याचें हें स्थळ नव्हे. तथापि एवढें मात्र खरें आहे कीं, शारीरिकश्रमाची योग्यता हल्लीं आह्मी समजतों इतक्या हलक्या प्रतीची नाहीं; एवढेंच नव्हे, तर आहे त्याजपेक्षां किती तरी पट जास्त मानास्पद, जास्त हितावह व जास्त संतोषकारक खचीत आहे! मानसिकश्रम करणाऱ्यांस शारीरिक मेहनत कमी पडते, व शारीरिकश्रमाच्या मानानें त्यांस वेतन जास्त मिळतें आणि त्याचा प्रभावही दिपवून टाकण्यासारखा असतो; यामुळें उठल्यासुटल्याचा ओढा मानसिकश्रम करण्याकडे धांवत असतो! वकील, वैद्य, गुरु, न्यायाधीश आणि मंत्री हे श्रेष्ठ मानसिकश्रमाचे व जास्त फायद्याचे धंदे होत.

अभ्यासानें विद्येंत पारंगतता येते आणि विद्येनें धंदा चालवितां येतो. मानसिकश्रमाचा अभ्यास निराळा; आणि त्या अभ्यासाची विद्या निराळी. मानसिकश्रमाच्या धंद्यांत मनास कमवावयाचें असतें आणि शारीरिकश्रमांत शरीराला तरबेज करावयाचें असतें. लिहिणें, वाचणें, गणित, तर्क वाढविणें, त्याचा शोध, खऱ्याखोट्याची निवडानिवड; कार्यकारणांचा बंध जुळवून अनुमान बसविणें वगैरे कामें मानसिकश्रमाचीं होत. त्याचप्रमाणें हस्ताचें कौशल्य, सामर्थ्याचा जोर इत्यादि शारीरिकश्रमाचीं कामें आहेत. शरीर व मन हीं भिन्न असणें शक्य नाहीं, त्याचप्रमाणें शारीरिक व मानसिकश्रमाच्या मिलाफानें कोणतेंही काम फायदेशीर व सुखावह व्हावयाचें नाहीं हें अशक्य होय. मानसिकश्रमाला शारीरिकसामर्थ्याचें साहाय्य नसेल तर ते श्रम केवळ व्यर्थ होत. तसेंच शारीरिकश्रमांत मानसिकश्रमाची भर पडली तर त्या श्रमाचें चीज फारच सुरेख होईल हें सांगणें नको. परंतु दुर्दैवानें मानसिकश्रमांत प्रावि-

ण्य मिळवूं इच्छिणाऱ्यांस शारीरिकश्रमाची पर्वा फारशी वाटत नाहीं, आणि शारीरिकश्रम करणाऱ्यांस मानसिकश्रमाची लालसा नाहीं किंवा ते करण्याविषयीं अनुकूलता नसते यामुळें स्वतः ज्यांचें त्यांचें नुकसान होतें; नुकसान ह्मणजे मिळविलेलें जाणें असें नव्हे, तर अजी मिळतच नाहीं; आणि प्रसंगविशेषीं पोट भरण्याची (शरीर व मन एकत्र ठेवण्याची) भ्रांत पडते. इतकें होतें आणि त्यामुळें राष्ट्राच्या उन्नतीस फार अडथळा येतो. ही गोष्ट केव्हां या उभयतांस—ह्मणजे शारीरिक व मानसिक श्रम करणाऱ्यांस–कळेल ती कळो ! ती कळे तोंपर्यंत व कळून, खात्री होऊन, पूर्वप्रकार बदलून सुरळीत चाले तोंपर्यंत त्या त्या श्रमाच्या काम करणाऱ्यांस त्यांच्या त्यांच्या कामासंबंधानें योग्य व चांगली दिशा लागेल असा मार्ग दाखविला पाहिजे. ह्मणजे आपण आपला धंदा कसा करावा, त्या धंद्याचा प्रसार कसा होईल, त्या धंद्यांत यशप्राप्ति साधावयाची तर काय केलें पाहिजे, कोणते मार्ग पत्करावेत वगैरे सांगणें आवश्यक आहे. लिहिणें, वाचणें हीं मानसिकश्रमांतलीं कामें. लिहिलेलें वाचलें ह्मणजे माहीत नाहीं, कळत नाहीं किंवा समजलेलें नाहीं अशा गोष्टींची माहिती होते समज पडते. आणि असें होणें ह्मणजे समज पडणें व माहित होणें—शारीरिक व मानसिकश्रमवाल्यांस अत्यावश्यक आहे परंतु शारीरिकश्रम करणाऱ्यांस आपल्या धंद्यासंबंधानें माहिती करून घेण्याचें सुलभ व सवंग साधन असें जें लेखन, वाचन तें अद्याप साध्य झालें नाहीं. तेव्हां आपणांस जें काय 'सांगावयाचें, जी काय दिशा दाखवावयाची ती प्रथमतः मानसिकश्रम करणाऱ्यांपुढेंच दाखविली पाहिजे. शिवाय हल्लींच्या काळांत मानसिकश्रम करण्यासाठीं अभ्यास करून, व विद्या संपादून तयार असलेल्या अनेक तरुणांची स्थिति अगदीं भांबावून गेल्यासारखी–

कांहींएक सुचत नाहीं अशी–होऊन जाते व ज्या विद्येनें पोट कसें भरावें, संसार कसा चालवावा, सुखकारक अशा स्थितींत कालक्रमणा कशी करावी, सत्संगति आणि सद्गुण या योगानें सत्कार्यांत कालक्षेप कसा करावा आणि आपणांस जन्म दिलेल्या, आपणांस पोसलेल्या, आपणांस चार अक्षरें शिकविलेल्या, ईश्वरासम किंवा ईश्वरच अशांच्या उपकारऋणांतून अंशतः कसें उतराई व्हावें हें समजावयाचें. ती विद्या संपादून, त्यांत प्राविण्य मिळवून सुद्धां अखेरीस अन्न कसें मिळेल, वस्त्र कसें संपादूं, कोणाचें आर्जव करूं, कोणाच्या द्वारांत जाऊं, काय करूं, कसें वागूं, अशा खडतर व आरंभींच्या विवंचनेंतच सारा वेळ जातो. कांहीं सुचत नाहीं, कांहीं कळत नाहीं, व ज्यांना, आपण अनेक त्रास व अनेक संकटें आजवर दिलीं त्यांसच आणखी जास्त– पूर्वीपेक्षां दुप्पट–क्लेश व विवंचना देण्यास कारणीभूत होतों. त्यामुळें आपला आपणास व दुसऱ्यास उपयोग नाहीं, अशी स्थिति येते. इंग्रजी साम्राज्यांत विद्या, विद्यालयें, व विद्यार्थी यांचा प्रसार सुरू झाला, पण तो व्हावा इतका अद्याप झाला नाहीं, झाला आहे तो रुपयांतला एक पैसा या प्रमाणाचा आहे. अद्याप सर्वत्र प्रसार होणें आहे, तो झाला पाहिजे व तो खास होईल असें असून 'प्रथमग्रासेमक्षिकापातः' याप्रमाणें आतांच या विद्वान् लोकांस अशी व इतकी पोटाची पंचाईत कां पडावी हें कळत नाहीं. विद्याप्रसारास आरंभ नुक्ताच झालेला, आणि या अशा वेळेंत व स्थितींत विद्वानांची किंमत मजूरांपेक्षांही कमी व्हावी हें त्या विद्वानांचें, त्यांस विद्वान् करणारांचें, त्यांस प्रसवून पालनपोषण करणारांचें व अखेर त्यांच्या देशाचें दुर्दैव होय ! घरांत झाडलोट करणारा यःकश्चित गडी मोठ्या दिमाखानें दरमहा सहा रुपये मागतो आणि आमचे विद्यासंपादन

केलेले आणि विद्या शिकविण्याची योग्यता असणारे व शिकविण्याचें काम पत्करणारे आपणांस एक रुपया मिळेल तर पुरे ह्मणून मिनतवारीनें चाकरी पत्करतात ! स्टेशनावरील हमाल महिन्याकांठीं २५।३० रुपये कंबरेला खोंवतो आणि आमचे आंग्ल-कलापारंगत ( बी. ए. ) विद्वान् वीस दिलेत तरी पुरे असें ह्मणतात, वगैरे हरहमेश दृग्गोचर होणारे प्रकार कागदावर नमूद करणेंच मोठ्या शर्मेचें असें प्रस्तुत लेखकास वाटतें. ह्मणून थोडक्यांत तो एवढेंच ह्मणतो कीं, रत्नें कोंड्यावारी विकूं लागलीं आणि कोंड्याला रत्नाचें मोल—मात्र योग्यता नाहीं—येऊं लागलें असा प्रकार झाला आहे. आतां साखर सवंग झाल्यानें तिची गोडी कमी होत नाहीं, त्याप्रमाणें सवंगाईमुळें विद्वत्तेची किंवा विद्वानाची योग्यता कमी होणें नाहीं ही गोष्ट खरी; परंतु त्यांतल्यात्यांत विचार ह्मणून एवढाच पहावयाचा कीं, असा प्रकार तरी, कां व्हावा ? पोटापाण्याची सोय विद्वानाला विद्या संपादून कळूं नये याचा अर्थ काय ? मनुष्यपणाला श्रेष्ठता येईल अशी सामुग्री जय्यत असून गुलामगिरी पत्करण्यास तयार होण्याइतकें संकट आमच्या विद्वानांवर कां येतें ? न्हावी, परीट, पाणक्या यांपेक्षां का आमच्या विद्वानांची किंमत कमी ? मुलगा विद्वत्ता मिळवून तयार होणें ह्मणजे आतां याची सोय कशी लागेल ? तो कसें मिळवील ? ही का आईबापांनीं काळजी वाहावयाची ? तेव्हां तें कांहीं नव्हे, हा सर्व घोंटाळा झाला तो '**आतां पुढें काय करावें? पैसा कसा मिळेल?**' या विचाराची व विचाराप्रमाणें उद्योगाची चांगली दिशाच आमच्या विद्वानांस कळली नाहीं ह्मणून होय. मूढ व पूर्वापार परंपरा त्यांच्यानें सोडवत नाहीं, नवीन उद्योग, नवीन धंदा कसा काढावा, हा विचार त्यांस सुचत नसून त्यांतील अनेक अकल्पित अडचणी सहन करण्यास अवश्य अशा गुणांची

अगर संवयीची त्यांस ओळख नसते. आणि दगदग, काळजी, दृढनिश्चय, सततप्रयत्न इत्यादि गोष्टींच्या योगानें स्वावलंबन पत्क-रण्यापेक्षां आपल्या देहाला, आपल्या सुसंस्कृतमनाला आणि प्राणप्रियस्वातंत्र्याला येईल त्या मोलानें विकणें त्यांना प्रशस्त वाटतें.

भांबावलेल्या किंवा गांगरून खुळसट झालेल्या आणि चार-दोन अक्षरें कशींबशीं मिळविलेल्या अन्नार्थी स्वदेशबंधूंचें "**वाग्बाणा**"नें ताडन करण्याचा हा प्रसंग नव्हे, किंवा तसें करणें थोरपणाचें लक्षण नव्हे. यास्तव हल्लीं संसार-बाजारांत शाहाणपणा पैदा केलेल्या आमच्या मंडळीच्या होत असलेल्या किंमतीबद्दल किंवा हल्लींच्या पांढरपेशे ह्मणविणारांच्या दैनेसंबं-धानें कांहींएक न बोलतां "**आतां पुढें काय करावें,**" "**पैसा कसा मिळेल,**" या रात्रंदिवसाच्या विवंचनेला कांहीं तरी मार्ग दाखवितां येतो कीं काय हें पाहावें, या सद्धेतूनें हीं चार पानें लिहिलीं आहेत. त्याचा उपयोग एकाद्यास तरी झाला हें जिवंतपणीं मीं ऐकलें तर माझ्या अल्पश्रमाचें फार चांगलें चीज झालें असें समजून मी आपणास धन्य मानीन.

त्याचप्रमाणें सालोंसाल तयार होणाऱ्या विद्वानांच्या झुंडींच्या-झुंडी प्रत्येक वेळीं आणि प्रत्येक कचेरीच्या उंबरठ्यापाशीं दारें ठोठावीत बसतात, ह्या त्यांच्या करण्यानें आपण मिळविलेल्या विद्येचा सुरेख बोजवारा ते उडवून घेतात आणि पोटाच्या असह्य विवंचनेंत चूर झाल्यामुळें देश, देशबंधु, देशजननी आणि देशभाषा यांच्याकडे चोवीस तासांपैकीं नियमानें अर्धा तास नजर देण्याला "आपलें झालें थोडें आणि व्याह्यांनीं धाडलें घोडें." या ह्मणीप्रमाणें फुरसत मिळत नाहीं. या व असल्या दुसऱ्या अनेक राष्ट्रीय, सामाजिक व व्यक्तिमात्रक हानीचें निवारण, अशा प्रका-

रच्या पुस्तकानें झाल्यास कदाचित् होईल ही आशा तो **विश्वं-भर, जगाला पोसणारा, जगदात्मा** पूर्ण करो अशी सविनय प्रार्थना आहे. या प्रथमच्या व स्वसामर्थ्याच्या बाहेरील प्रयत्नांत पुष्कळ उणें असण्याचा संभव आहे तेव्हां तो उणेपणा भरून यावा अशी इच्छा असणाऱ्यांनीं किंवा तो उणेपणा शोधून काढण्याची ईश्वरकृपेनें अनुकूलता असणाऱ्यांनीं यांतील दोषांचें उघड आविष्करण करावें; दोष असतील ते उघड व उग्रदृष्टीनें बाहेर काढण्यास झटावें ह्मणजे प्रस्तुत लेखक त्यांचा अत्यंत आभारी होईल. दोषांचा उल्लेख प्रस्तुत प्रसंगीं, हा लेख लिहिणाऱ्यासच हितावह होईल असें नाहीं, तर या पुस्तकाच्या वाचकांसही तो तसा होईल. यास्तव दोष शोधण्याकडे मार्मिक, चाणक्य व विद्वान् गृहस्थ यांचें लक्ष लागावें असें पुस्तक लिहिणारा मनःपूर्वक इच्छितो. ती त्याची इच्छा सफल होवो !

**धनुर्धारी.**

# आतां पुढें काय करावें,

# पैसा कसा मिळेल ?

[stamp]

## प्रकरण १ लें.

प्रस्तुतच्या इंग्रजी साम्राज्यांत अनेक प्रकारच्या नव्या नव्या संस्था उदयास आल्या, नवे नवे आचारविचार प्रचारांत येताहेत, अश्रुतपूर्वसंबंध परस्परांत उत्पन्न होऊन समग्र पृथ्वींतल्या जनसमूहाशीं दळणवळण ठेवण्याचीं साधनें उपलब्ध झालीं आहेत. आणि एकाचें उदाहरण दुसऱ्यास, दुसऱ्याचें तिसऱ्यास जसें कांहीं प्रत्यक्ष पुढें मांडतां येतें व कोणाला कोठें काय हवें, कशाची गरज कोठें आहे, कोणाला काय देतां येईल वगैरे तमाम गोष्टी जशा काय प्रत्यक्ष डोळ्यांपुढें रात्रंदिवस घडत आहेत. पण डोळे उघडून तिकडे पाहिलें मात्र पाहिजे, ह्मणजे इच्छा असेल तर किंवा गरज पडेल तर सर्व कांहीं साधनें हात जोडून पुढें उभीं करण्याची शक्ति चार अक्षरें शिकलेल्यांस आणि त्यांतून आंग्लभाषा वाघणीचें दूध प्यालेल्यांस अगदीं पूर्ण आहे असें मानणें कदापि चुकीचें होणार नाहीं. पोट भरावें, चार पैसे मिळवावेत, लोकांत चांगलें ह्मणवून घ्यावें आणि ईश्वरास आवडेल, माणुसकीला शोभेल, अशा प्रकारचें वर्तन ठेवावें हें मनुष्यमात्राचें कर्तव्य आहे. परंतु **"पोट कसें भरावें; पैसे कसे मिळतील."** हा विचार सकृद्दर्शनीं उभा राहतो, तेव्हां त्या विचाराला फिरण्यासाठीं जागा मिळेल असा मार्ग दाखवावा हा प्रस्तुतच्या पुस्तकाचा उद्देश आहे हें प्रस्तावनेवरून उघड कळलेंच असेल.

लेखन, वाचन इत्यादि योगानें प्राप्त झालेल्या प्रस्तुतच्या ज्ञानप्राप्तीचा दृश्य व सर्वांनीं पत्करलेला उपयोग आजवर बहुतेक अफीस, कोर्ट, शाळा आणि छापखाना या चार ठिकाणींच होण्याचा काय तो संभव होता. परंतु तीं चारी स्थळें आतां अगदीं गच्च भरून गेलीं आहेत, पाऊल ठेवण्याला जागा नाहीं; अशी स्थिति झाली आहे. आणि इकडे विद्यादेवीची टांकसाळ सारखी सुरू आहे. दरसाल कोरे कोरे विद्वान् बाहेर पडताहेत तेव्हां त्यांनीं आतां नवा कांही तरी उद्योग काढला पाहिजे हें उघड आहे. नाहीं तर काय परिणाम होईल हें सांगणें नको. त्याचा अनुभव आजवर पुष्कळांस बराच खमंग असा आला आहे, आणि जास्त येईल. यास्तव नव्या उद्योगाची दिशा दाखविली पाहिजे.

पण ती दाखविण्यापूर्वी प्राथमिक अशा अनेक गोष्टी चांगल्या मनावर ठसणें जरूर आहे ह्मणून त्या उद्योगास अगोदर लागतों.

## १ धंद्याची निवड.

धंद्याची निवड कशी करावी हें सांगण्यापूर्वी **धंदा** ह्मणजे काय हें अगोदर ठरविलें पाहिजे. फायद्यासाठीं किंवा सुधारणेकरितां अगदीं गढून टाकणारा उद्योग यालाच धंदा ह्मणतात. रोजची वेळ, रोजचें लक्ष आणि रोजचे श्रम, यांचा विनियोग तिकडेच होत असतो; या उद्योगाला शारीरिकश्रमापेक्षां जास्त कौशल्य आणि मानसिकव्याप हवा आहे. आपल्या हिताकरितां, मनुष्यमात्राच्या वस्तुविषयक इच्छा तृप्त करण्याचा जो उद्देश तो **धंदा.** शरीराला आनंद होईल, शोभा येईल अशा पदार्थांची कमाई करणें, सुधारणा करणें आणि देवघेव करणें हें **धंदेवाल्याचें** काम होय. धंद्याचा उद्देश सुखप्राप्ति. धंद्यामुळें मान वाढतो. आणि

मनांत येतें, डोक्यांत शिरतें तें साध्य होणें धंद्यांतल्या सिद्धीवर अवलंबून असतें; एवढ्या ठोकळ गोष्टी सांगितल्या तरी पुरे आहेत. याजवरून धंदा ह्मणजे काय याची सहज चांगली कल्पना होईल. आणि प्रस्तुतच्या पुस्तकवाचकांस धंदा ह्मणजे काय याची विस्तृत व्याख्या देत बसण्यापेक्षां त्यांच्या मनानें ठरविलेली "धंदा" या शब्दाची कल्पना आहे तशीच राहूं द्यावी हें बरें.

धंद्याची निवड ह्मणजे आयु:क्रमाचा बेत ठरविणें होय. धंद्याच्या निवडीमुळें आपणांला काय व किती काम करावयाचें आहे, विसावा केव्हां व किती मिळेल, कोणाशीं संबंध जडेल, इत्यादि अनेक गोष्टींचा चांगला फाड होऊन, आपल्या स्वभावाचा व वर्तनक्रमाचा ओघ कसा काय ठेवावा याचें अनुमान चांगलें पूर्णपणें लक्ष्यांत येतें. यास्तव ही **धंद्याची निवड** हें काम मोठ्या जोखमीचें व फार दुधारीचें आहे. लहर लागेल त्याप्रमाणें किंवा प्रसंग आला, दुसरा इलाज नाहीं, निर्वाह लागणें कठीण असें समजून धंदा पत्करणें चांगलें नव्हे. वकीलींत पैसा फार मिळतो, तिची लोकांत मान्यता विशेष आहे, त्यांत स्वातंत्र्य बरेंच असतें, हें पाहिलें कीं आपणही वकील व्हावें ह्मणून इच्छा करावी; त्या प्रयत्नास लागावें. वकीलीच्या धंद्याला आवश्यक गुण आपल्यांत आहेत कीं नाहींत, तो धंदा तडीस जाई तोंपर्यंत आपलें सामर्थ्य टिकेल किंवा कसें, याचा विचार करावयाचा नाहीं, असा प्रकार असणें ह्मणजे निश्चयात्मकपणें निराशा व अपयश यांची आराधना करीत बसणें होय. त्याच प्रमाणानें कारकून होण्याची आणि तसे प्रयत्न केले तरी ते साधत नाहींत. आपल्या मनाजोगतें घडेना तेव्हां "बैठेसे बिगार भली" या न्यायानें मास्तरकी कां पत्करूं नये अशा प्रकारचे विचार आणि त्याप्रमाणें वर्तन हें चांगलें नव्हे. तर कोणत्या धंद्याला

आपण अधिक लायक आहोंत, कोणता धंदा आपणाला लाभदायक व आवडणारा असा वाटतो याचा अगोदर चांगला दूरवर व पूर्ण विचार केला पाहिजे. असा विचार करणें ह्मणजे आपल्या आयुःक्रमांतलें निम्याहून अधिक दुःख टाळण्याचा अगोदरच "रामबाण" उपाय योजणें होय; अशा प्रकारचा विचार व अशा प्रकारची निवड ह्मणजे आपल्या आयुःक्रमांत सुख, समाधान व शांतता मिळविण्याचा, योग्य निश्चयेंकरून साध्य होणारा प्रयत्न होय ! हीच धंद्याची निवड दूरवर विचाराची. व चांगल्या शहाणपणानें केली नसली ह्मणजे बहुतकरून अपयश, अतृप्ति व नालायकी खास यावयाची हें निश्चित जाणावें. यास्तव शाहणपणानें, फार काळजीपूर्वक, चांगला दूरवर व सारासार विचार करून धंद्याची निवड केली पाहिजे. धंद्याची निवड करतांना आपली वास्तविक योग्यता काय आहे, आपलें सामर्थ्य किती, आपणांत करामत कोणती आहे, याची चांगली फोड स्वतःची स्वतःला असणें फार उपयोगीं पडते व ती असणें अत्यावश्यक आहे. धंद्याची निवड ठरली ह्मणजे त्याप्रमाणें वागण्याचा निश्चय हवा. लहर लागली किंवा भूल पडली कीं ती निवड चटसारी गुंडाळून ठेवावयाची, हा प्रकार नसावा. भलतीच समजूत किंवा वास्तविक स्थितिसंबंधानें चुकीच्या कल्पना धंद्याची निवड करितांना मुळीं असतां कामा नयेत. कारण धंद्याच्या निवडींत चूक ह्मणजे संकटें, काळजी, क्लेश, अपयश यांची यथेच्छ समृद्धि !

यास्तव **धंद्याची निवड कशी करावी** या संबंधानें ढोबळ व ठळक दोन चार सूचना करणें हें अत्यावश्यक आहे;—

१ पत्करावयाच्या धंद्यांत आपला उदरनिर्वाह करून घेण्याचें आपल्या अंगीं सामर्थ्य आहे किंवा नाहीं याचा अगोदर विचार

केला पाहिजे. आणि तसें होण्याचा संभव नसला तर काय हवें तें असो, त्या धंद्याची वाट सोडावी हें बरें. कारण आपल्या उदरनिर्वाहाची हमी दुनयेनें कांहीं पतकरलेली नाहीं. ती आपणाकडेच आहे. आपला आपण उदरनिर्वाह करून घेतला पाहिजे.

२ आपण पसंत करूं इच्छितों त्या धंद्यांत निव्वळ उदरनिर्वाहापेक्षां कांहीं तरी जास्त मिळण्याचा संभव आहे किंवा नाहीं याचाही चांगला दूरवर विचार केला पाहिजे. कदाचित् आज तशी स्थिति नसेल पण केव्हां तरी व लवकरच स्वतः चांगली मेहनत केली व पूर्ण दक्षता ठेवली, अक्कलहुषारी खर्चिली तर त्याचा कांहीं उपयोग होईल असा संभव तरी निदान असला पाहिजे. कलेक्टर कचेरींत वर्ष दोन वर्षें उमेदवारी–पदरचें अन्न खाऊन व वस्त्र लेवून "नाट पेड" नौकरी–पतकरल्यानंतर बारा रुपयांची एखादी असामी मिळाली ह्मणजे त्या बारांचे पंधरा होण्याला आंगच्या गुणांचा, हुषारीचा किंवा कर्तबगारीचा विशेषसा उपयोग नसतो. तर आपल्यावरील दुसरी असामी पेनशनांत निघावी एक किंवा मृत्युमुखीं पडावी हें दुसरें; तेव्हां मग–वशिल्याप्रमाणें हें आहेच–वढतीची गोष्ट; असा प्रकार नसेल तितका बरा. कारण अशी स्थिति असल्यानें आपल्या आंगच्या कर्तृत्वशक्तीस स्वस्थ घोरत पडावें लागतें. कारण, तिला ठाऊकच कीं आपल्या हातीं कांहींएक नाहीं. हा असा प्रकार व्यक्तिमात्राच्या उन्नतीस फार अपायकारक होतो.

यास्तव उदरनिर्वाहाला पुरून जास्त उरेल अशा प्रकारची धनोत्पादक स्थिति त्या धंद्याची आहे किंवा नाहीं हें पाहिलें पाहिजे. कारण बाकीच्या गोष्टी कशाही असल्या तरी पैशाचें साहाय्य ह्मणजे मोठें जोरदार असतें, त्याच्या जोरावर अनेक सत्कृत्यें उठवितां येतात. याजकरितां पैसा जास्त सांचेल असा संभव आहे कीं नाहीं हें पाहणें जरूर आहे.

३ जो धंदा पतकरला असतां त्यांत आपली करामत उत्कृष्ट दाखवितां येईल तो अगोदर पसंत केला पाहिजे. आतां कदाचित् तो धंदा लोकांच्या मतें **"अब्रूदार"** नसेल. पण हाही विचार मनांत आणिला पाहिजे कीं धंद्यांत अब्रू जी कांहीं असते ती तें काम उत्तम, सर्वोत्कृष्ट, सुरेख असें करण्यांत आहे. लोकांस अब्रू ह्मणजे काय वाटत असेल तें असो, आपली गति ज्यांत आहे असें वाटतें आणि जो धंदा आपण पतकरूं तो चांगला नांवालौकीकास चढवूं अशी ज्यास हिम्मत आहे त्यानें तो धंदा अवश्य पतकरावा. लोकांच्या "अब्रूवाल्या" धंद्याच्या नादीं भरून न निभेल असें काम पतकरणें ह्मणजे स्वहिताचा नाश आणि जगाचें अकल्याण करणें होय. साहेबापाशीं खरडेघांशीची साक्षात् गुलामगिरीची कारकुनी मोठी अब्रूदार असें लोक—अर्थात अज्ञानी—समजतात ह्मणून एखादा सुतारकामांत किंवा चित्रकलेंत; चांगला निष्णात आहे किंवा त्याची त्यांत सुरेख गति आहे अशानें कारकून बनावयाचें ह्मणजे काय ? स्वतःला कुचकामी ठरवून घ्यावयाचें; आणि आपण जगांत निरूपयोगी बनावयाचें. वास्तविकपणें या जगांत पूर्ण निष्णात मनुष्याची प्रत्येक धंद्यांत सर्वदा अतिशय उणीव आहे. यास्तव दुसऱ्या "अब्रूदार" धंद्यांत गचाळ ह्मणवून घेण्यापेक्षां "गचाळ" धंद्यांत "अब्रूदार" ह्मणून घेणें बरें. एक मोठ्या थोर पदवीचा इंग्रज गृहस्थ लहानपणीं वारंवार ह्मणत असे कीं "पहिल्या वर्गात शेवटला विद्यार्थी राहण्यापेक्षां शेवटल्या वर्गात पहिला विद्यार्थी असणें मला आवडतें." खरें आहे. हेंच सर्वांनीं चांगलें ध्यानांत ठेवावें आणि आपण कोणत्या धंद्याला योग्य आहोंत, ह्मणजे आपल्या आंगचे गुण कोणत्या धंद्यांत चांगले उपयोगी पडतील, कोणता धंदा आपल्याच्यानें सुरेख निभेल, ह्याचा पूर्ण, चांगला व दूरवर विचार करून त्या धंद्याची निवड क-

रावी. जगाचें कल्याण किंवा असल्या दुसऱ्या गोष्टी सोडल्या तरी आपणांस आवडेल, आपण लायक असूं, तो धंदा पतकरण्यांत अनेक प्रकारें स्वताचें कल्याण आहे. आपण लायक आहोंत तो धंदा करण्यांत अगोदर एक प्रकारचा आनंद असतो; तो आनंद इतरांस कल्पनेनें सुद्धां कळणें कठीण. आपणांस करितां येतो तो धंदा चांगला चालला ह्मणजे जो आनंद होईल तो इतर धंद्यांत मिळावयाचा नाहीं तो नाहींच, आणि उलट तो न आवडणारा धंदा पतकरून त्यांतल्या अपयशामुळें होणारे हाल व दुर्लौकिक नाहक्क उपभोगावे लागतात. दुसरी ही आणखी एक गोष्ट मोठ्या महत्वाची आहे कीं, जगांतल्या एकंदर धंद्यांत आजमितीला पाहतां सारा भरणा काय तो रेम्याडोक्यांचा अगर साधारण लोकांचाच आहे. एका नामांकित ग्रंथकारानें ह्मटल्याप्रमाणें सर्व दाटी तळमजल्यावर असते. वर दुसऱ्या तिसऱ्या मजल्यांत रिकामी जागा पुष्कळ, तेव्हां आपण वरल्या मजल्यावर जावें हें विसरतां कामा नये. ह्मणजे एखादा धंदा शेंकडों लोक करिताहेत किंवा त्या अमक्या एका धंद्यांत कूस नाहीं असें ह्मणूं नये. लोक पुष्कळ त्या धंद्याच्या पाठीस लागले किंवा कूस उरली नाहीं याचा अर्थच असा कीं;आहेत ते लोक अशातशांतले, अर्थात साधारण आणि कूस नसते ती तशांनाच. वर जाणाऱ्यांस कांहीं कोठें आडकाठी नाहीं ! तेव्हां आपणांस आवडणारा धंदा असला ह्मणजे तेथें वरल्या अगदीं अखेरच्या मजल्यावर उत्साहपूर्वक सहज जातां येतें. आणि जातां आलें ह्मणजे द्रव्याची अनुकूलता यथेच्छ होते; यास्तव आवडेल, ह्मणजे ज्यांत आपली चांगली गति असेल, तोच धंदा पतकरला पाहिजे. याला कारणेंही वर सांगितलीं आहेतच कीं अशा योगानें पैसा जास्त मिळेल, लौकिक चांगला होऊन आनंद वाटेल, आणि जगाचें व आपलें कल्याण होईल.

४ धंद्याची निवड करितांना आपल्या शरीरप्रकृतीकडेही पाहिलें पाहिजे. आपणांस जितकीं ज्यास्त वर्षें जगतां येईल तितकीं वर्षें जगणें ह्यांत आपलें स्वतःचें, आपल्या कुटुंबाचें आणि आपल्या देशाचें कल्याण आहे. याजकरितां दुखण्याबाण्याशिवाय आणि हालअपेष्टांखेरीज होईल तितकी कालक्रमणा करणें आपलें कर्तव्य होय. यास्तव आमच्या प्रकृतिमानास अपायकारक किंवा न खपे असे धंदे पतकरणें चांगलें नव्हे. 'स्टेशना'वरील नौकरी पतकरल्यानें झोंप हवी तशी मिळत नाहीं यामुळें किंवा कोळशाच्या धुराच्या घाणीनें किंवा तारायंत्रापुढील कटकटीनें डोळ्यांला, शरीराला वगैरे अपाय होतो, आपलें चित्तस्वास्थ्य जातें, असें वाटलें तर ती नौकरी पतकरण्यांत शहाणपणा तो कोणता? थोडा वेळ काळजी, मेहनत, आणि दगदग सोसावी लागते ह्मणून दुसरे धंदे टाकून ऐषआरामीखातर असल्या चाकरींत शिरावें व प्रकृतिमान बिघडून घ्यावें हा कांहीं शहाणपणा नव्हे. यास्तव धंद्याची निवड करितांना आपल्या शरीरप्रकृतीकडे चांगलें लक्ष दिलें पाहिजे.

५ त्याचप्रमाणें धंद्याची निवड करितांना आपल्या कुटुंबाच्या व बायकापोरांच्या सोईसुखाकडे लक्ष देणें आवश्यक आहे. कारण बायकापोरांच्या सोईसुखाचा पत्कर आपण घेतला असतो. पांचपंचवीस रुपयांसाठीं मुलांचा अभ्यास न होई किंवा झाला तर आपल्या नजरेखालीं नाहीं. बायकोला शेजार नाहीं, सोबत नाहीं अशा ठिकाणीं राहाणें आणि आप्त, इष्ट, सोयरेधायरे यांस टाकून जाणें बरें नव्हे. आतां त्यांतल्या त्यांत या सर्व तऱ्हेच्या नुकसानीची चांगली भरपाई होण्याजोगी त्या धंद्यांत कमाई असेल, आणि तेणेंकरून असाध्य अशा गोष्टी साध्य होतील किंवा व्यक्तिमात्रामुळें समूहाचें कल्याण होण्याचा संभव असेल तर कशाची पर्वा बाळगावयाला नको हें मात्र विसरतां कामा नये.

धंद्याच्या निवडणुकी संबंधाचे हे ढोबळ नियम झाले. किरकोळ नियमांचा यांत समावेश झाला नाहीं. तो थोडक्यांत सांगून हें प्रकरण आटोपतें घेऊं.

धंद्यांत अपयश येतें आणि जन्मभर कष्टाहालांत दिवस काढावे लागतात; याचें मुख्य कारण बहुशः आपण लायक नाहीं अशा धंद्याच्या नादीं लागून अश्रांतश्रम करीत असणें हें होय. अशा प्रकारची चूक ह्मणजे आपण कोणत्या धंद्याला लायक आहोंत आणि कोणत्या धंद्याला नालायक आहोंत हें बरोबर न समजणें, अगर न समजतां किंवा विचार न करितां उद्योगास लागणें होय. आणि अशा वागण्यांत सर्व दुःखांचें, सर्व अपयशांचें व हालअपेष्टांचें मूळ आहे. परंतु अशा प्रकारची चूक आपल्या हातून झाली हें कबूल करणें कोणास आवडत नाहीं. कारण, पतकरलेलें काम शेवटास न नेतां अर्धेच सोडणें ह्मणजे आपणांकडे नालायकपणा घेणें होय; अशी त्यांची समजूत असते. यामुळें कैक लोक भलत्याच एकाद्या धंद्याच्या नादीं लागून भिकारड्या उत्पन्नावर व रेंगाळत मेंगाळत कसा तरी तो पतकरलेला धंदा चालवीत असतात. त्यांना लोकांनीं दिलेली मदत किंवा मित्रांनीं सांगितलेला सल्ला कुचकामाचा असें ह्मणावें लागतें. स्वतः जो ज्या धंद्यास लायक नाहीं त्या धंद्यांत त्याला राहण्यास लावणें, ह्मणजे चांगल्या धंद्यांत अर्थात् तो लायक असेल अशा धंद्यांत त्याला न घालण्याचे प्रयत्न करणें होय! असें न होईल ह्मणजे एकाद्या धंद्याच्या नादीं लागलेल्या नालायक मनुष्याला त्याचे मित्र वगैरे साहाय्य देऊन, यश मिळविण्याची खटपट न करितां, त्याला लायक अशा धंद्यांत शिरण्याचा उपदेश करतील, तशा प्रयत्नास लागतील, तर, त्या बिचाऱ्यांचें चांगलें व खरें कल्याण होऊन एकाददुसरा धंदा चां-

गला उजागरीस येईल. पण, असें करण्याला कदाचित् "अब्रूदारपणा" आड येण्याचा संभव आहे. आपल्या देशांत दुर्दैवानें धंद्याच्या अब्रूदारपणाचें स्तोम वाजवीपेक्षां फारच फाजील आहे याला उपाय नाहीं. अमुक धंदा अब्रूदारपणाचा आणि अमुक हलकटपणाचा अशी समजूत फार दिवसांपासून आमच्या लोकांच्या हाडांत खिळलेली आहे, याचा परिणाम लाखों लोकांस विगरधंद्यानें हालकष्टांत दिवस काढावे लागतात हा होय! मान आणि थोरपणा धंद्यावर नसून, धंदा उदयास व नांवालौकिकास आणण्याला अवश्य असणाऱ्या गुणांवर अवलंबून आहे हें पक्कें ध्यानांत ठेविलें पाहिजे. नालायकपणानें व बेवकूबीनें धंदा चालविण्यांत काय मान असतो कोण जाणे! आपण लायक नाहीं अशा धंद्यांत शिरल्यानें, मग तो धंदा कितीही प्रतिष्ठित असो, तो उत्तम रीतीनें चालला नाहीं, अगर चालवितां आला नाहीं, तर, त्या धंद्याची अब्रू किंवा त्या धंद्यांतला प्रतिष्ठितपणा, धंदा चालविणारांस मिळावयाचा नाहीं तो नाहीं, पण उलट त्यांस अप्रतिष्ठा व नालायकपणा मात्र पदरीं घ्यावा लागेल! 'आफीसां'तील बारा रुपयांच्या कारकुनीच्या धंद्यांत प्रतिष्ठा आणि अब्रू आहे व एकाद्या बड्या सावकाराच्या दुकानांतल्या गुमास्तेपणांत ती नाहीं असें कां वाटावें याला कारणें कांहीं दिसत नाहींत. कुशल कारागीर, कल्पक चितारी वगैरेपेक्षां खरडेघांशा कारकून व पोरेंहाक्या पंतोजी कसे श्रेष्ठ, हें—धंदा पतकरणें या संबंधानें—सिद्ध करणें कठीण आहे. अमुक धंदा श्रेष्ठ, अमुक धंदा प्रतिष्ठेचा, अशी निवडानिवड करतांना प्रत्येक धंद्याची प्रत्येक कामीं आवश्यकता आहे. एकमेकांमुळें एकमेकांस सहाय्य होतें. धंदा मग, तो कोणताही असो, तो पतकरून नांवालौकिकास चढण्याला कौशल्य, बुद्धिविकास व प्रयत्न अवश्य आहेत. इत्यादि प्रकारच्या

गोष्टी चांगल्या ध्यानांत ठेविल्या ह्मणजे अमुक धंदा प्रतिष्ठेचा आणि तसुक हलकट असें ह्मणतां यावयाचें नाहीं. **धंद्यांत किंवा उद्योगांत अब्रू किंवा प्रतिष्ठा नसते तर तो नांवालौकिकास आणण्यांत प्रतिष्ठा व अब्रू असते.** हें तरुण लोकांनीं चांगलें ध्यानांत ठेवावें, एवढेंच सांगितलें ह्मणजे पुरे आहे. मग अमुक धंदा कसा प्रतिष्ठेचा नव्हे वगैरे प्रतिपादन करीत वसणें नको. आवडेल तो धंदा पतकरा, धंदा पतकरल्यावर त्यांत प्रवीणता संपादा ह्मणजे अब्रू आणि प्रतिष्ठा ह्या तुमच्यापुढें हात जोडून उभ्या राहतील. आणि, वर, पैसा व समाधान यांची चांगली बिदागी होईल. यास्तव वाटेल तो धंदा पतकरावा, मात्र त्याची **पिच्छा सोडतां कामा नये.**

एकादा धंदा पतकरला, त्यांतील खांचाखोंचा लक्षांत आल्या, तो आपण शिकलों, ह्मणजे तो सोडून दुसरा पतकरणें यासारखें भयंकर काम दुसरें नाहीं. आपणांस कळला, समजला तो धंदा सोडून दुसऱ्यांत शिरणें फायदेशीर नसतें. आमच्या तरुण लोकांस आवडत असतो किंवा साहजिक कलाचा असतो एक धंदा, आणि ते पडतात भलत्याच धंद्यांत. यामुळें अनिर्वाहपक्ष जाणून किंवा अब्रू व प्रतिष्ठा यांच्या नादीं भरून पतकरलेल्या धंद्याकडे त्यांचें लक्ष लागत नाहीं. केव्हां प्रसंग येईल आणि केव्हां माझ्या आवडत्या धंद्याकडे जाईन हा त्यांना ध्यास असतो, यामुळें पतकरलेला धंदा रेटत नाहीं, त्यांत मन लागत नाहीं, तिकडे छि थु होते आणि इकडे अशी संधि सांपडत नाहीं; सांपडलीच तर तट्टीवर लाथ मारण्यापूर्वी विटांच्या भिंतीची तजवीज करावी किंवा **"अर्धी सोडून सगळीच्या पाठीमागें लागूं नये"** हें विसरून **"इदं च नास्ति न परं च लभ्यते"** अशी त्यांची स्थिति होते. पतकरलेला धंदा सोडून दुसरीकडे जाण्याची [illegible] होते,

ती, दुसऱ्या धंद्यांतील लोकांच्या दिखाऊ डामडौलास भुलून होऊं लागली तर त्या बिचाऱ्या सारखा हतभागी कोणीच नाहीं. 'स्टेशना'-वरील तार'मास्तरा'ला शाळा'मास्तर' होणें आवडतें, तें कां तर, त्यांत विश्रांति असून फार दगदग नसते, आणि किफायत चांगली ह्मणून. पण दिखाऊ थाटमाटाला भुलून तिकडे प्रवृत्ति होणें क्षुद्र मनाचें लक्षण आहे. बाहेरील भपक्याला भुलून पुष्कळ लोक फजीत झाले आहेत. यास्तव एक धंदा सोडून दुसऱ्या धंद्याच्या नादीं लागणें कदापि चांगलें नव्हे. आतां कदाचित् असें केल्यानें एकाददुसऱ्याचें कोटिकल्याण झालें असेल, नसेल असें नाहीं; पण अशा गोष्टी विरळा समजावयाच्या. त्यांतलीं कारणें, त्याला यश मिळालें कशामुळें आणि त्याचा वशीला कसा वगैरे तमाम गोष्टी "क्वचित्" पैकीं असतात. ह्मणजे सर्वांसच साध्य किंवा अनुकूल अशांतला तो प्रकार नव्हे. एकाददुसऱ्या उदाहरणावरून तें तसेंच आपल्या बाबतींत होईल या समजुतीसारखी घातुक समजूत दुसरी नाहीं.

आतां एकाद्याला आपण पतकरलेल्या धंद्यांत यश मिळावयाचें नाहीं अशी खात्री झाली तर त्यानें पक्कें समजावें कीं हाच प्रकार दुसऱ्या धंद्यांतही खास होईल. पतकरलेल्या धंद्यांत कां यश येत नाहीं हें कळण्याजोगें असतें, यश यावयाला उपाय काय केले पाहिजेत हें समजतें, तथापि तसें आपल्याच्यानें होत नाहीं; तसेंच दुसऱ्या ठिकाणीं होणार नाहीं कशावरून? धंद्यांत प्राविण्य संपादण्यासाठीं सतत केले असतील नसतील ते श्रम उत्साहपूर्वक तिकडे लाविले तर सिद्धिही पुढें तयार असतेच. मनःपूर्वक करावयाच्या कामाकडे दुर्लक्ष व हयगय केली तर सिद्धि कशी मिळेल? हल्लीं आमच्या देशांत निरुद्योगी लोक पुष्कळ आहेत, त्यांना काम धंदा मुळींच मिळत नाहीं ही गोष्ट

खरी आहे. पण निरुद्योगी असे कोणत्या वर्गाचे लोक आहेत ? रेमेडोके. तसेच अलवत्ये गलवत्ये! पूर्ण निष्णात मनुष्याला धंदा नाहीं असें कधींच आणि कोठेंच व्हावयाचें नाहीं! “ दाटी सारी तळमजल्यांत, वरल्या मजल्यावर शुक पांखरूं देखील न-सतें ” ही धंद्याची स्थिति चांगली ध्यानांत ठेवा.

इतका वेळ सांगितलें या सर्वांची गोळाबेरीज इतकीच कीं:—

१ विद्या, स्थिति, कल इत्यादिकांच्या योगानें आपण लायक आहों अशाच **“ धंद्याची निवड ”** केली पाहिजे.

२ पतकरलेल्या धंद्यांत अश्रांतश्रमानें व दृढ निश्चयानें पूर्ण प्राविण्य मिळवावें.

३ एक धंदा सोडून दुसऱ्या धंद्यांत शिरण्याचा विचार सहसा मनांत आणूं नये.

४ पतकरलेल्या धंद्यांत असेल नसेल तितका उत्साह धरून करामत करावी.

५ पतकरलेला धंदा मनःपूर्वक करीत जावा. तसें न करणें ह्मणजे स्वतःला, स्वतःच्या कुटुंबाला आणि देशाला बुडविणें होय, हें विसरूं नये.

६ पतकरलेला धंदा कमी अब्रूचा किंवा प्रतिष्ठेचा ही समज सोडावी. धंदा उत्तम रीतीनें चालविणें व त्यांत प्रवीण होणें हीच धंद्याची प्रतिष्ठा व अब्रू हीं पूर्णपणें स्मरणांत ठेवावीं.

---

## प्रकरण २ रें.

## इच्छा आणि आवड.

‘इच्छा आणि आवड असली कीं मार्ग दिसलाच’ या अर्थाची एक इंग्रजी भाषेंत ह्मण आहे. तिचा आपणांस पावलोपावलीं व्य-वहारांत अनुभव येतो. उद्योगधंद्यामध्यें मनुष्यमात्राच्या कर्तव्र-

गारीला दुसऱ्या कांहीं पदार्थांची गरजही असतेच. अडचणी आणि संकटें यांच्या पुढें मोठ्या मी मी ह्मणणाऱ्यांस हात टेंकण्याचे प्रसंग कांहीं थोडथोडके येत नाहींत. कालदेशवर्तमानाचा झपाटाच असा कांहीं विलक्षण कीं त्याच्या पुढें कोणाचें कांहींएक चालतच नाहीं. परंतु अशा प्रसंगाचें स्तोम मात्र वाजवी पेक्षां फाजील माजविलें जातें. दृढ निश्चयानें प्रयत्न चालू ठेविला ह्मणजे मोठ्या दुःसाध्य गोष्टी सहज, मात्र, थोड्या सावकाश, साध्य झाल्याशिवाय कांहीं रहात नाहींत. हीही गोष्ट पण तितकीच खरी आहे. क्वचित् एकाददुसरी गोष्ट निराळी. इच्छेचें प्राबल्य अनावर झालें ह्मणजे अशक्यतेला शक्यता प्राप्त होते. आणखी इच्छेचा प्रादुर्भाव ह्मणजेच अगोदर साध्यतेचा शुभशकुन असेंही अनेक वेळां आपल्या अनुभवास येतें. इच्छा मनुष्यमात्रांत होते ती प्रमाणानें आणि लायकीनुसार होत असते. व तिलाच इच्छा ह्मटलें पाहिजे. बारा रुपये मिळविणाऱ्या कारकुनास एकदम पन्नास रुपये मिळावेत अशी इच्छा होत नाहीं. बारांचे पंधरा, पंधरा झाले कीं त्या पंधरांचे वीस हें त्याच्या इच्छेचें प्रमाण. भोई लोकांस पालखींत बसावें अशी इच्छा क्वचित् होते आणि झाली तरी ती सततची नसते, लहरीसरशी त्या इच्छेची उचल इतकेंच. तेव्हां साधारण नियम हाच कीं इच्छेचा प्रादुर्भाव व तडाखा प्रमाणानें आणि स्थितिगत्यनुसार होत असतो. इच्छेच्या जोरावर कार्यसिद्धि अवलंबून असणार हें तर उघड आहे. भीत भीत व दबत दबत इच्छेचा प्रादुर्भाव होणाऱ्या मनुष्याला सर्वच गोष्टी असाध्य वाटतात. कार्यसिद्धि मिळवावयाची हा **निश्चयच** आधीं कार्यसिद्धि असें एका पोक्त अनुभवी मनुष्याचें ह्मणणें आहे. इच्छेचा उद्भव मोठ्या आवेशाचा असला ह्मणजे कसलाले चमत्कार घडतात आणि ते पाहून

सर्वांस आश्चर्य वाटतें. पुण्यप्रतापी सदा यशवंत पंतप्रधान पेशवे, एकेकाळचे आर्यभूंतील हिंदुपदपातशहाचे मुख्य मंत्री, त्यांचे सरन्यायाधीश वे. शा. रामशास्त्री परभुणे. यांचें बालपण कोणास माहीत नाहीं ? रामशास्त्र्यांसारखा न्यायनीतिविशारद जगद्विख्यात पुरुष, पंतप्रधानांचा—श्रीमंत माधवराव पेशव्यांचा—मुख्य न्यायाधीश लहानपणीं शागिर्दीचें ह्मणजे धोत्रें बडवावयाचें काम करीत होता. यजमानांच्या पायांवर पाणी घालीत असतां मोत्यांच्या चौकड्याकडे नजर गेली, त्यावद्दल त्याचा यजमानांनीं उपहास केला, तुला असला चौकडा कसा मिळणार, असें ह्मणून त्यास त्यांनीं निखंदलें. तेव्हां नाहीं, बस्स हा असला चौकडा मिळवावयाचा, मिळविण्याच्या मानास लायक व्हावयाचें, अशी इच्छा राम्या शागिर्दास झाली आणि पुढें त्याचा परिणाम काय झाला ह्मणजे कार्यसिद्धि कशी झाली हें कशाला सांगावयास पाहिजे ?

बहुतेक थोर पुरुष कीं, ज्यांनीं आपलीं नांवें अजरामर करून मनुष्यमात्रावर श्रेष्ठत्व मिरविलें तें प्रबळ इच्छेच्या जोरावरच असल्या महत्पदास चढले, हें अगदीं खरें आहे. "ह्मैसूरच्या वाघाचा" बाप हैदरअल्ली खां अगोदर यःकश्चित् पैसे वसूल करणारा शिपाई होता, पण त्याची इच्छा कांहीं निराळीच. नंदराजाची ह्मणजे आपल्या मालकाची जागा आपण कां चालवूं नये असें त्यास वाटूं लागलें. पुढें पुढें तर त्याला ह्मैसूरचें राज्यपद मिळविण्याचीच हांव सुटली !

हिंदुपदपातशाहीची दांडगी इमारत उठवून देणाऱ्या नरश्रेष्ठ महाराष्ट्रियांनीं अनुभोगलेलीं संकटें, सोसलेले त्रास, जिवावर उदार होऊन साधलेले प्रसंग, इत्यादि सर्वांच्या मूळांस एक बीज होतें, तें कोणतें ? तर **इच्छा !** त्या इच्छेमुळेंच आमच्या परमपूज्य व सर्ववंदनीय **श्रीशिवराजानें** अफझुलखानाची खोड मो-

डली, मोगलांचा सूड उगवला आणि गोब्राह्मणांचा प्रतिपाळ केला हें कांहीं सांगावयास नको! साऱ्या देशांतील इतिहास ह्मणजेच मुळीं या **इच्छेचे प्रभाव** होत, असें ह्मटलें तरी चालणार आहे. शूर वीरांच्या समशेरींची चमक, कार्यधुरंधरांच्या अटोकाट धोरणांचा पेंच, भाग्यशाली पुरुषांची करामत, कवींची स्फूर्ति, लेखकांची लेखण, व वक्त्यांची जिव्हा इत्यादिकांचा सुळसुळाट सर्व इच्छेमुळेंच माजतो. तेव्हां सारांश काय कीं कार्य घडण्याला, जयप्राप्ति होण्याला, मूळ कारण इच्छा होय.

आतां ही गोष्ट खरी आहे कीं, प्रपंचसागरांत तारूं लोटावयाचें ह्मणजे प्रतिकूल वारा आणि त्याच्या प्रचंड लाटा यांजबरोबर टकरा द्याव्या लागतात. त्या टकरा देणेंच ह्मणजे कार्यसिद्धि होय! आणि त्याचप्रमाणें हीही गोष्ट खरी आहे कीं, हल्लीं धंद्यांत प्राविण्य मिळविण्यासाठीं जी मेहनत व जीं संकटें सोसावीं लागतात तीं व तितकीं पूर्वी लागत नसत. सध्या सर्वच मनु बदलला आहे. पूर्वी धंदा ह्मणजे चिकण मातीसारखा होता. त्याचें भांडें करणें हें काम सोपें असे. आणि आतां धंदा ह्मणजे **लोखंड** होऊन बसला आहे. त्याचें भांडें बनविलें पाहिजे. ठोकण्याला घण देखील नाहींत, मुठीनें बडवावें लागतें. ह्मणजे सारांश काय कीं कार्यसिद्धीला प्रबळ इच्छा, ओतप्रोत उत्साह व सतत प्रयत्न यांची फार आतां गरज आहे. सामर्थ्य, विद्या, प्रसंग व अनुकूलता एवढ्यावरच सर्व भागत नाहीं. त्यांच्यानें हटकून कार्यसिद्धि मिळेलच असें संभवणें कठीण. हे सर्व गुण हजारों लोकांत आहेत; पण त्यांपासून स्वतःचा किंवा दुसऱ्याचा फायदा न होतां आल्याप्रमाणें जाणें त्यांस भाग पडतें. साधारण स्थितींतला मनुष्य कीर्तीच्या अत्युच्च शिखरावर चढतो तो पक्का निश्चय आणि प्रबळ इच्छा यांच्या जोरावरच. युरोपियन लोकांचा

जगडव्याळ चाललेला उपद्व्याप ह्या इच्छेचा प्रभाव होय. तसेंच मनुष्याला धंद्यांत यश येत नाहीं किंवा धंद्यांत दिवाळें निघतें याचें कारण पुष्कळ अंशीं तिकडे त्याचें मन नसतें हेंच होय. आणखी धंद्यांत प्राविण्य मिळावयाचें अगर यश प्राप्त व्हावयाचें तें लोक समजतात त्या नशीबाच्या योगानें किंवा अनुभवाच्याच जोरावर होत नसतें हें पक्कें ध्यानांत ठेवावें. अडचणी, संकटें, निराशा हींच कार्यसिद्धीचीं पूर्वलक्षणें. अडचण ह्मणजेच वेष बदलून येणारी सिद्धि. औरंगजेब बादशहानें कपटेंकरून श्रीशिवाजीस कैद केलें नसतें, तर, मराठी राज्याचा इतका लौकर पाया पडता ना. राघोबाकाकाचा श्रीमंत माधरावासभोंवतीं पाहारा नसता तर तांदुळजाच्या लढाईंत मराठ्यांची फत्ते झाली नसती. यास्तव अडचण ह्मणजे राकटपणा अंगांत आणणारा दवा, व संकटें ह्मणजे प्रवीणता शिकविणारी शाळा, असेंच ह्मटलें पाहिजे.

धंदा सुरू करतांना गरज, कोंडमारा, स्पर्धा, सहज दूर होणाऱ्या अडचणी, क्षणार्धांत नाहींशीं होणारीं संकटें, आनंदास मागें टाकून पुढें तेवढें येणारें दुःख, वगैरेच्या योगानें धंद्यांत प्राविण्य मिळविण्यास लायकपणा मनुष्यांत येतो. खुल्या जागेंत दारूवर ठिणगी पडली तर भुसभुस आवाज होऊन धुराचा घोळका माजेल इतकेंच. पण त्यांतीलच थोडीशी दारू घेऊन एका बेल्यांत भरावी मग तिला किंचित् ठिणगी लाविली कीं पुरे. केवढा आवाज होतो आणि काय सपाट्यानें तो उडतो हें सर्वांस ठाऊकच आहे. मशाल खालीं केली नाहीं तर जोत जोरानें कशी वर येईल ? झाड तोडलें तर तें कसें जोरानें फुटतें हें सर्वांस माहीत आहेच. यास्तव सारांश इतकाच कीं संकटें, अडचणी, त्रास, क्लेश हे सर्व कल्याणकारक होत असेंच समजलें पाहिजे.

हल्लीं हजारों अप्रसिद्ध, दरिद्री असे लोक कोनाकोंपऱ्यांत पडून राहिले आहेत. तेच संकटाशीं आणि अडचणींशीं टकरा मारित सुटले असते ह्मणजे मोठ्या थोर पदासच चढते हें खचीत आहे.

संकट प्राप्त झालें ह्मणजे ती **साडेसाती** असें आमचे लोक ह्मणतात. ती आहे असें खरें मानलें तर, चाणाक्षपणा नाहीं, आत्मसंयमन करितां येत नाहीं, दृढ निश्चयाचा आभाव आहे, उत्साह कमी, काटकपणा नाहीं, करारी स्वभाव नसतो व "हृदयदौर्बल्य" विशेष असतें, अशांच्याच मात्र वाटेस ती अगोदर जाते असें ह्मटलें पाहिजे! ह्मणजे संकटें आणि संसारदुःखें सहन करण्याला एकच मार्ग आहे. तो कोणता तर त्यांच्याशीं सपाटून टक्कर देणें हा होय. साहस ज्यांना करावयाचें नाहीं त्यांच्या वांट्यास अर्थात् नुकसानही येत नसतें. आशाच नाहीं तर निराशा कुठली? परंतु ज्याला प्रपंचांत घुसून आपला रस्ता मोकळा करून घ्यावयाचा आहे, त्यानें, शत्रूंशीं सामना केला पाहिजे. टक्कर मारतांना धैर्यानें उभें राहवें एक, नाहीं तर रडत भेकत क्लेश सोशीत पडावें हें दुसरें. संकटसमय थोडासा भित्रा आहे. पण दटावून त्याच्याकडे पाहिलें पुरे कीं तो शेंपूट घालून पळावयाला लागलाच. आणि आपण पळावयाला लागलों कीं मग आलीच मागून त्याची झडप असें खास समजावें. ह्मणजे संकटप्रसंगीं गांगरलें कीं बिनसलें, धैर्य धरलें कीं फत्ते पुढें तयारच.

आतां हीही गोष्ट खरी आहे कीं, संकटावस्थेपासून अमुक होतें आणि तमुक होतें ह्मणून ब्रह्मज्ञान सांगण्याइतकें तें संकट सोसणें सोपें नाहीं. पदरीं पैसा नसला ह्मणजे संसार चालविणें कठीण आहे. दरिद्रावस्था मोठी शोचनीय. आणि लोकांनीं दरिद्री ह्मणणें हें तर केवळ दुसरें मरण. या गोष्टी कोणासही नाकबूल करितां यावयाच्या नाहींत. संसारगिरिशिखरावर चढण्याला धंदा

हा सोपानमार्ग आहे. चढतांना श्रम हे व्हावयाचेच. त्याला दुसरा इलाज नाहीं. वर चढून आसमंताद्भागाचा रमणीय देखावा पाहण्यास मिळावा, गिरिशिखरावरील अनुपमेय सौंदर्य लाधावें, इतर लोकांस आपल्याखालीं पाहून आनंद वाटावा, असें असेल तर तें दुःख सोसलें पाहिजे आणि नसेलच सोसवत तर, दैना भाकून गायावाया तोंडें करीत धट्ट्याकट्ट्याचीं आर्जवें करून व त्यांच्या खांद्यावर बसून मग वर जावें लागणार! पण याद राखा, असें करणें—अर्थात् भिक्षा मागणें—ह्मणजे मोठी शरमेची गोष्ट. त्यायोगें तुमची उभी ताठ मान खालीं वांकून पडेल, मी नामर्द, भागूबाई असें पर्यायानें कबूल करावें लागेल! तेव्हां तें पतकरणें बरें वाटतें कीं, हे मर्दानी अव्वुदारपणाचे हाल पुरवतात, याचा नीट विचार करा!

धंद्यांत शिरण्यापूर्वी आणखी एक अडचण पुष्कळांस वाटत असते ती ही कीं, प्रथमतःची प्राप्ति ह्मणा किंवा श्रमाचा मोबदला ह्मणा फारच क्षुद्र असतो; तेव्हां असल्या भिकारड्या उत्पन्नावर मन फिदा व्हावें कसें? हा प्रथम विचार उत्पन्न होतो. परंतु दृढ निश्चय, सतत परिश्रम, नेटानें मेहनत वगैरेचें भक्कम साहाय्य असलें ह्मणजे चव्वल मिळण्याच्या ठिकाणीं लौकरच सबंध रुपया मिळूं लागतो. आपल्या देखत श्रीमंत झालेल्यांच्या किंवा पूर्वी होऊन गेलेल्या अनेक श्रीमान् लोकांच्या गोष्टी आपण ऐकतों तेव्हां आश्चर्यकारक अशी आपणांस एक त्यांची हकीकत कळते, ती कोणती तर, प्रारंभीं ते अगदीं गरीब होते. मागें, एकदां ह्मटलेंच आहे कीं, थोर पदास चढलेले सर्व लहानपणांतून वर आलेले असतात. श्रीमंत झालेले लोक गरीबच होते. धंद्याच्या सुरुवातीला जी स्थिति तीच कांहीं पुष्कळ वेळ राहत नाहीं. पडित जमिनीवर सुंदर बाग आपण उठवितों, नानातऱ्हेच्या

वृक्षलतांनीं तिला सुशोभित करतों, त्यांवरील सुंदर व मधुर फळें आपण चाखतों, तीं सर्व स्वतःच्या कमाईवरच. आज पडित, भयाण, रुक्ष अशी जमीन आहे ती कशी घेऊं? तिचा काय उपयोग? असें ह्मणत बसणें हें आळशी व मूर्खपणाचें लक्षण आहे. लहानपणीं गुरें राखणारा मुलगा[1] थोरपणीं मराठी राज्यांतला भीष्माचार्य बनला, धोत्रें बडविणाऱ्या मुलाला सर न्यायाधीश होतां आलें, शिलेदारी पतकरलेल्या साधारण सरदाराच्या मुलानें एका साम्राज्याची प्राणप्रतिष्ठा केली, एकानें शिपायाचें काम पतकरून अखेर सुलतानगिरी संपादन केली, इत्यादि गोष्टी आपण ऐकतों. यावरून एक निश्चित अशी आपणांस गोष्ट कबूल केली पाहिजे कीं, केव्हां कशाचें व कोणाचें काय होईल याचा ह्मणून कांहीं नियम नाहीं. "जो नर करनी करे सो नरका नारायन होय." "नशीब" ह्मणून कांहींएक आहे आणि त्याचा हा सारा प्रभाव, असें ह्मणत बसणें यांत कोणाला भूषण वाटत असेल तें असो. हा कांहीं निव्वळ नशीबाचाच खेळ नव्हे. कारण, स्वप्रयत्नानें उदयास आलेल्या माणसांस ती स्थिति घर बसल्या कांहीं आली नाहीं एवढें तरी खरें ना? पेशव्यांकडून कोणी येऊन त्यानें गुरें राखीत असतां बापू गोखल्यांस सेनापतीचीं वस्त्रें दिलीं असें कांहीं झालें नाहीं. धोत्रें बडवितांना तीं काढून घेतलीं व डोक्यास शालजोडी गुंडाळून शास्त्रीपद दिलें अशांतला कांहीं प्रकार नाहीं. तेव्हां "नशीब" ह्मणणाऱ्यांस एवढेंच विचारावयाचें कीं, अशा लोकांस स्वतः कांहीं करावें लागलें किंवा नाहीं? अर्थात् करावें लागलें. आणि करावें लागलें तेव्हांच त्यांस यश येत गेलें.

आपण आज भिकारी—मारवाडी दुकानदार पाहतों, तोच चार दोन वर्षांत बडा शेट आपणांसमोर मिरवतो. आज जो यःकश्चित्

---

१ जवानमर्द ब्राह्मणभाई—बापू गोखले हें पुस्तक वाचून पहावें.

तो चार दोन वर्षांत पंडितंमन्यतेस पोंचतो, वगैरे उदाहरणें दररहमेश आमच्या नजरेपुढें घडून येतात. तेव्हां तिकडे पाहून आपणांस शिकावयाचें तें एवढेंच कीं, आज स्थिति आहे तीच कांहीं सारखी कायम रहावयाची नाहीं. तिजमध्यें फेरबदल हा होणारच! आपण एकाद्या धंद्याचा आरंभ केला आणि तो तसाच अखरेपर्यंत राहील याचा काय नेम? रोजच्या रोज नवें आहे. तुर्कीभाषेंत एक ह्मण आहे "संपत्ति येतांना लंगडत हळू हळू येते आणि जातांना धुम धांवत सुटते." याचा अर्थ सर्वांस स्पष्ट कळला असेलच. यास्तव जास्त विस्तार न वाढवितां थोडक्यांत ह्मणावयाचें ह्मणजे एवढेंच कीं, इच्छा आणि आवड उत्पन्न होण्याला प्रारंभीचें क्षुद्र स्वरूप कांहीं आड येऊं देऊं नये.

या दुनयेंत शिकावयाच्या धड्यांपैकीं मोठा कठीण असा धडा ह्मटला ह्मणजे **जरा वाट पहाणें** हा होय. वाट पाहणें ह्मणजे खांद्यावर हात टाकून गुडघ्यावर तोंड टेकत बसणें हें नव्हे, हें मात्र पक्कें ध्यानांत ठेवलें पाहिजे. प्रसंगाशीं झगडावें, टकरांवर टकरा द्याव्यात, एकापेक्षां एक वरचढ अशा अडचणींचा वेढा आपल्या सभोंवतीं पडला ह्मणून धैर्य दाखविलें, होती नव्हती तितकी पराकाष्ठा करून पाहिली, तरी त्याचा कांहीं-एक चांगला परिणाम न होतां उलट जास्त जास्त आणि एकापेक्षां एक वरचढ संकटांची आपणांवर चाल होत आहे असें पाहून-ही न डगमगतां, मागें निसटता पाय न घेतां, उमेदीनें, उत्साहानें, ईर्षापूर्वक पुढें सरसावणें हेंच **खऱ्या थोरपणाचें** लक्षण होय! आणि अशांनाच या दुनयेंत मोल जास्त असतें. एका दिवसांत झाडाला फळ कांहीं येत नाहीं, हळद पितांच गोरेपणा येणें कठीण. अत्युत्कृष्ट फळें अति सावकास पिकत अ-

सतात. याजकरितां कष्टी मेहनत करावी आणि नंतर जरा वाट पहाणें हें तत्त्व चांगलें मनांत ठसूं द्यावें.

प्रफुल्लित स्वभाववृत्ति जयाचें मुख्य लक्षण आहे. पतकरलेल्या कामांत दुप्पट हुरुपानें, मेहनतीनें आणि नेटानें प्रयत्न करण्याला ही स्वभाववृत्ति फार उपयोगी पडते. काय करावें? पोटासाठीं या धंद्यांत अडकून पडलों असें ह्मणून दुर्मुखल्या तोंडानें रडत बसणारे लोक पुष्कळ आढळतात. त्यांचें मन, त्यांनीं पतकरलेल्या धंद्यावर नसतें. यामुळें हा धंदा सोडून तो, तो सोडून दुसरा असें यांचें नेहमीं चालावयाचें. अडचणी, दुःखें, त्रास, क्लेश इत्यादि गोष्टीच तेवढ्या अशांना अगोदर आणि सर्वत्र दिसावयाच्या. पैशाच्या, कीर्तीच्या किंवा संतोषाच्या नांवानें पूज्य, हें हटकून खास त्यांच्या नशीबीं ठेवलेलेंच!

हा धंदा सोडून तो आणि तो सोडून हा, असें करणें याच्यासारखा वेडेपणा दुसरा कोणताच नाहीं. धंद्यांत प्राविण्य मिळविलेल्यांचें एक मुख्य लक्षण हें कीं, ते आपलें तन मन धन सर्व तिकडे घालतात, पतकरलेलें काम आमरणांत सोडीत नाहींत. धंद्यांत नांवलौकिक करावयाचा तर तिकडे आपलें सर्व मन आणि आपला देह सोंपविला पाहिजे. **रंगिनपणा** ह्मणजे एक जालीम दवा आहे. त्याच्याविणें कित्येक धंद्यांत मुळींच चालत नाहीं. आणि तो तरतरीत असण्याला **आवड** आणि **इच्छा** हवी.

हा इतका वेळपर्यंत विवेचन केलें यावरून ध्यानांत धरावयाच्या मुख्य गोष्टी ह्मणजे याच कीं, इच्छा आणि आवड ह्या कार्यप्रवर्तक आहेत; कार्यांत गोडी लागावयाला साहाय्यही त्यांचें हवें आणि सिद्धि मिळवावयाला अवश्य असणाऱ्या श्रमांचें मूळ बीज या दोनींतच असतें. इच्छा आणि आवड यांना वि-

घातक अशा प्रकारचें कोठें कसें वास्तव्य असतें हें चांगलेंसें ठ-
सावें ह्मणून कमी अधिक व इकडला तिकडला मजकूर मध्यें
घालणें भाग पडलें.

---

## प्रकरण ३ रें.

## धंद्यांत अवश्य लागणाऱ्या सवयी.

एकाद्या गोष्टीचा सतत परिपाठ ठेविला ह्मणजे ती **सवय** होते. सवय फार दिवस राहिली कीं तो **स्वभाव** बनलाच. धंद्याच्या पसंतीला एकप्रकारच्या स्वभावाचें साहाय्य लागत असतें. स्वभावाला सवयी अवश्यक आहेत. त्या असल्या ह्मणजे स्वभाव बनवितां येतो, ह्मणजे धंदा कोणताही असला तरी त्याला अनुरूप स्वभाव तयार करण्यास अडचण पडत नाहीं. इत्यादि प्रकारचें चऱ्हाट वळत बसण्यापेक्षां धंदा स्वीकारला ह्मणजे त्यांत पूर्ण व चांगलें यश मिळण्याला कोणकोणत्या सवयींची आवश्यकता आहे याचा विचार करणें जरूर ह्मणून प्रस्तुतच्या प्रकरणांत तो विचार करण्याचें योजिलें आहे.

आपण एकादा धंदा पसंत केला, त्या धंद्याची बरीच माहिती करून घेतली, ह्मणजे, आतां पुढें कसें करावें? स्वतःच्या जबाबदारीवर स्वतंत्र धंदा सुरू करावा? किंवा दुसऱ्या एकाद्या त्या धंदेवाल्याशीं पाती ठेवावी कीं करावें काय ? हे प्रश्न उद्भवतात. यांचा निकाल तुमचा तुह्मीच करूं लागलां अथवा मित्रांस विचारावयाला गेलां किंवा सल्ला कोणाची घेतलीत, अगर पाती करावयास तयार झालांत ह्मणजे त्या धंद्यांत निष्णात आहां काय ? धंद्याला अवश्य अशा सवयी तुह्मांला आहेत? हे प्रश्न हटकून आणि अगोदर पुढें यावयाचेच. कदाचित् धंद्यांत निष्णात असाल, पण धंद्याला आवश्यक अशा सवयी तुह्मांला आहेत किंवा नाहींत याचा कांहीं तरी फाड झालाच पाहिजे.

धंद्याच्या सवयी अनेक आहेत. त्यांत (१) उद्योग, (२) व्यवस्था, (३) सारासारविचार आणि (४) नियमितपणा. ह्यांबद्दलच्या सवयी अगदीं मुख्य होत! यांतील एकाददुसरी सवय असली ह्मणजे पुरे असें व्हावयाचें नाहीं, किंवा प्रसंग पडेल त्या वेळीं आणि लहर लागेल तेव्हां ती करीन असें ह्मणून चालणार नाहीं. सतत, सारख्या, ह्या सवयी असल्या पाहिजेत. तरच तो मनुष्य धंदेवाला होईल. ह्या सवयींच्या बरेवाईटपणावर व वास्तव्यावर धंद्यांतली यशःप्राप्ति पुष्कळ अवलंबून असते. धंद्यामध्यें सुरेख यश संपादन करणाऱ्यांचें खरें भांडवल ह्मणजे या सवयीची पूर्णता एवढेंच! भांडवल मोठें आहे, प्रसंग, वेळ, अनुकूल आहे, आणि या सवयी नाहींत ह्मणजे त्याचा परिणाम अनेक संकटें व मोठें नुकसान हें खास, पुढें वाढून जसें कांहीं ठेवलेलेंच. इतर बाबतींत प्राविण्य मिळविण्याला कदाचित् दुसऱ्या अनेक गोष्टींची अनुकूलता अवश्य असते, तसें कांहीं या सवयीच्या बाबतींत नाहीं. पुनः पुनः तेंच तेंच निश्चयानें केलें कीं ती मग आपोआप सवय बनलीच.

१ **उद्योग**—उपयुक्त विषयांत मनाला किंवा शरीराला उत्साहपूर्वक गुंतविणें याचें नांव उद्योग. ह्याच्या पराक्रमाचा महिमा गावा तेवढा थोडा आहे. आजवर पुष्कळ लोक पुष्कळ प्रकारें ह्याचा माहिमा गाऊन गाऊन थकले आहेत. तथापि चारदोन वाक्यांत सांगावयाचें ह्मणजे उद्योग, लोखंडासच नव्हे तर दगडास सोनें करणारा परीस आहे. उद्योग मोठा शूर योद्धा आहे. त्याच्या पुढें सर्वांस चळचळ कांपावें लागतें, त्याचा सर्वांवर सारखा दरारा आहे. साक्षात् लक्ष्मी या उद्योगाच्या पुढें करभार देत हात जोडून सदा खडी असते. उद्योगाचा शिरकाव नाहीं असें स्थळ नाहीं, असें शास्त्र नाहीं, किंवा कला नाहीं!

२ **व्यवस्था**—उद्योग जें मिळवितो त्याचा नीटनेटका संग्रह करणें **व्यवस्थेचें** काम आहे. घरांत गृहिणी तशी ही धंद्यांत व्यवस्था. कर्तव्याला वेळ व काम नेमून देणें आणि नेमून दिल्याप्रमाणें तें चोपून घेणें हें **व्यवस्थेकडे** सोंपविलें असतें. आणखी व्यवस्था नको असें एकही काम नाहीं किंवा धंदा नाहीं. धंद्यांत किंवा उद्योगांत **व्यवस्थेचें** वास्तव्य नाहीं असें कळलें कीं पुरे; अपयश, दुर्लौकिक आणि नुकसानी ह्यांनीं आपलें तेथें बिऱ्हाड ठोकलेंच. व्यवस्थेची जानपछान नाहीं किंवा व्यवस्थेशीं ज्याचा स्नेह नसतो, आणि तिच्याशीं हरघडी बेबनाव होत असतो त्यानें, उद्योगधंद्यांत पडणें ह्मणजे हानि, अपयश, क्लेश आणि त्रास ह्यांना आमंत्रण देऊन, "दिवाळखोर" हा किताबत मिळविणें होय.

३ **सारासारविचार**—व्यवहारांतल्या शाहाणपणास सारासारविचार असें ह्मणतात. ही सर्वांत श्रेष्ठ सवय होय. ही जितकी श्रेष्ठ व जितकी आवश्यक आहे तितकीच तिचें साग्र वर्णन देण्यास ती कठीण जाणारी आहे. वेळ, पैसा, शब्द इत्यादि सर्वांचा योग्य ठिकाणीं उपयोग करणें, प्रसंगाच्या अनुरोधानें धंद्याला वळण देणें इत्यादि किती तरी गोष्टींचा सारासारविचार या शब्दांत समावेश होतो. अफाट दर्यांत तारूं लोटणाऱ्या तांडेलास वाऱ्यावर लक्ष ठेवून शिडाची योजना करावी लागते; तसाच प्रकार धंद्यांत आहे. जाहाजाला शीड, त्याप्रमाणें उद्योगधंद्याला सारासारविचार. सारासारविचारशक्ति ईश्वराची देणगी, हें तर खरेंच; पण तिला जास्त कमविण्याचा यत्न करणें मनुष्याच्या स्वाधीन आहे. सारासारविचार हा बुद्धीचा परिणाम अगर प्रभाव होय! अजी बुद्धिच नसेल, तर तेथें प्रयत्नाचें कांहींएक चालणें नाहीं! याजपेक्षां जास्त कांही सांगतां येणें कठीण आहे.

४ **नियमितपणा**—घरांतील दरवाजाला बिजागरें असतात तसा हा नियमितपणा धंद्याला बिजागराच्या जागीं आहे. सर्व लोक नियमितपणा मनापासून चाहतात, पण त्याचा स्वीकार करणारे मात्र विरळा. नियमित मनुष्य प्रत्येकाला आवडतो. कारण आपल्या शब्दाची व लोकांच्या सोयीची त्याला किंमत कळते. नियमितपणा सर्वव्यापी आहे; ह्मणजे देवघेव, वेळेची घडामोड, इत्यादि तमाम कामांत नियमितपणा हवा असतो. नियमितपणा हा धंदेवाल्यांस अवश्य असणाऱ्या तमाम गुणांचा मोठा दोस्त आहे. त्याला सोडून ते गुण क्षणभरही राहत नसतात. यास्तव आपल्या धंद्यास अव्याहत त्या सर्व गुणांची सवय आपणांस हवी असेल, तर अगोदर या नियमितपणाची आराधना केली पाहिजे.

उद्योगधंद्यास अवश्य असणाऱ्या मुख्य मुख्य सवयींचें चार दोन शब्दांत वर विवरण केलें आहे. ह्या सवयी लावून घेण्याचा प्रयत्न लहानपणापासूनच झाला पाहिजे. पतकरलेलें काम किंवा उद्योग धिमे धिमे व्यवस्थितपणानें, फार दिवस निभेल, आणि तो शक्तीच्या बाहेर जाणार नाहीं अशा रीतीनेंच केला पाहिजे. असें करण्याला वर सांगितलेल्या सवयींचें अवश्य साहाय्य हवें. लहर लागेल तेव्हां, एकदम, एका झटक्यासरशी, पुष्कळ काम सांचलें ह्मणजे तें करणें, ही पद्धत अगदीं खराब आहे. वाघ बैलापेक्षां किती तरी पट बलवान्! तो बैलाला पाठीवर टाकून सहज उड्या मारीत जातो. पण त्याच्यानें सारखें आणि नियमित काम व्हावयाचें नाहीं! हळू हळू चालत, थोडकें ओझें उचलीत वाघ जाईल हें मुळींच संभवत नाहीं. आपण बैलाच्या ऐवजीं वाघास नांगराला जुंपलें किंवा गाडीला जोडलें, तर त्याच्यानें मैलभर देखील दम धरवणार नाहीं. एरवीं दहा गाड्यांचें किंवा वीस नां-

गराचें ओझें अर्ध मैल सहज उड्या मारीत उचलून नेईल. तसें कांहीं बैलाचें नाहीं. तेव्हां यावरून आपणांस एवढेंच शिकावयाचें कीं, धंदा चालवितांना वाघासारखी काम करण्याची पद्धत बिलकुल नको, बळिवर्दिखानासारखी असावी.

---

## प्रकरण ४ थें.

## पैसा.

मनुष्यमात्रांत पैसा मिळविण्याची साहजिक लालसा किंवा उत्पादकबुद्धि असते तिजवरच मुख्यत्वेंकरून सुधारणा, ऐषआराम आणि सुख इत्यादि गोष्टी अवलंबून असतात. व त्यामुळेंच शाहाणपणा, सद्गुण, हे उदयाला येतात. संपत्ति आणि सद्गुण एकत्र राहणें असाध्य ह्मणून माना वर करीत प्रतिपादणारे पुष्कळ लोक आहेत. ह्मणजे, त्यांच्या मतें संपत्तिमान् पुरुष सद्गुणी असत नाहीं. पण तें त्यांचें मत पोकळ व अगदीं खोटें असें ह्मणण्यास कांहींएक प्रत्यवाय नाहीं. सोनें व रुपें गांठीं बांधण्याची हांव वेडगळपणाची; आणि गरीबी ह्मणजे फार चांगली; त्यांत अनंत सुखें, व सद्गुण आहेत ह्मणून प्रतिपादणाऱ्यांस व्यर्थ कंठशोष करण्यापलीकडे किंवा आपलें हसें करून घेण्याशिवाय जास्त कांहीं साधावयाचें नाहीं. एक इंग्रजी तत्त्ववेत्ता ह्मणतो, "पैशाचा तिरस्कार करणाऱ्यांचा भरंवसा धरूं नका; निराशा झाल्यानें ते तिरस्कार करीत असतील. प्रसंग येतांच अशांचीच झडप अगोदर पडावयाची." पैशाखातर हवें तें करण्यास मनुष्य चुकत नसतो. पैसा मिळतो ह्मटलें कीं, सांगाल तें काम करण्यास हजारों लोक तयार होतात. गंधक सोरा दळणें, नदींत बुड्या मारणें, अंधारखाणींत खणणें किंवा प्रत्यक्ष जिवावर हरवक्तीं अगोदर बेतणार असें समजूनही त्या धंद्यांत शिरण्याला इतकीं मनुष्यें कां बरें हपापलेलीं असतात? बोगदे

पोखरणें, सुरुंग उडविणें, इत्यादि कामें ह्मणजे अगदीं जिवावरचीं, पण त्या धंद्यांत मजुरांची कांहीं कधीं वाण पडत नाहीं ! समुद्रांत बुडी मारून तळच्या शिंपा गोळा करणें, बुडलेल्या जाहाजांतलें सामान शोधणें, हीं कामें कांहीं कमी धोक्याचीं नव्हत. विहिरींत एकादें आपलें भांडें पडलें असलें, तर तें काढून देण्याला पाण-बुड्याची कांहीं कधीं कमतरता नसते. तर असें कां बरें व्हावें ? प्राणापेक्षां प्यार, सुखाहून जास्त प्रियकर पैसा आहे असें त्यांना वाटतें ह्मणूनच ना ? श्रम, संकटें, भीति आणि दुःख इत्यादि तमाम मंडळी पैसा दिसला कीं दूर पळते. आतां कदाचित् पैशाची फाजील हांव तिरस्करणीय असेल व ती निंद्यही होय. एकादे वेळ पैशाचा लोभ पतकरला, पण दारिद्र्यांतला उघळेपणा नको. श्रीमंतींतलें दुःख दरिद्रीपणांतल्या संकटापेक्षां हजारपटीनें बरें, असें कोणीही कबूल करील. सदोदित पोटाची भ्रांत व दुखणें-बाणें किंवा असमानीसुलतानी आली तर कसें करूं, ही विवंचना पाठीस लागलेल्या दारिद्र्याच्या हातून, एकादें परोपकारी किंवा कल्याणप्रद महत्कृत्य शेवटास जाण्याचा संभव बिलकुल नसतो. हरघडी दुष्टवासनांचा गराडा दारिद्र्याच्या पाठीमागें असण्याचा संभव फार. तशी गोष्ट पैसेवाल्यांची असत नाहीं. आतां हें खरें आहे कीं, उखार व कमकस अशा दरिद्रभूमींत केव्हां केव्हां सद्गुणांचें पीक मोठ्या बहारीनें येतें आणि त्याचप्रमाणें उद्योग, प्रामाणिकपणा, औदार्य, संकटकाळांत व अडचणींत न चळणारा दृढनिश्चय एवढेंच नव्हे, तर नम्रता, तृप्ति, प्रखर स्वहितत्याग, ममताळू मन, ईश्वरावरील निश्चल विश्वास इत्यादि प्रकार—दारिद्र्यांतल्या दारिद्र्यांत, आणि त्यांतून जेथें समृद्धीचा दिनकर उगवत नाहीं. प्रामाणिकपणा हताशदृष्टीनें कपाळास आंठ्या घालून बसला असतांना आणि ईश्वराच्या भलेप-

णाबद्दल तिटकारा येऊन मानवी निर्बंधांस झुगारून देण्याची वेळ आलेली असूनही—अगदीं खुललेले दिसतात ! परंतु हे प्रकार निवळ दरिद्रीपणांतच अनुभवास यावयाचे असें ह्मणणें मात्र कोणास खपावयाचें नाहीं. दारिद्य नसतांनाही हे प्रकार अनुभवावयास मिळणें हें शक्य आहे.

गरीबी असते ह्मणूनच त्यांतील चांगुलपणाची थोरवी गायिली पाहिजे, इतकेंच. एरवीं गरीबी कोणीही पतकरणार नाहीं. इलाजच नाहीं, आणि मुद्दाम अपमान सहन करण्यापेक्षां ही बरी, असा प्रसंग असेल तर ती गोष्ट निराळी; पण हरघडी मनोविकारांला कावरेंबावरें करून सोडणारी, किंचित् घसरती बाजू आली कीं आप्त इष्टांस जड वाटविणारी आणि निस्पृहपणास हुसकून लावणारी ही गरीबी, कोणीही व कधींच आपण होऊन पतकरणार नाहीं. हें दरिद्र वृद्धापकाळीं परमयातनेचें माहेरघर होऊन स्वाधीनता गेल्यामुळें तें निमूटपणें टिपें गाळीत सहन करणें भाग पडतें, यासाठींच ह्मातारपणाकरितां प्रत्येकास कांहीं संचय हा करून ठेविलाच पाहिजे. ह्मातारपणीं संकटावस्था, अन्नाची भ्रांत, ह्मणजे तरुणपणाचा अपव्यय–दुर्व्यसनानें नसेल कदाचित्, पण मूर्खपणानें–केला असें न बोलतां सांगणें होय. यास्तव पैशाचा लोभ नको; मिळविण्याची खटपट करूं नये वगैरे पोकळ व आळशीपणाच्या गोष्टींत मुळींच अर्थ नाहीं. पैशाच्या समृद्धींत, प्रामाणिकपणा, न्यायबुद्धि, औदार्य, धर्मवासना, पुढला सारासारविचार, निरपेक्षपणा इत्यादि सद्गुणांची उदय पावण्याची वेळ असते, ही गोष्ट खचीत खरी; खोटी नव्हे. समृद्धीमध्यें कांहीं दुर्गुण असतात, पण ते विरळा किंवा क्षुल्लक. समृद्धींत दुर्गुणांचा प्रादुर्भाव होत असतो त्यास समृद्धि हें सर्वांशीं कारण नसतें. आणि तसें पाहिलें तर दारिद्यावस्थेंतही दुर्गुण ओतप्रोत भरलेले

असतात, ह्मणून दुर्गुणांस सर्वांशीं कारण दरिद्र असें ह्मणणें निर्दोषी होणार नाहीं. दुर्गुणांचीं कारणें निराळींच आहेत. असो. द्रव्यसंपादन, संरक्षण, व्यय, दान आणि त्याचा व्यवहार–देणें घेणें– वगैरे उत्तम तऱ्हेनें करणें हें मनुष्याच्या शहाणपणाचें मुख्य लक्षण आहे.

पैसा किंवा पैशाची गरज, मनुष्यमात्रास उद्योगाला प्रवृत्त करणारी आदि शक्ति होय. कुशाग्र बुद्धि, कौशल्य, कल्पकता, चातुर्य यांस आपापलें काम करून करामत दाखवावयास लावणारा हा पैसाच. या दुनयेंत जिकडल्या तिकडे जो तो पदार्थ व्यवस्थितपणानें आहे याचें कारण पैशाची गरज हें होय! पदरीं गरीबी असते, रात्रंदिवस पोट कसें भरेल ही काळजी असते, हातातोंडाची गांठ कशी पडेल ही भ्रांत असते ह्मणून तर या जगांतला कारभार सुरळीत चालला आहे. पण तो पैशावर अवलंबून. मनुष्य श्रम करितो, आत्मसंयमन करण्याला शिकतो, याचें कारण पैशाची लालसा. आणि हेंच उमदें शिक्षण होय! भरज्वानीच्या दिवसांत अनुकूलतेप्रमाणें, आपल्या आंगच्या असतील नसतील त्या गुणांवर अनेक मनोवृत्तींस अंकित ठेवून पैसा गांठीं घालणें, आपत्कालाची स्मरणपूर्वक भीति बाळगून हुशारीनें वागणें, हें शहाणपणाचें मुख्य लक्षण होय. पैशाचा व्यय मनुष्यमात्राच्या स्वभावावर अवलंबून आहे. ह्मणजे पैसा स्वभाव होय. पैसा स्वभाव तसाच पैसा सामर्थ्य किंवा शक्ति आहे. पैशाच्या योगानें सुख होतें, त्याचप्रमाणें पैशामुळें वजन पुष्कळ बसतें. स्वभाव, इभ्रत, दबदबा, लौकिक आणि मान यांचा प्रभाव होणें या जगांत तरी निदान पुष्कळ अंशीं पैशावरच अवलंबून आहे. एका संस्कृत कवीनें ह्मटलेंच आहे कीं, पैसेवालाच मनुष्य कुलीन, पंडित, शास्त्रज्ञ, वक्ता आणि सुंदर.

फार काय सांगावें, सर्व गुणांचें अधिष्ठान काय तो पैसा. पैशाच्या जोरावर क्षुद्र मनुष्यही महत्कृत्यें करूं शकतो. पैसा नाहीं आणि शहाणपणा ओतप्रोत भरला आहे, तर तो बिचारा केवळ पंगू, कांहींएक त्याच्या हातून व्हावयाचें नाहीं! नीति, पांडित्य, वक्तृत्व इत्यादिकांची योग्यता मोठी, त्यांला सर्वत्र मान असतो, नुसत्या द्रव्याचें तेज त्यांच्यापुढें अगदीं फिकें पडतें. गोष्ट खरी आहे. पण त्या सर्वांला पैशाचें पाठबळ असलें ह्मणजे जी काय बहार असते ती निराळीच. त्यांच्या योगानें लोकांवर हुकमत चालत नाहीं, लोकांकडून वाहवा किंवा शाबासकी मिळते इतकीच. सुंदर पुष्पांनीं डवरलेलें झाड जमिनींत असतें त्या वेळची मजा आणि तेंच झाड उपडून काढल्यानंतरची त्या पुष्पांची स्थिति यांत जें अंतर तेंच, द्रव्यसंग्रह असून पांडित्य व नीतिमत्ता यांची बहारी आणि कंगालपणीं यांची प्रफुल्लता, यांत आहे. नुसत्या जमिनीला कोणी विचारणार नाहीं, पण त्याच जमिनीपासून त्या सुंदर पुष्पांना जो कांहीं रस, सौरभ व जोम पोंचतो त्याचीच मातब्बरी विशेष. समाजांत मान्यता व श्रेष्ठत्व सर्वस्वी पैशावर, हें कांहीं कोणास सांगावयास नको. सलाम, रामराम, आणि नमस्कार ओंझळीओंझळीनें येतात ते पैशाच्या जोरावर. जी, सरकार, साहेब, ह्मणून लोक थुंकी झेलतात ती या पैशाखातर. असे प्रकार कितीतरी दाखवितां येतील. शिवाय पैसा ह्मणजे काय,-सुग्रास व पौष्टिक अन्न, उबदार व सुंदर पोषाख, रमणीय व बंदोबस्ताचें मंदिर, कळकळीचा प्राणप्रिय दोस्त, साक्षात् धन्वंतऱ्यांस आणून हजर करणारा सेवक.

तेंच निर्धनतेचें पहा. मृच्छकटिक नाटकांतील चारुदत्ताचीं भाषणेंच पुरत. याजपेक्षां जास्त प्रभाव त्या दारिद्र्याचा गाणें तो काय उरला?

## आर्या.

"दारिद्य, मरण, यांतुनि मरण बरें वा दरिद्रता खोटी ॥
**मरणांत दुःख थोडें,** दारिद्यांत व्यथा असे मोठी ॥ १ ॥

## ओंव्या.

दारिद्य लज्जेचें कारण । लज्जा करी तेजाचें हरण ॥
निस्तेज पुरुषास अपमान । पदोपदीं होतसे ॥ १ ॥
अपमान निर्वेदा उठवी । निर्वेद शोकातें पेटवी ॥
शोक, बुद्धीतें आटवी । निःशेषपणें ॥ २ ॥

## श्लोक.

चिंतेचें घर हेंच वैर दुसरें, लोकांत होतें सदा ।
निंदामित्र जनांत कारण निजद्वेषास हें सर्वदा ॥
जाया बुद्धि वनास देइ सहसा जाया सदा लाजवी ।
शोकाग्नीहृदयस्थ हा परि तनू जाळी न संतापवी ॥ १ ॥
निर्द्रव्या पुरुषा न बंधुजनही साह्यास संतोषिती ।
त्याचे जे प्रियमित्र तेहि फिरती आपत्तिही वाढती ॥
जातें सत्व लयास शीलविधुची कांति क्षया पावती ।
जें केलें जन पापकर्म इतरीं तें त्याकडे लाविती ॥ २ ॥
त्याची संगत कोणिहि न करिती त्या मान कोठें नसे ।
जातां तो धनिच्या घरा सुवचनें त्याला न कोणी पुसे ॥
थोरांपासुनि दूर दूर फिरतो लाजून दुर्वस्त्रक ।
वाटे निर्धनता मला खचित हें साव्वें महापातक ॥ ३ ॥"

यास्तव द्रव्याची निंदा किंवा दारिद्याचा लटका प्रभाव गाण्याचें आपण सोडून द्यावें हें बरें. पैशाच्या नादीं गुंतून लोक दुःखांत पडलेल्या लोकांपेक्षां पैशाची वास्तविक योग्यता न कळल्यामुळें नागविलेल्यांची संख्या खरोखर जास्त आहे. एकंदरींत पैसा हा चांगला. तो प्रत्येकानें मिळविला पाहिजे. आपली

भाकर आपण मिळवावी, आपली अडचण आपण दूर करावी, ह्यासाठीं द्रव्योपार्जन अवश्य हवें आहे. पण त्याच्या नादीं लागून मानहानि होईल, क्षुद्रपणा पतकरावा लागेल, बेशरम व्हावयाचा वखत येईल, असे मार्ग कदापि पतकरूं नयेत. पैशाच्या लालुचीस भुलून मनाची टोंचणी सुरू होईल असें करणें ह्मणजे तो मोठा मूर्खपणा व पाजीपणा आहे; उदात्त विचाराला मुकवून रसिकतेला ठार करणारी द्रव्यतृष्णा निंद्य होय; सृष्टिचमत्कार व कौशल्यकौतुक तुच्छ वाटविणारी द्रव्यतृष्णा कुचकामाची; सद्गुण व दुर्गुण, खरें आणि खोटें, बरें आणि वाईट यांच्यांतील भेदाभेदाकडे दुर्लक्ष करून ईश्वरधर्म, आचार वगैरेंस गुंडाळून नेणारी द्रव्यतृष्णा खरोखर त्याज्य आहे; सर्व विचार आपणाकडेच आकर्षणारी, खाणेंपिणें, आनंदमौज यांस विसरून ज्ञान, कला, करमणूक यांस लाथाडणारी द्रव्यतृष्णा खचीत गर्हणीय हें मात्र कोणीं विसरतां कामा नये.

यास्तव पैसा कसा मिळेल ह्मणून रात्रंदिवस जप करीत बसणाऱ्यानें पैशाची वास्तविक खरी योग्यता काय हें अगोदर समजून घ्यावें. पैसा ह्मणजे परब्रह्म, पैसा मिळविणेंच मुख्य कर्तव्य, पैसाच सर्व जग असें त्यानें मानतां कामा नये. किंवा पैसा ह्मणजे कःपदार्थ, तो सर्व दुःखाचें मूळ, पापाचें कारण, अशा प्रकारच्या थोतांडी वेदांतांत शिरूं नये. मात्र पोट भरण्यापुरतीच मिळविण्याची तृप्ति नसावी, किंवा खूप संग्रह करण्याची हपाप नको, हें त्यानें पक्कें ध्यानांत ठेवावें. आतां तो पैसा कसा मिळवावा याचें विवेचन करणें राहिलें. पण अमुक तऱ्हेनें पैसा मिळवावा, असें करावें आणि तसें केलें पाहिजे अशा शिकविलेल्या बुद्धीनें श्रीमंत थोड्यांसच होतां येणार आहे. तथापि सारें रामायण एका श्लोकांत आणिलें तसें सर्व विवेचनाचें सार

ह्मणजे **मेहनत केली पाहिजे, अल्पारंभानें सुरुवात करावी, काटकसरीनें बेताबाताचा खर्च ठेवावा, कर्जाची पछानत नको** आणि **मागलापुढला विचार सदा पहावा,** एवढेंच सांगणें होय. कल्पक कारागीर, अटोकाट धोरणाचा राज्यकार्यधुरंधर, सुरस वक्ता, रसिक कवि किंवा जगन्मान्य विद्वान् होणें क्वचितच पुष्कळांस साधतें. असे कित्येक धंदे आहेत कीं, लागेल तितकी मेहनत अगर हवा तितका व्यासंग केला तरी यश:सिद्धि ह्मणून त्यांत मिळावयाचीच नाहीं. तशी गोष्ट द्रव्य मिळविण्याची नाहीं. प्रखर बुद्धि नको किंवा लोकोत्तर गुण नकोत. उद्योग, उमेद, सारासारविचार आणि प्रबळ इच्छा असली कीं पुरे. नवकोटी नारायण त्याला कदाचित् होतां येणार नाहीं ! पण अन्नाची भ्रांत, दारिद्र्याचा मारा तरी तो चुकवील हें खास.

आपली प्राप्ति काय ? आपला खर्च कोठें फाजील होतो ? आपणास लागतें काय ? या प्रश्नांचा आस्थापूर्वक विचार करणाऱ्याला बहुधा उद्योग केल्याशिवाय ह्मणजे निर्वाहाचीं साधनें मिळविल्याशिवाय राहवावयाचें नाहीं. आपल्या कामांत तत्पर व हुषार असलें पाहिजे हें विसरतां कामा नये. खूब मेहनत करून तत्परतेनें पैसा मिळविला, पण, हुषारी न बाळगतां तो पैसा वापरूं लागलें ह्मणजे पैसा मिळवून न मिळवून सारखाच. नुस्ता जास्त पैसा मिळविला ह्मणजे श्रीमंती येत नाहीं. जसें नुस्तें फार खाल्ल्यानें शक्ति येणें कठीण. तर आपण मिळवितों तें राखलें पाहिजे. आपली किफायत संभाळतां येणें ( किफायतीच्या मानानें खर्च हात राखून करणें, चार पैसे शिल्लक टाकणें ) ह्मणजे उपासमार, बंदेगुलामगिरी टाळणें होय. खूब पैसे मिळविले आणि त्याच मानानें खूब उधळले तर दुर्गुण जास्त जास्त

जडत जातात एक, व किफायतीचीं साधनें एकाएकींच कांहीं अपरिहार्य कारणानें बंद पडलीं, (उदाहरणार्थ, नौकरी गेली, रोजगार बुडाला,) तर उपासमार—शिल्लक नसल्यानें—पतकरावी किंवा कोणाचा किंकर व्हावें हें दुसरें. आणि पुनः पूर्वीचरणाबद्दल पश्चात्ताप करीत तळमळावें हें वर. एक धंदा सुटला आणि आपणास गति आहे त्या धंद्याचा चालता [illegible] गेला ह्मणजे दुसरा पतकरण्याला पंचाईतच. यास्तव होतां होईल तों प्रत्येक मनुष्यानें आपल्या प्राप्तीचा कांहीं ना कांहीं तरी भाग राखून हा ठेविलाच पाहिजे. प्राप्ति थोडी, उत्पन्न भिकारडें आणि त्यांत शिल्लक ती काय रडकी टाकावी? अशा प्रकारचे विचार निव्वळ मूर्खपणाचेच होत. 'थेंबें थेंबें तळें सांचे' एवढी ह्मणच त्यांच्या विचाराला वस्स आहे. किरकोळी शिल्लक कां होईना, ठेवितां येत नाहीं याचें कारण काटकसरीच्या मूलतत्त्वाचा अभाव हेंच होय. काटकसर ह्मणजे हलकेपणा ही एक मूर्ख समजूत पुष्कळांच्या मनाची असते. पण गरज पडतांच दांत विचकणें हा काय कमी अपमान? काटकसरीचा आपल्या मनांतल्या मनांत घुटमळणारा हलकेपणा बरा, कीं लोकांत—चारचौघांत उघडा पडणारा हलकेपणा बरा? काटकसर मनुष्यालाच नव्हे, तर ती राष्ट्राला सुखासमाधानाचे दिवस दाखविते! हिंदुस्थान देश दरिद्री, कंगाल, भिकारडा कां? तर त्यांतील लोकांची शिल्लक सालिना आणि दरमाणशीं **चार आणे**सुद्धां नाहीं ह्मणून. तेच इंग्लंडचे **त्रेसष्ट** रुपये! व्यक्तिमात्राची श्रीमंती तीच राष्ट्राची. व्यक्तिमात्र सधन झाला कीं राष्ट्र झालेंच. आणखी व्यक्तिमात्राचें काय आणि राष्ट्राचें काय एक मुख्य कर्तव्य आहे तें हेंच कीं, पैशाचा दुरुपयोग करितां कामा नये. प्रत्यक्ष **ईश्वरा**ला उधळेपणा करतां येत नाहीं. मग मनुष्याची गोष्ट कशाला बोलावी? ई-

श्वरी योजना काटकसरीनें जशी काय आंखलेली असते. मग आह्मां मनुष्यांनींच ती काटकसर हलकेपणाचें व भिकारपणाचें लक्षण असें कां मानावें? ईश्वरनिर्मित सृष्टीमध्यें या काटकसरीचें केवढें साम्राज्य आहे हें सहज कळून येईल. नासका पाला, कुजकीं लांकडें तर राहूं द्या, पण एकाचें शेण तें दुसऱ्याचें अन्न, दुसऱ्याचें अन्न, तें तिसऱ्याचें शेण[1], एकाचा केरकचरा तो दुसऱ्याची धनदौलत, असें एकसारखें जिकडे तिकडे चाललेलें आहे. झाडाचीं पानें गळून वाळून कुजून पडलीं तर धान्यधुन्याचें तें पौष्टिक अन्न–खत–होतें. गुरेंढोरें चारा खाऊन मल विसर्जन करतात तो धान्याचें भक्ष्य आणि माणसाचें अन्न रांधण्याचें साधन असे ईश्वराचे प्रकार सर्वत्र व प्रत्येक बाबतींत आहेत. मग माणसांनींच कां तसें करूं नये?

**कर्जबामा**चीही गोष्ट तशीच आहे. काटकसरीचा अभाव ह्मणजेच कर्जाची स्वारी. कर्ज काढावयाचें नाहीं हें अगोदर ठरवावें. जगांत वागणाऱ्याला खोटेपणा फार वाईट. आणि तो खोटेपणाच तर या कर्जाचें वाहन. घरांत कर्ज शिरलें कीं दारांत खोटेपणा खडा उभा राहिलाच. धुळीस मिळालेल्या लोकांच्या दुर्दैवाचा ओनामा बहुतकरून हें कर्ज घालून देत असतें. कर्जाचा प्रभाव सर्वांस माहीत आहेच. उपासमार एकादे वेळ पतकरली पण दारिद्र्यरूपी पेल्यांत दुःख, खोटेपणा, अपमान यांचें मिश्रीकरणरूप सरबत नको! तें जलाल विष आहे. पण दिसण्यांत कसें सुरेख! त्याची गोडी राहो, पण त्याचा वास देखील कोणीं घेऊं नये, त्यांतच कल्याण, खरें कल्याण–स्वतःचें, स्वतःच्या पोरांबाळांचें, आणि कुटुंबाचें–आहे; हें विसरूं नये.

---

१ श्रीमंतांकडील हत्ती, घोडे यांचा मळ गाईम्हशींचें पौष्टिक अन्न होतें, हा अनुभव आहेच.

इतका वेळ लिहिलें याचा मथितार्थ ह्मणून इतकाच कीं, १ स्वतःच्या व कुटुंबाच्या गरजा भागविण्याइतका व भागविण्यासाठीं पैसा हा प्रत्येकाला मिळविला पाहिजे; २ आपल्या कुटुंबाच्या व आपल्या देशाच्या कल्याणाखातर व भरभराटीसाठीं होतां होईल तितका जास्त पैसा मिळविणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. आणखी एक महान् विद्वान् गृहस्थ ह्मणतो "दरिद्री रहावयाचें नाहीं असा निश्चय करा, कांहींही प्राप्ति असो, त्या मानानें खर्च कमी असूं द्या. दारिद्य आमच्या सुखाचा मोठा वाईट दुस्मान आहे. तें स्वातंत्र्याला दंश करून प्राण घेतें; सद्गुणांचा विध्वंस करितें व कांहीं गुणांची मुलाखतच करूं देत नाहीं. मनुष्याला गुलामगिरींत लोटून देणारें हें दारिद्य. जगांत मान वर करून चालूं न देणारें पिशाच हें दारिद्य." इकडे दूर लक्ष्य असूं द्या.

---

## प्रकरण ४ थें.

## धंदे.

पैसा मिळवावयाला कांहीं तरी उद्योग किंवा कोणता तरी धंदा लागतो. पैसा कांहीं रानावनांत फळांपुष्पांसारखा आपोआप पिकत नाहीं किंवा पाऊस पडतो तसा तो पडत नाहीं: अभ्यास करावा तेव्हां विद्या येते, स्वयंपाक करावा तेव्हां अन्न मिळतें, अगर पेरावें तेव्हां धान्य उगवतें. तसें पैसा मिळवावयाचा तर उद्योग केला पाहिजे. ह्मणून धंदा स्वीकारणें भाग, हें अगदीं निश्चित आहे. या दुनयेंत जिवंत राहण्याला आणि सुख समाधान प्राप्त होण्याला मुख्य साधन पैसा. पैशाशिवाय काड़ीसुद्धां हालावयाची नाहीं. इत्यादि गोष्टी, पैसा हें प्रकरण वाचून किंवा जगाच्या अनुभवावरून कळल्या असतील. तेव्हां पैसा प्रत्येक मनुष्याला हवा आहे.

पैसा मिळवावा असें प्रत्येकाला हरघडीला वाटतें आणि दरएक मनुष्य पैसा पैसा करीतच भटकत असतो, यांत विशेषसें नवल नाहीं. कांहींही धंदा करावा, कोणताही उद्योग करावा, मात्र स्वस्थ बसूं नये, ह्मणजे पैसा हा मिळतोच. पण पैसा मिळविण्याचीं साधनें कोणतीं, कोणत्या साधनांत किती पैसा मिळतो, कोणतें साधन कशापेक्षां कसें चांगलें, आपणास कोणतें साधन कसें, कोठें, उपयोगीं पडेल याचा विचार करून मग स्वतःची धमक, बुद्धीची करामत, प्रसंगाची अनुकूलता, वगैरेंच्या धोरणानें पूर्ण विचार व चांगला आगापिच्छा पाहून धंद्याची सुरुवात करणें हें शहाणपणाचें व विनधोक्याचें काम आहे. यास्तव धंदे कोणकोणते आहेत, कोणते कशा स्थितीचे, कोठें कशा सोयी किंवा गैरसोयी आहेत याचा विचार केला पाहिजे.

आणि असा विचार करावयाचा ह्मणजे एकंदर धंदे आणि त्यांची तुलना यांजकडे अगोदर लक्ष्य देऊं. आजमितीचें कालमान, आणि त्यांतून आपल्या देशाचें, पाहिलें तर १ व्यापारउदीम, २ शेतीभाती, ३ कलाकौशल्य आणि ४ चाकरीनौकरी. हे मुख्य धनोत्पादक धंदे आहेत. आणखी हे जे वर सांगितले ते मुख्य वर्ग होत. त्यांत पोटभेद पुनः आहेतच; जसें (१) व्यापारउदिमांतः—१ अडत, २ दलाली, ३ घाऊक, ४ किरकोळी, ५ आयात, ६ निर्गत, ७ सराफी. (२) शेतीभातींतः—१ स्वतःची, २ खंडाची, ३ बटाईची; (३) कलाकौशल्यांतः—१ सुतार, २ लोहार, ३ तांबट, ४ घिसाडी, ५ सोनार, ६ शिंपी, ७ गौंडी, ८ कोष्टी ९ रंगारी वगैरे किती तरी. आणि (४) चाकरीनौकरींतः—१ सरकारी, २ व्यापारी, ३ घरगुती. याशिवाय आणखी वैद्य, वकील, अध्यापक, ग्रंथकार, भट पुरोहित, जोशी, पुराणिक, हरिदास हे समाजांतले धंदे आहेत ते निराळेच. तेव्हां हे इतके धंदे आहेत.

या प्रत्येकाबद्दल विवेचन करीत बसणें सध्या शक्य नाहीं. यास्तव १ व्यापारउदीम, २ शेतीभाती, ३ कलाकौशल्य, ४ चाकरीनौकरी आणि ५ मानसिक श्रमाचे उद्योग असे पांच मोठे वर्ग करून प्रत्येकाच्या संबंधानें प्रथमतः विचार करूं. असा हा विचार झाला ह्मणजे मग धंद्याची निवड करण्यालाही ठीक पडेल.

**१ व्यापारउदीम.**—व्यापारउदीम ह्मणजे अगोदर देशाचा प्राण, राष्ट्रांचें वैभव, इभ्रतीचें साधन आणि पोटापाण्याच्या सोयीची चांगली तजवीज. व्यापाराच्या जिवावर लहानसहान शेंबडींलेंबडीं राष्ट्रें जगांत अति बलाढ्य व महान् प्रतापी होतात. व्यापारांतली तराजू, नंगी समशेर काम करणार नाहीं असलालीं कामें हल्लीं करीत आहे, हें आपण पाहतों. तूर्तच्या काळांत किंवा इंग्रजी मन्वतरांत व्यापारानें विराटस्वरूप पतकरलें आहे. व्यापार ह्मणजे जसें एकाद्या राजाचें राज्यच, असा प्रकार आढळतो. आणि व्यापाराला ज्या कांहीं गरजा त्या सर्व पुरविण्याकरितां आप, तेज, वायु हीं महाभूतें हात जोडून पुढें उभीं आहेत. अगाध जलधी पण तो सुद्धां आपल्या छातीवर पाय देऊन ने आण करूं देतो. वगैरे प्रकार कांहीं कोणास नव्यानें सांगावयाला हवेत असें नाहीं. हल्लींच्या मनूंत व्यापारवृद्धीचा अभाव ह्मणजेच अगोदर आक्काबाईचा फेरा असें बेधडक ह्मणण्याला कोणालाच व कधीं दिक्कत बिलकुल वाटावयाची नाहीं. कारण डोळ्यांपुढें आमच्या देशाचें उदाहरण आहेच.

धनोत्पादक धंद्यांत सध्या फलदायक, अल्प चाऱ्यानें पुष्कळ दूध देणारी कामधेनु व्यापारउदीम आहे. "वैकुंठपेंठ" मोरोपंत ह्मणतात त्याप्रमाणें ती प्राप्त होण्यास "नलगे व्याकरणाची न्यायाची घटपटादि खटपट ती." तसाच प्रकार या व्यापाराचा आहे. धाडस, प्रामाणिकपणा, चौकसदृष्टि, व्यवस्थित टापटीप, मागलें पु-

ढलें धोरण आणि चोख जमाखर्च, एवढी सामुग्री असली कीं व्यापार झालाच. मग तो परीस असें समजावें. आणि एवढ्या गोष्टी साधण्याला प्रखर तर्कशास्त्राची किंवा कुशाग्रबुद्धीची अथवा डोकें व डोळेफोड होणाऱ्या दीर्घ अध्ययनाची फारशी–कां, मुळींच गरज–नाहीं म्हटलें तरी चालेल. ईश्वरप्राप्तीला **भक्ति** हें साधन तसेंच व्यापारसिद्धीला **पत** हें मोठें भांडवल आहे. **पत** असण्याला आयास म्हणावेत तर तेही फारसे नाहींत. **पत, धाडस, व्यवस्थितपणा** हा व्यापाराचा जीव आहे. नुकसान होतें किंवा व्यापाराचा प्राण जातो तो या तिहींस **त्रिदोष** झाल्यामुळेंच. सवंग पाहून खरेदी आणि महाग पाहून विक्री, किंवा अमुक ठिकाणची पैदास आणि तमुक ठिकाणीं खप, एवढें ज्ञान असलें व लोकांची अभिरुचि, कालमानाचें धोरण आणि अंगावर घेतलेल्या कामाची व्यवस्था यांत दक्षता असली, म्हणजे व्यापार होतो. एवढें साधण्यास वास्तविक पाहतां फारशी अडचण पडूं नये. आज बीं पेरावें आणि उद्यां—उद्यां देखील नको, लगेच तासानें—फळ ध्यावें अशा प्रकारचा हा व्यापार वृक्ष आहे. एका वर्षांत, महिन्यांत किंवा एका दिवसांत सुद्धां जोमानें तो फारतो. साधनांचा पाठपुरावा त्या मानानें याचा जोर, तेव्हां इतका हा असा सोयीस्कर धंदा आहे.

आतां सोयीस्कर आहे त्याच मानानें दगेखोर हा असलाच पाहिजे. परंतु दगा देतो तो एरवीं द्यावयाचा नाहीं. पदरीं चुकीचें माप टाकून मग तो मानेवर बसतो. आणि चुका होऊं द्यावयाच्या नाहींत असें करणें पुष्कळ अंशीं साधारण मनुष्याच्या सुद्धां स्वाधीन असतें. शिवाय हटकून सिद्धि मिळवीन ही धमक असेल तर या धंद्यांत साध्यतेच्या कामीं बाहेरून कांहीं अडथळे येत नाहींत.

बंगाल्यांतील जूट मद्रासेला भरावयाची आणि मद्रासचें लांकूड गुजराथेला पाठवावयाचें. यांत मूळ ठिकाणची खरेदी दुसऱ्या ठिकाणची विक्री, वाटेंतला खर्च, एवढें पाहिलें आणि वेळ साधली कीं झालें काम. साधारण लिहतांवाचतां येणें, हिशेब करितां आला, इकडली तिकडली माहिती कशी कोठून मिळवावी हें समजलें, कोणत्या ठिकाणीं केव्हां कसा खप होतो हें कळलें किंवा कळून घेण्याचीं साधनें उपलब्ध झालीं, आणि धाडसानें आंगावर काम घेऊन व्यवस्थितपणानें बाहेर पडण्याची टूक साधली कीं व्यापार झाला असें खास समजावें.

हें असें सांगणें सोपें आहे किंवा ही एक बाजू दाखविली, अगर गुलाबाचें फूल दिसलें पण कांटे नाहींत असें कोणांस वाटून लढाईंत ढाल, त्याप्रमाणें व्यापारउदिमांतल्या अडचणी, पुढें करतील हें आह्मांस ठाऊक आहे. व्यापारधंदा पतकरतांना **भांडवल, गर्दी,** (अर्थात पुष्कळ लोकांची चढाओढ) याच काय त्या मोठ्या अडचणी आढळावयाच्या. पण या केवळ शुष्क व दिखाऊच अडचणी होत, यांत कांहीं शंका नाहीं. कारण भांडवल ह्मणजे नुस्ता पैसाच नव्हे. **पत** व हुषारी आहे तर पैशाला कोठें कधीं तोटा पडत नाहीं. लक्षाधीश, करोडोपती असतात त्यांच्या घरांतला सर्व पैसा आपलाच असें पतवाल्या मनुष्यानें बेलाशक समजावें. व्याज दिलें कीं लागेल तितकें **भांडवल पत असल्यास मिळतें,** हा पतवाल्यास अनुभव आहेच. शिवाय काम करण्याची ताकद असली ह्मणजे भांडवलाच्या थैल्या जवळ येऊन पडतात. सध्यां आपण मोठमोठाले व्यापार करणारे व्यापारी पहातों, त्यां सर्वांपाशीं भांडवल जय्यत असतें असा प्रकार सहसा नसतो. रोकड भांडवलाचे व्यापारी फारफार तर शेंकडा १० निघतील, याचें आणून त्याला, त्याचें

नेऊन याला, ही उलाढाल असतेच. तथापि तीही गोष्ट सोडली तरी **पत** आणि **प्राविण्य** हेंच मुख्य भांडवल होय. हीं दोन असलीं ह्मणजे भांडवलवाला मी–मी–ह्मणून पातीदार पुढें येतो. मी स्वतः दहापांच तोडे शिल्लक टाकीन किंवा शिल्लक असलेले घेऊन व्यापार थाटवीन हा विचार कांहीं वाईट नव्हे; तसें होईल तर चांगलेंच. पण तसें होण्याला अवकाश आहे, तोंपर्यंतचा वेळ फुकट जाऊं देऊं नये असें वाटलें, तर, **पत, प्रामाणिकपणा, व्यवस्थितपणा,** आणि **प्राविण्य** इत्यादिकांच्या जोरावर मिळणारें भांडवल कां घेऊं नये? हें कळत नाहीं. काय करावें? मजजवळ भांडवल नाहीं ह्मणत रडगाणें गाणारा बहुतकरून बिनपतीचा, अननुभवी किंवा बिनहिमतीचा असेंच खरें. पातीचा, संभूयसमुत्थानाचा ( सामाईक भांडवलाचा ) आणि स्वतःचा व्यापार वगैरे संबंधानें पुढील एका प्रकरणांत विवेचन करावयाचें आहे, सबब त्याबद्दल येथें जास्त कांहीं लिहिणें नको.

**गर्दी** किंवा **चढाओढ** ह्मणजे पुष्कळ लोक एकाच धंद्याच्या पाठीस लागले आहेत अशी स्थिति पाहून किंवा ऐकून नाउमेद होणें चांगलें नव्हे. गर्दी सदा तळमजल्यांतच, वर अगदीं सामसूम असतें. असें एक वाक्य मागें दिलें आहे तेंच पुनः येथें उतरून घ्यावें लागतें. गर्दी असते खरी, पण ती कोणाची? साधारण अलबत्यागलबत्यांची, ह्मणजे जेमतेम आणि कसेंबसें तरी काम करणाऱ्यांची. निष्णात, पूर्ण पटाईत अशा होतकरूंची **सदा** आणि प्रत्येक धंद्यांत **अवश्य** जरूर असते, असें हवें त्याला विचारा ह्मणजे तो सांगेल. कोणत्याही दुकानीं जा, पेढीवर जा, काय करावें! हवा तसा हुशार आणि प्रामाणिक मनुष्य मिळत नाहीं. मिळेल तर आनंदानें जास्त पैसे

देऊं; आह्मांला मिळतील आणि तोही मिळवील असे उद्गार हरहमेशा ऐकूं येतात. गर्दी आणि चढाओढ आहे तर असा प्रकार कां असावा ? हा असा प्रकार वास्तविक आहे याची कोणाला शंका का येते ? येत असेल तर अनुभव पहा. तेव्हां तात्पर्य काय कीं, **गर्दी** किंवा **चढाओढ** ही नेभळ्या माणसाची समजूत आणि अशी समजूत असेल तर बेहत्तर आहे त्यानें त्या धंद्यांत पडूं नये !

भांडवल नाहीं, काय करावें असे ह्मणणाऱ्यांनीं नुसत्या मेहनतीवर व कौशल्यावर तृप्त राहून आपल्या अंगीं काय कमाई आहे हें चांगलें दाखविलें—अर्थात् कोणाकडे नौकरीचाकरी करून–ह्मणजे भांडवलाची कमतरता पडेल असें का कोणास वाटतें ? आणि वाटत असेल तर **रडत राऊत** घोड्यावर असेंच समजावें.

तेव्हां एकंदरींत पैसा मिळविण्याला अगदीं उत्तम, फार सोपें व अल्प आयासाचें साधन ह्मणजे **व्यापार** असें ह्मणावें लागतें. व्यापारासंबंधानें जास्त विवेचन पुढील एका प्रकरणांत करावयाचें आहे, यास्तव येथेंच हा मजकूर संपविणें भाग आहे.

**२ शेतीभातीः**—सर्व साधनें मिळविण्यापूर्वी पोटाला लागणारा पदार्थ अगोदर हातीं घेतला पाहिजे. पैसा सर्व तयारी करून देतो. गोष्ट खरी आहे. पण केव्हां केव्हां त्या पैशालाही, पोटाला लागणारे पदार्थ देण्याचें सामर्थ्य असत नाहीं. पोटाला लागतें अन्न. तें पैशानें अन्न मिळतें खरें, परंतु पैशाच्या राशी उशाला असूनही अन्नाची भ्रांत पडते, असें पुष्कळ वेळां घडतें. त्यास दुष्काळ हें उदाहरण चांगलें आहे. आपण प्रवासाला निघालों ह्मणजे कधीं कधीं अशी वेळ येते कीं, कडोसरीला रुपये असून पोट भरत नाहीं. अन्न–अनाज–धान्य-

आणि पैसा हीं या संसाररथाला जोडलेलीं दोन जनावरें—घोडे किंवा बैल—समजूं. एकटा पैसा तो रथ ओढण्यास असमर्थ आहे. पण अन्न तें काम करूं शकतें. पैशाविणें अन्नाचें अडत नाहीं, पण अन्नाविणें पैशाचें अडतें, नव्हे, तें नसेल तर त्याचा कांहींच उपयोग नाहीं. तेव्हां अन्न आणि पैसा—नाणें; कारण अन्न हाही पैसाच आहे—यांत अन्न श्रेष्ठ हें सिद्ध झालें.

अन्न देणारा धंदा अगर उद्योग ह्मणजे **शेतकी.** शेतकीनें पोटास लागेल तो पदार्थ मिळवितां येतो. व्यापारानें पैसा मिळतो. धान्यधुन्य, फळेंपुष्पें, झाडपाला इत्यादि अन्नमय वस्तु जमिनींतून उत्पन्न करण्याचा उद्योग ह्मणजेच शेतकी होय. आणि अन्नमय वस्तु तर अवश्य अगोदर मिळविणें हाच "आतां पुढें काय करावें ? पैसा कसा मिळेल ?" या रात्रंदिवसाच्या विवंचनेचा परिहार होय. शिवाय व्यापार ह्मणून जो काय आहे तो या शेतकीवर उड्या मारणारा. शेतकी डबघाईस आली कीं व्यापारानें हात सोडलाच! शेतकीच्या धंद्यांत जी मेहनत केली त्याचा फायदा दाखविणें हें काम व्यापाराचें आहे. अशा प्रकारचा परस्पर संबंध जास्त वेळ खर्चून मनावर ठसवीत बसणें व्यर्थ श्रमाचें काम होईल. कारण थोडीशी विचारशक्ति असणाऱ्याला सुद्धां या गोष्टी स्पष्ट आणि सत्वर कळण्याजोग्या आहेत. याजकरितां **शेतीभाती** हा धंदा "पैसा कसा मिळेल ?" ही विवंचना दूर करण्याला चांगला समर्थ आहे. पण तो पतकरण्याला व्यापारापेक्षां जास्त अडचणी प्रथमदर्शनीं दिसतात. तरी या धंद्याला, व्यापाराला लागते इतकी सुद्धां सामुग्री नको; वेळेवार, यथायोग्य काम केलें कीं संपलें. पाऊस पडावयाचा तो वेळेवार पडतो, ईश्वर तें आपलें काम करतोच; फक्त मेहनत आणि नोका साधणें आपलें काम असतें. चांगलीं आऊतें, धष्टपुष्ट ज-

नावरें, विपुल खातमूत, चांगलें बीं बियाणें यांची योजना वेळेवार आणि यथायोग्य केली ह्मणजे आपल्याकडील काम झालें. बाकीच्या गोष्टी ईश्वराधीन, असेंच हवें असल्यास समजूं. हीं एवढीं साधनें मिळवावयाचीं ह्मणजे त्याला व्यापाराइतकी सुद्धां दगदग नाहीं कीं, अक्कल नको. जमीन, पैसा, आणि ( शेतकीचें ) **ज्ञान** असलें ह्मणजे झालें. मेहनत मनुष्यांकडून व जनावरांकडून करवावी लागते. त्याला तत्परता असावी आणि आळस नसला ह्मणजे पुरे झालें. हें ज्ञान घोकून, किंवा जाग्रणें करून संपादावयाचें नसलें तरी अनुभवानें, ऐकून, वाचून मिळवावें लागतें.

आतां बाकी उरला **पैसा**, त्याचा व्यापारसदराखालीं समावेश केला आहे. शेतकीला प्रारंभ करण्याला स्वतःचीच आणि परंपरागत चालत आलेली वडिलोपार्जित जमीनच हवी असें नाहीं. रहावयाला घर हवें ह्मणून तें बांधण्याची किंवा पाया खोदण्याची तयारी करण्याला नको; दुसऱ्याच्या भाड्याच्या घरांत सध्यां राहावें आणि मागाहून हळू हळू हात साधेल त्याप्रमाणें तजवीज करावयाची एवढी **इच्छा** असली ह्मणजे वस्स आहे. आणखी असें कीं, जमिनीची अडचण अशी इतकी कांहीं वाटावयाला नको; याचें कारण हल्लींची शेतकीची स्थिति होय. ती कशी काय आहे हें पुढील प्रकरणांत पाहवयास मिळेल. आतां उरला प्रश्न **गर्दी**चा अगर **चढाओढी**चा. दुर्दैवानें वाजवीपेक्षां फाजील, कोठें, कोणत्याच देशांत आढळणार नाहीं इतकी **गर्दी** या धंद्यांत आपल्या इकडे आहे. ती लौकर मोडत जाईल तर बरें. पण तसें केव्हां घडेल याचा कांहीं आतांच नेम सांगवत नाहीं. तथापि इतकी नको अशी गर्दी आहे ह्मणून नाउमेद होण्याचें मात्र कारण नाहीं. कारण हजार

वांसे किडके, नासके, वाईट असे आहेत ह्मणून चांगले नकोत असें कधीं कांहीं कोणाला ह्मणतां यावयाचें नाहीं. तेव्हां आतां पुढें काय करावें? पैसा कसा मिळेल? ह्मणून जप करणाऱ्यांनीं शेतकीदेवीची प्रार्थना केल्यास इच्छितफलप्राप्ति निःसंशय होईल.

**३. कलाकौशल्य.** यांत अनेक धंद्यांचा समावेश होतो. पोटाला अन्न मिळालें ह्मणजे बाकीच्या एकंदर अवश्य व चैनीच्या वस्तु मिळविणें आणि आपणांला श्रम न पडतां आराम मिळणें हीं कामें या धंद्याचीं. वस्त्रपात्र, भांडींकुंडीं वगैरे तमाम वस्तु मिळण्यासाठीं या धंद्याची व या धंद्यांतील लोकांची प्रार्थना करावी लागते. पदार्थमात्रांत उच्च आणि नीच असे दोन भेदाभेद असतात. तसे ह्यांत एक श्रेष्ठ कलाकौशल्य आणि दुसरा साधारण कलाकौशल्य असे आपण दोन मोठे भेद कल्पिले तर सध्यांच्या काळांतल्या मानाप्रमाणें हाताचें कलाकौशल्य व यांत्रिक कलाकौशल्य असे मोठे दोन विभाग आपणांस पाडतां येतील. पाश्चात्य राष्ट्रांमध्यें अनेक शास्त्रीय शोध करून ईश्वरनिर्मित पंच महाभूतांना मनुष्यांचे किंकर, दासानुदास बनविलें आहे. त्या पंच महाभूतांची शक्ति प्रचंड, प्रताप मोठा, स्वरूप भयंकर त्या मानानें तीं कामें करितात तींही अचाट. हजार, लाख मनुष्यें वर्षांनुवर्षें खपून काम करितील किंवा नाहीं याची शंका येईल असलीं कामें हीं पंच महाभूतें अवघ्या एका दिवसांत आणि एकसारख्या तडाक्यानें उडवून देत आहेत. हें आह्मी डोळ्यांनीं आज पाहतों. आगगाड्या, आगबोटी, गिरण्या, तारायंत्र वगैरे लक्षावधि गोष्टी या ह्मणण्याचीं उदाहरणें आहेत. ज्या शास्त्रीय शोधानें, ज्या अद्भुत यंत्रसामर्थ्यानें आणि ज्या अचाट कल्पनेनें देवादिकांस साध्य होतील किंवा नाहीं याचाही वानवाच वाटावा अशा प्रकारचीं थक्क करून सोडणारीं कृत्यें आमच्या डोळ्यांपुढें परके, परदेशचे लोक दाखवीत

आहेत. हें असें आहे पहा असें ह्मणताहेत, मनांत आणूं तर आह्मांसही तसें होण्याला किंवा करण्याला प्रत्यवाय कोणताच येणें नाहीं; असा प्रकार असून तिकडे कानाडोळा करणें हा शहाणपणा कोणी तरी समजत असतील काय ? वाफेची शक्ति, विद्युल्लतेचा प्रभाव, सूर्यकिरणांचा चमत्कार इत्यादि सर्व गोष्टी आह्मी दररोज डोळे उघडून हरवक्तीं व हरठिकाणीं पहात आहों; त्या शक्तीचा उपयोग कसा करावा ? उपयोग करण्यांत कोठें कोणतें कौशल्य आहे हें समजून घेण्याचीं साधनें आह्मांस सुलभ आहेत पण आमचें लक्ष तिकडे वेधावें तितकें वेधत आहे काय ? ते मानवी सौख्यराशीचे कारखाने आपण पाहतों पण त्यांत आपली गति पूर्ण व्हावी, ते कारखाने आपणांस चालवितां यावे, त्यांची मालकी आपल्याकडे कां नसावी ? असे विचार किती लोकांच्या डोक्यांत येत असतील तें न कळे. आणि विचार आल्याप्रमाणें काम करावयास लागणारे कोण लोक किती निघतील ? पौराणिक कालांतील कधीं काळचीकां होईना **कामधेनु** ह्मणजे सर्व पदार्थमात्रांना, कल्पना करितांच प्राप्त करून देणारी ती हीं अद्भुत व अचाट यंत्रेंच असें आपण घटकाभर समजलों, तर, ती कामधेनु पाहून आमच्या लोकांचें वर्तन असें झालें असतें कीं, त्या कामधेनूची स्तुति करावयाची, तिला शाबासकी देत सुटावयाचें, रोजरोज त्रिकाळ दर्शन घ्यावयाचें. फार तर काय, इचें शेण काढावयाची सेवा कोणी करूं देईल काय असें रात्रंदिवस चिंतीत व घोकीत असावयाचें. पण ही कामधेनु कशी मिळाली ? कोठून आणिली ? मिळवावयाला काय श्रम पडतात ? वगैरेचा विचारही करावयाचा नाहीं ! घरोघर व इतर ठिकाणीं कामधेनु आहेत, त्या सर्वांस मिळवितां येतात, मिळण्याला अमुक करावें लागतें ह्मणून सांगणारे लोक किंवा माहिती

करून देणाऱ्या पोथ्या आहेत असें आपल्याला माहीत असूनही आपलें तिकडे लक्ष जात नाहीं. ती विद्या साध्य करावी, त्या कामधेनूची प्राप्ति करून घ्यावी हा विचार कोणाच्याच कसा मनांत येत नाहीं? दोन अडीच पुस्तकें शिकून "कट्कट्कट्" आवाज काढीत सहस्रावधि लोक, विद्या शिकलेले, आज पांच पन्नास वर्षें तारमास्तराचें काम करीत आहेत; त्यांनीं ह्या उद्योगावर आपला प्रपंच बराच थाटामाटाचा चालविला व कित्येक चालवीत आहेत. पण हें डोळ्यांपुढलें काम आहे, कसें चालतें? आपणांस असें करितां येईल कीं नाहीं? कां आपण असें करू नये? हा विचार कोणाच्याच मनांत कसा येत नाहीं याचें मोठें आश्चर्य वाटतें. हमालीच्या धंद्यासारखें काम करून घरीं परत आलें ह्मणजे मात्र, तो साहेब असें ह्मणाला, त्यानें तसें फर्माविलें, ही चूक झाली आणि तो दंड झाला, असा पगार मिळतो नि तसें काम घेतात, काय करावें? ह्मणून रडगाणें गात बसतील! पण त्या सर्वांत एक माईचा पूत असा नाहीं आजवर निपजला कीं, अरे! हें गौडबंगाल काय आहे? यांत काय आहे, हें आपणांस कळलें पाहिजे, आपण कांहीं त्यांतलें काम करूं. पण असा विचार कसा सुचणार? घाण्याचे बैल गिरगिर फिरतात तशी यांची स्थिति! हा एकीकडला प्रकार. त्याप्रमाणें सर्वत्र शाहाणे, हुशार, व देव ह्मणविणाऱ्या "नरश्रेष्ठ" ब्राह्मण जातींतल्या स्वप्रौढीखोर डुड्डाचार्यांची ही अशी स्थिति तर बाकीच्यांची गोष्ट कशाला विचारावयाला हवी? ह्मणजे तात्पर्य इतकेंच कीं, आमच्या लोकांना शारीरिक मेहनत नको, धंद्याची आवड नाहीं, स्वातंत्र्याची लालसा नाहीं, पोट भरलें कीं पुरे, जास्त उपद्व्याप नकोत आणि जास्त किफाईत नको, आयतें डबोलें मिळेल तर हवें. अशा प्रकाचा मनाचा **नीच** कलच असतो. आणि अशी स्थिति जोंवर आहे तोंवर ते उपाशीं मर-

तात, हालअपेष्टा सोसतात, पारतंत्र्याचें जखड जूं मानेवर घेऊन पार्श्वभागावर प्रतोदाचे ताड ताड तडाखे सोशीत आपल्याला पशूसारखे वागवून घेतात; असें असून मनुष्यें आणि पुरुषांसारखे पुरुष असून **गाढवाप्रमाणें** राबतात आणि बायकांसारख्या जिण्यांत दिवस काढतात याबद्दल कोणास फारसें वाईट वाटावयाला नको! अक्कल आहे, सामर्थ्य आहे, सर्व सिद्धता डोळ्यांपुढें दिसते आणि दगदग व श्रम यांना भिऊन ह्मणा किंवा लब्धप्रतिष्ठेच्या पोकळ नादांत गुंतून ह्मणा, हाल सोसणाऱ्या कंगाल मूढांची दया ईश्वराला येणें कठीण, मग मनुष्याला कशी येईल ती येवो !

यंत्रनिर्मित कलाकौशल्यांच्या जोरावर शेंबडींलेंबडीं राष्ट्रें कुबेरनगऱ्या बनल्या–साधारण लेंचेपेंचे लोक स्वर्गीय देवतासम पूज्य "कर्तुमकर्तुंसमर्थ" वाटतात, हें आह्मांला दिसतें, आणि कळतें, व रोज पाहतों; पण आमचें तिकडे लक्ष जात नाहीं ! कां तर तो धंदा "किंचित् हलका आणि **रिकाम्या** दगदगीचा" ! हलकेपणा धंद्यांत कसा असतो हें अद्याप कांहीं शाहाण्या मनुष्यांस कळत नाहीं ! अमुक धंदा हलका आणि तमुक श्रेष्ठ याचें माप घेण्याची एखादी नळी ईश्वरानें गुपचुप आमच्या लोकांच्या स्वाधीन केली आहे कीं काय ? असें वारंवार मनांत येतें. दगदग नको, श्रम नकोत, त्रास कोणीं सोसावा ! **रिकामी** खटखट कोण करीत बसतो, ह्मणून रडगाणें गाणाऱ्यांनीं **जिवंत** तरी कां राहावें ? सोंग घ्यावयाचें तर रंगभूमीवर नाचलें पाहिजे; तसें मनुष्य व्हावयाचें तर हें सर्व सोसलें पाहिजे. 'रोतेसुरत' मंडळी जास्त वाढणें खरोखर देशाचें दुर्दैव होय ! असले लोक जन्मासच न येतील तर बरें ! आपण मनुष्यें आहोंत, आपल्यांत हिम्मत आहे, अक्कल आहे, चार अक्षरें शिकलों आहोंत, मर्द ह्मणवितों तर येईल त्या प्रसंगाला टक्कर द्यावी, असतील त्या अड-

चणी तुडवाव्यात, येतील त्या संकटांस धैर्याची ढाल पुढें करून येतील तीं संकटें हाणीत सुटावें आणि हिंमत, बाणा, करामत, उद्योग यांहींकरून मान वर उचलून ईश्वर शाबासकी देतो कीं नाहीं याची मार्गप्रतीक्षा करावी. न्यायनीति, निष्पाप मन, निष्कलंक वर्तन हीं कवचें अंगांत असलीं ह्मणजे कोणाचे आणि कशाचे घाव कांहींएक लागावयाचे नाहींत, हें खूब समजावें. पोटाला मिळविणें हें रणांगणांत झगडून जय मिळविणें आहे. ह्मणूनच त्याला "जीवनकलह" ह्मणतात. समरांगणाचे ठायीं समशेर चमकावीत जाणारा बाणेदार शिपाईगडी आणि उद्योगानें व हिमतीनें अक्कल खर्चून स्वतः पैसा मिळविणारा भला मनुष्य हे दोन्ही सारख्या योग्यतेचे होत ! शिपाईपणाचें काम पतकरवत नसेल त्यानें हातांत बांगड्या भरून "दळवाईदळ" करीत बसावें हें बरें. ( असें समजण्याचा मनु नुक्ताच पांचपन्नास वर्षांखालीं होता ! ) त्याचप्रमाणें स्वकष्टानें स्वोदरपूरण करवत नाहीं, बंदेगुलाम होण्यापलीकडे आपली योग्यता आणि अक्कल नाहीं असें वाटत असेल, उद्योग नको, दगदग कशाला, संकटांचा व अडचणींचा मारा कोणीं सोसावा, उपद्व्याप कशाला हवा, अशा प्रकारच्या विचारांनीं—जनांनीं, नामर्दी विचारांनीं—परिपूरित डोकेवाल्या लोकांनीं उपाशींतापाशीं आणि रडतकण्हत पडावें हेंच बरें !

आतां यंत्रनिर्मित कलाकौशल्यांच्या कामांत धाडस मोठें लागतें, ज्ञान सूक्ष्म हवें, भांडवल मुबलक पाहिजे, अमक्याचें सहाय्य आणि तमक्याची कृपा पाहिजे ह्मणून अगोदर असल्या कामांत हात कसा घालावा ह्मणून रें-रें-करणाऱ्यांनीं इतर हस्तकौशल्याकडे तरी लक्ष द्यावयाला काय हरकत आहे ? मनुष्यमात्रांच्या गरजा अधिकाधिक वाढताहेत, त्या गरजा पुरविणारे,

अडाणी, अज्ञानी, बिगरवाकब लोक असल्यानें आणखी त्यांची संख्या कमी कमी होत चालली आहे व निभावें त्याप्रमाणें त्यांच्यानें काम निभत नाहीं, यामुळें ते धंदे हातीं घेतल्यास किफायत चांगली होणार आहे. किफायत चांगली, सोइस्कर काय होते, ह्मणून लोक वाखाणणी करतात आणि अडल्यासवरल्या वेळीं आपणांखेरीज गत्यंतर नाहीं असें समजतात तर त्यांत नुकसान काय होतें किंवा अपमान कोठें होतो ? हें कोणी सांगेल काय ? एखादा धंदा घेऊनच या प्रश्नाची फोड करूं ! समजा एक शहर आहे. तेथें सुतार रोजीना दीड रुपया कमवितो ह्मणजे महिना त्याला ४५ रुपये मिळतात. आणखी त्याच शहरांत एक बारा रुपयांचा 'म्याट्रिक्युलेटेड' कारकून आहे. सुताराला मेहनत ८।९ तास करावी लागते तितकीच एकंदरीनें कारकुनालाही पडते. सुताराला फटकन् बोललें, वेडावांकडा शब्द मालकानें तोंडांतून काढला कीं, किंकर घेऊन तो चटदिशीं चालता होतो, अरे तर कांरे, ह्मणून तो मोकळा होतो. दुसरें घर आहे, दुसरीकडे नौकरी कमी नाहीं, कामाला तोटा नसतो, येरे बाबा, ह्मणून लोक ह्मणत असतात. कारकुनाची चूक झाली ह्मणून कोणी फटकन बोललें, अपमान केला तर "खरें आहे, चूक झाली, माफ करा, बंदागुलाम आहें," असें ह्मटल्याशिवाय त्यास निर्वाह नाहीं, आणि "यू फूल्, यू ड्याम युअर फेस ब्रूट" अशा कोमल व संभावित शब्दपुष्पांचा हार घातला तरी पतकरला पाहिजे. असें करा, अमक्या सभेला जा, तमकें करूं नका, तमक्याशीं बोलतां कामा नये, अमुक ठिकाणीं बसा, असा एक नी दोन, पुष्कळ त्रास सोसावा, साहेब किंवा त्यांचे हस्तक, हे देव, यांच्याशीं बरोबरीनें बोलतां कामा नये, चालतां कामा नये, अशा तऱ्हेची कैद. इतकें सगळें पतकरून बारांचे तेरा होण्याकरितां कोणाचे डोळे जातील आणि

कोण मरेल याची वाट पाहावी लागते. बरें, लोकांत मान्यता आहे तर तीही नाहीं ! खडखडीत आंगरखे घालून, साहेब, साहेबाची स्वारी, साहेबाची मर्जी, साहेबाचा स्वभाव वगैरे बढाया सांगितल्या तर ऐकणारे काय चार दोन भेटतील तेच. असो. असा प्रकार पुष्कळ असतो, तो सांगून संपणें नाहीं. आतां चांगलें वेळेवार व सुबक काम करून देणारा सुतार पहा, लोकांना त्याच्या घरीं खेटे घालावे लागतात, तरी ते त्याची तारीफ करितात, शिफारस सांगतात, वाहवा करतात, थोडें अडलें कीं विनवणी त्याची सुरू होते ! तेव्हां अशा प्रकारें तुलना केली किंवा करीत बसलें ह्मणजे धंद्यांतला हलकेपणा जाईल. आणखी हे धंदेवाले लोक आपणांस तुच्छ वाटतात ते आपल्याला—अक्षर शिकलेल्यांला—पूज्य मानतात ह्मणून व त्यांना ह्या प्रकारचें कांहीं ज्ञान नसतें यास्तवच, आह्मी तरी त्यांस क्षुल्लक लेखतों ! तेंच तो मनुष्य विश्रांतीच्या वेळीं नानाप्रकारचे फंदमय ढंग सोडून विद्याव्यासंग करूं लागेल तर त्याची योग्यता मग दुप्पट तिप्पट वाढेल. हा एक अशा प्रकारच्या दृष्टीचा विचार झाला. आणखी एक त्यांत दुसरी गोष्ट अशी आहे कीं, स्वतः अंगमेहनतीनें काम करणारापेक्षां काम करवून घेणाऱ्याची योग्यता जास्त असते आणि त्याला मोल अधिक मिळतें! " इंजिनेर " स्वतः काम करीत नाहीं, तो मजूरांकडून करवून घेतो, त्यांना चांगलें वाईट सांगतो, त्या कामाची जबाबदारी मात्र आपणावर घेतो तर त्याला सर्व मजूरांच्या वर्षभर पगाराइतका पैसा दर तासाला किंवा दिवसाला मिळतो; तो कां हें कोणास कांहीं सांगावयाला नको. चारचौघे मिळवून, कामाची जबाबदारी आपणांवर घेतली, सुरेख काम करून घेतलें तर त्याला काय हरकत आहे ? हें काम होणें हें शिकल्या सवरलेल्यास अधिक शक्य जास्त कीं अडाण्यास ?

तेव्हां असा विचार करीत गेलें असतां "यांत्रिक व शारीरिक कलाकौशल्य," हा धंदा उपाशीं मरणाऱ्या लोखंडास परिसासारखा आहे; ह्यांत कांहीं शंका नाहीं.

**४. नौकरीचाकरी:**—प्राणापेक्षां प्यार स्वतंत्रता, असें प्रत्येकाला वाटतें, कोणाच्या दारांत दांत विचकावयास जाऊं नये, कोणापुढें नमो ह्मणून उभें राहूं नये, कोणाचें दास्य, कोणाची गुलामगिरी नसावी ही इच्छा सर्वत्र साहजिक आढळते. अडाणी, अक्षरशून्य, ठोंब्या अशा मनुष्याची गोष्ट निराळी आणि समंजस, शहाणा, विद्वान्, विचारी याची गोष्ट निराळी. आपण काबाड कष्ट व अनेक त्रास सोसून चार अक्षरें शिकावींत, विचार करण्याची शक्ति प्रगल्भ दशेला आणावी, स्वतःच्या हिम्मतीवर एकादी मसलत पार पाडून नेईन अशी धमक येईल इतकी योग्यता संपादावी आणि अखेर त्या अक्षराचा, त्या विचारशक्तीचा, त्या धमकेचा व योग्यतेचा विक्रय, दहाबारा, नाहींतर पांचपन्नास रुपयांखातर आणि स्वतःचें स्वातंत्र्य गहाण टाकून, मांडावा किंवा विकत घेण्यास कोणी मिळत नाहीं ह्मणून गायांवायां तोंडें करीत मर्दासारख्या मर्दांनीं बायकांप्रमाणें सचिंत व खिन्नांतःकरणानें बसावें ही खरोखर मोठी निंद्य स्थिति होय. चाकरीनौकरी कोणीं करावी ? ज्याला स्वतःची हिम्मत नाहीं, ज्याच्यांत कुवत नाहीं, ज्याला स्वतःच्या पायावर इमारत उभारण्याची ताकद नाहीं त्यानें ! पण नाहीं, आमच्या देशांतला प्रकार सर्वच कांहीं निराळा. चाकरी परब्रह्म; चाकरी थोरवी; चाकरी विद्वत्ता; चाकरी संपत्ति; चाकरी सद्गुण; सर्व कांहीं चांगुलपणा चाकरींत भरलेला ! मात्र आनंदाची गोष्ट इतकीच कीं **चाकरी** ह्मणून हपापत सुटलेले विद्वान् त्या चाकरीच्या मागें **सरकारी** हे शब्द लागलेले पहात असतात. पगार केवढाही भिकारडा

असो, त्यांत कांहींही नुकसान–स्वतःचें मग बाकीच्यांची गोष्टच नको बोलावयाला–असूं द्या पण ती मिळाली पाहिजे. आपल्या विद्वत्तेचें खरें चीज करून दाखवावयाचें ह्मणजे काय तर सरकारी चाकरी मिळविणें, मग ती खरडेघांशी असो, का हमाली असो, त्यांत १० रुपये मिळोत, का पंधरा मिळोत, ती पतकरावयाचीच. ती चाकरी मिळेनाशी झाली किंवा मिळत नाहीं असें कळलें तर आपला सारा जन्म व्यर्थ गेला, आपली विद्या फुकट, ती कवडीमोल ठरली; असें वाटून जीविताचा सुद्धां कित्येकांना कंटाळा येतो! जणो, जन्मल्याचें आणि ज्ञानी झाल्याचें सार्थकच सरकारी चाकरी. सरकारी चाकरी मिळाली नाहीं किंवा मिळण्याला अवकाश लागला तर या विद्या पैदा केलेल्यांच्या जिवाला चैन नसतें, दुसरें कांहीं सुचत नाहीं, ठार उपाशीं मरण्याची पाळी येते ह्मणून घाबरतात, पुढें काय करावें हें कळत नाहीं, अशी जी काय त्यांची स्थिति होऊन जाते ती कांहीं पुसतां कामा नये!

पूर्वी चाकरींत गोडी होती, चाकरीला किंमत असे, ती मिळविणें सुलभ होतें, पण तो प्रकार कांहीं हल्लीं उरला नाहीं. चाकरी मागणारे व चाकरी करणारे भाऱ्यावारी सवंग मिळतात. असें कळलें ह्मणजे त्याची किंमतही कमी झालीच पाहिजे. आणि लागेल तेव्हां लागतील तितके व लागतील तसे लोक मिळतात हें पक्कें कळलें आहे तोंवर चाकरींत असलेल्याची किंवा पुनः चाकरींत येणाऱ्याची पर्वा मुळींच न वाटणें अगदीं साहजिक आहे. यामुळें सरकारी चाकरींत किफायत, मानमरातब किंवा कांहीं उरलें नाहीं. उठलासुटला तो सरकारसेवेंत मान केव्हां एकदां घुसडवीन ह्मणून टपत बसलेला, तेव्हां हल्लीं आहे हा प्रकार व्हावयाचाच, त्यांत कांहीं मोठेंसें नवल नाहीं. तुही

ब्राह्मण, तुह्मांला नौकरी देत नाहीं, तुह्मी मोठ्या मिशांचे, राकट, विशी उलटलेले, तुह्मांला कशी नौकरी द्यावी ? तुह्मीं काय अमुक पुस्तकें घोकलीं नाहींत, तेव्हां तुमचा नौकरी मागण्याचा हक्क काय ? तुह्मी कोण ? दोन वर्षें "नाट पेड" नौकरी–उमेदवारी– करा, ह्मणजे पाहूं कोणी पेनशनबिनशन घेतो किंवा खपतो- बिपतो कीं काय तें. असें जिकडे तिकडे झालेलें आपण पाहतों, आपणाला दिसतें, तरी तो चाकरीचा नाद सुटत नाहीं, काय करावें ? नाहीं ह्मटलें तरी, निदान दोन तीन हजार लोक सर्व तयारी जय्यत ठेवलेले, सरकारच्या ह्मणण्याप्रमाणें पुऱ्या लाय- कीचे, आह्मांला नौकरी द्या, नौकरी द्या, ह्मणून दरसाल सर- कारी कचेऱ्यांत खेटे घालीत असतील ! यंदां आणि फक्त आम- च्या इलाख्यांतच सुमारें **साडेतीन हजार** तरुणांनीं " सरकार- नौकरीस लायक " असे दाखले लहानमोठे मिळविले, आणि त्या सर्वांचे प्रयत्न, इतक्या सर्वांची दृष्टि, ती **नौकरी** मिळवि- ण्याकडे आहे. ती मिळाली नाहीं, तितकी " पुण्याई " पदरीं नसली तर यांना पोटाची भ्रांत, यांच्या विद्येचें मातेरें, फार काय सांगावें आपल्या जन्माचे हालहाल आहेत असें त्यांचें त्यांस वाटतें. लोकांतला मान, घरांतलें सुख आणि मनाचा आनंद या चाकरींत आहे असें त्यांना भासतें व तसें लोकही समजतात. अगोदर या इलाख्यांत अवघे २१ जिल्हे, प्रत्येक जिल्ह्यांत फार फार तर **शंभर सरकारी नौकर** लागावयाचे ते तितके अगो- दरच लागलेले असतात. नवीन कांहीं लागावयाचे नाहींत. ला- गलेच तर खालीं झालेल्या जागा चार पांच जणांस मिळतील. बाकीच्यांना नुसती **आशा !** अर्ज कर, हेलपाटे घाल, वशीले शोध, काय हवें तें कर, पण **नौकर** व्हावें हा त्यांचा निदिध्यास. पण तो साधणार कसा ? याचा विचार कोणीच करीत नाहीं, हें

मोठें आश्चर्य आहे. सर्वांस वाटतें, कीं, आपल्याला नौकरी मिळेल, व सर्व नौकरी मिळविण्यासाठीं झटतात, पण अखेर कोणास कांहींच नाहीं. लोकांचा भ्रम अद्याप दूर होईना. नौकरीचा तिटकारा येईना, नौकरीच्या ऐवजीं दुसरा धंदा काढण्याचें सुचेना, नौकरीच्या दुःखाचा तिटकारा येईना, याला इलाज नाहीं! नौकरी, नौकरी, ह्मणत बसल्यानें किंवा नौकरीच्या नादीं लागल्यानें स्वतःचें मानसिक व शारीरिक दौर्बल्य कसें व्यक्त होतें, प्रपंचाचा खराबा कसा होतो, देश, देशहित वगैरेंकडे दुर्लक्ष झाल्यानें काय परिणाम होतो; समाज, राष्ट्र, विद्या वगैरेंकडे आपला उपयोग नाहीं, याचा परिणाम कसा होईल हें त्यांच्या ध्यानींमनीं व स्वप्नींसुद्धां येत नाहीं; हें त्याचें एकट्याचें नव्हे, सर्वांचें दुर्दैव! नौकरींत पैसा मिळतो, नौकरींत मान आहे, नौकरींत प्रतिष्ठा आहे, नौकरींत लोकांवर वर्चस्व स्थापतां येतें. पण याजपेक्षां जास्त पैसा, जास्त मान, जास्त प्रतिष्ठा व वर्चस्व खचीत खचीत इतरत्र पुष्कळ मिळण्याजोगें आहे. मात्र उद्योग, हिम्मत, दृढ निश्चय, धमक आणि उमेद हीं हवींत.

सरकारी नौकरी, ह्मणजे मुलकी, न्याय, पोलीस, जंगल, अबकारी, पोस्ट, शाळा ह्याच खात्यांत हवी, असा साधारण ग्रह असतो. या प्रत्येक खात्यांत पराकाष्ठा ह्मणजे महिना २५०।३०० आणि त्याला मुदत प्रारब्धाची! सुरुवात १२।१५, २० रुपयांची. जागा सर्व भरलेल्या. वाव कोठें नाहीं. तेव्हां सर्वांनीं एकच नाद धरावा, नादांत गुंगून अनेक तऱ्हांनीं हानि करून घ्यावी, हें कांहीं इष्ट नाहीं. आपापल्या कलाप्रमाणें आणि योग्यतेप्रमाणें धंद्याची निवड करून त्यांत नांव करावें, दौलत मिळवावी आणि लोकप्रीति संपादावी हें उत्तम.

आतां शिकलेल्यांस नौकरीशिवाय डाक्टरी, वैद्यकी, वकीली,

इंजिनेरी हे धंदे आहेत. त्यांत किफायत बरी असते, लौकिक मिळतो, स्वातंत्र्य राहतें, इत्यादि गोष्टी खऱ्या आहेत. पण तसें असतें ह्मणून सर्वांनींच आणि आपला कल दुसरीकडे असतां, मति चांगलीशी चालत नसतां, आपल्याला हिम्मत नसतांना एका वकीलीच्या किंवा डाक्टरीच्या नादीं लागावें हें कांहीं चांगलें नाहीं. नौकरी मिळेना तेव्हां वकीलीचा अभ्यास करावा, नौकरी करीत असतां तिच्या दगदगींतून सुटण्यासाठीं वकील व्हावें असले प्रकार नकोत, ते इष्ट नव्हेत. अशानें **"इदं च नास्ति न परं च लभ्यते"** एवढेंच साधण्याचा संभव फार आहे. सबब धंदा पतकरतांनाच त्याचा चांगला विचार करावा हें बरें. एकदां धंदा पतकरला ह्मणजे तिकडे सगळें लक्ष, सगळी हिम्मत आणि सगळें आयुष्य खर्चावें हें उत्तम. अशानेंच खरी किफायत व खरा फायदा होण्याचा संभव आहे.

असो; मुख्य मुख्य धंद्यांचा हा असा साधारण विचार झाला. आतां कोणता धंदा कसा करावा याबद्दल विवेचन करावयाचें, पण त्यापूर्वी उद्योगधंद्यासंबंधानें आमची स्थिति आज मितीला कशी आहे, याचा ढोबळ विचार, अनेक बाजूंनीं झाला असतां, कोणता धंदा, कोठें कसा निघेल व कोणत्या धंद्यांत कशी किफायत साधतां येण्याजोगी आहे, याचा विचार करण्यास ठीक पडेल. ह्मणून तें विवेचन पुढील प्रकरणांत अगोदर करणें अवश्य आहे.

---

## "स्वदेशस्थिति."[1]

वाईट हें कोणाला नको असतें? वाईट होणार ह्मणून कळलें

---

१ या विषयावर केसरी वर्तमानपत्रांत लिहून प्रसिद्ध केलेले निबंधच थोडासा फेरफार करून येथें उतरून घेतले आहेत. त्या लेखांस सार्वजनिक सभेचे त्रैमासिक व डिग्बी साहेबांचे लेख आधारभूत होत. तेव्हां या प्रकरणाचें श्रेयही त्यांच्याकडेच, हें निराळें सांगणें नको.

कीं पुरे, त्याबद्दल भीति वाटून तें टाळण्यासाठीं धडपड सुरू होते, असा स्वाभाविक नियम आहे. त्याला अपवाद मिळावयाचा नाहीं. वाईट प्रसंग येणार अशी मनुष्याच्या मनाची एकदां खात्री झाली ह्मणजे त्याला झोंप यावयाची नाहीं, चैन पडावयाचें नाहीं, कांहीं सुचावयाचें नाहीं, ढंग आठवावयाचे नाहींत आणि त्या प्रसंगाचा प्रतीकार कसा करावा, कोठें कशी तयारी पाहिजे वगैरे विचारांखेरीज अन्य कसलाच ध्यास लागणें कठिण असतें. ज्याच्या आचरणांत अशाप्रकारची धडपड दिसून येत नाहीं, तो, कवीनें ह्मटल्याप्रमाणें मुक्त अथवा पशु असला पाहिजे. खाटीक पहातांच अजापुत्राला उपजत बुद्धीच्या योगें हा आपला दुष्मन आहे हें कळतें व तो प्राणत्राणार्थ स्वशक्त्यनुसार धडफड करतो. मग मनुष्यानें पोटाचें अरिष्ट टाळण्याकरितां कसें व किती झटलें पाहिजे बरें? कारण त्याचें बुद्धिसामर्थ्य सर्वांहून अधिक असतें; आणि आपलें हिताहित जाणण्याची शक्ति त्याच्या अंगीं जशी असते तशी इतरत्र कोठेंही आढळत नाहीं. प्रसंगीं कसें वागल्यानें कार्यसिद्धि होईल हें त्याला कळण्याचें सामर्थ्य असतें, ह्मणून ते ते प्रसंग तो टाळूं शकतो. तसें त्याच्यानें होत नसेल तर तो मनुष्य नव्हे हें उघड आहे. ही व्यक्तिमात्राची गोष्ट तीच राष्ट्राची. कारण, राष्ट्र ह्मणजे व्यक्तिमात्रांचा समूह, तेव्हां हल्लीं आपली स्थिति आहे कशी, होती कोणत्या प्रकारची, त्यांत बिघडतें आहे काय, त्याचा परिणाम होईल कसा आणि वाईट परिणाम असेल तर त्याचा प्रतीकार कोणत्या इलाजांनीं करावा इत्यादि गोष्टींचें वारंवार मनन करावें, सतत चर्चा व्हावी आणि तदनुरूप अंशतः तरी वर्तन घडावें, हें मनुष्याचें कर्तव्य होय.

या रीतीनें पाहतां हल्लीं आमच्या देशाची स्थिति आहे कशी? हा प्रश्न पहिल्यानें पाहिला पाहिजे. सर्व संकटांचें माहेर, सर्व हालांचें

जन्मस्थान, सर्व गुणांवर विरजण घालणारें आदिमूळ काय तें दारिद्र्य ! तें आपणांस आहे कीं काय? ह्याचा विचार त्यांतून अगोदर होणें इष्ट आहे. कारण आधीं पोटापाण्याची योग्य व्यवस्था असेल तर सर्व कांहीं साधण्याजोगें असतें. पोटाचा विचार झाल्यावर मग बाकीचे ढंग. तेव्हां त्याचा विचार अवश्य कर्तव्य आहे. ह्मणून प्रथमतः आमच्या देशाची सुवत्ता कशी काय आहे, ह्मणजे आह्मी खाऊनपिऊन तरी सुखी आहों काय? हा प्रश्न व्यक्तिमात्र व राष्ट्रीय दृष्ट्या विचारून पाहणें जरूर आहे. त्या प्रश्नास 'खरोखर नाहीं' हेंच उत्तर येईल. आह्मांला पोटापाण्याची पंचाईत पडली आहे, पोटभर अन्न नाहीं, आंगभर वस्त्र नाहीं आणि रात्रभर झोंप नाहीं, अशी आमच्या राष्ट्राची स्थिति हल्लीं आहे आणि ती दिवसेंदिवस जास्त होत जाणार हें निखालस खरें आहे. हें ह्मणणें सकृद्दर्शनीं अत्युक्तीचें वाटण्याचा संभव फार आहे; कारण देशाचा व्यापार दिवसेंदिवस जोरानें वाढतो; शेतकीची जमीन भराभर अधिकाधिक लागवडीस येत आहे; सोन्यारुप्याचीं जहजांवर जहाजें भरून या देशांत येतात; गिरण्या, कारखाने यांची रेलचेल उडाली आहे; विलायतेचा माल देशांत जास्त जास्त फैलावत चालला आहे; नवीन नवीन उद्योगधंद्यांची मारे जारीनें चर्चा चालू आहे; बाहेर जाणाऱ्या मालाला रोज चढत्या प्रमाणावर किंमत येते; मुंबई, कलकत्ता असलालीं टोलेजंग व केवळ इंद्रभुवनासारखीं शहरें रोजच्या रोज सुसंपन्न होताहेत; तेव्हां अशा स्थितीला दारिद्र्य, कंगालगिरी, उपासमार ह्मणणें ह्मणजे निव्वळ खोटसाळपणा असें पुष्कळांस वाटण्याचा संभव आहे. आणि परदेशांतील व याही देशांतील खोल पाण्यांत न शिरतां कांठावरून पाण्याची खोली अजमावूं पहाणाऱ्या लोकांस असेंच वाटणें साहजिक आहे.

आणि वरकांतीं तसें दिसतेंही खरें. वरवर पाहणाराला हिंदुस्थानची भरभराट खूप जोरानें चालली आहे असेंच दिसतें. खुद्द सरकारचीही हीच स्थिति. खालून रिपोर्ट व आंकडे येणार त्यांवर त्यांची सारी भिस्त. रिपोर्ट व आंकडे तयार करून पाठविणारे आपल्या खात्याची अब्रू वाढेल अशाच तऱ्हेचे आंकडे पुढें पाठवितात काय कोणजाणे. सरकाराला दुसरे डोळेच नाहींत.

देशाचा व्यापार वाढतो पण तो आमच्या हातचा सुटून विलायतकरांकडे जातो. शेतकीची जमीन जास्त लागवडीस येते पण इतर धंदे सफै बुडाल्यामुळें री-री करणेंच भाग ह्मणून येतें त्याची भेट गोरगरीबांस किंवा खेड्यापाड्यांतल्या रयतेस कोठची होणार? रुप्याचा बहुतेक सारा खप सरकारी टांकसाळेंत, आगगाड्या, आगबोटी वगैरे कारखाने सर्व युरोपियन लोकांनीं काढलेले. अशा प्रकारची सर्व अंतःस्थिति आहे ती परक्यास दिसावयाची नाहीं! खरी स्थिति ह्मणजे उपासमार आणि कंगालगिरी यांचीच सदा सोबत. दुष्काळाच्या झटक्यासरशीं लाखों लोकांनीं पटापट प्राण सोडावेत याहून लोकांच्या आंगीं कांहीं त्राण राहिलें नाहीं याचा मज़बूत पुरावा आणखी कोणता पाहिजे? हे हिंदुस्थानदेशा! तुझी संपत्ति साऱ्या दुनयेंत अपार, तुझें वैभव केवढें दांडगें, तुझ्या जमिनींत अपूर्व सुपीकता आणि तुझ्या सोयीही अनुपमेय! प्राचीनकाळीं केवढा तुझा लौकिक! बाहेरच्या कंगाल लोकांस तूं केवळ "सुवर्णभूमि' भासत असस. तुझें सुवर्ण खणून नेऊन, त्यानें कितीकांनीं आपले देश मढवून काढले! त्या तुझी कोण ही दुर्दशा! दारिद्र्यानें जिकडे तिकडे आपलें साम्राज्य खुद्द इंग्रजी साम्राज्यापेक्षांही अधिक खंबीर पायावर बसविलें आहे! पावसानें कोठें थोडासा टाळा दिला कीं तुझीं हतभागी पोरें पटापट प्राण सोडतात!

गेल्या वीस सालांतच मेघराजानें थोडीशी अवकृपा केली तर **एक कोटि वीस लक्ष एकवीस हजार चारशें वीस** माणसें प्राणास मुकलीं! हाच काय तुझा जोम! ही इतकी निःशक्तता येण्यास, निसर्गाप्रमाणें गुपचूपपणें मानवी इच्छा व अधिकार यांजवर आपला दाव बसविणारीं अर्थशास्त्रांतर्गत गूढ तत्वें कारणीभूत झालीं, का दुर्दैवी आणि वेळेच्या पूर्ण तावडींत सांपडून जमीनदोस्त होणाऱ्या गरीब बापड्या लोकांचा हा अपराध, का दैवावर हवाला देऊन तें लोटील तिकडे वाहवत जाणाऱ्या व आपली जबाबदारी न ओळखणाऱ्या सरकारच्या कृपाकटाक्षाचा हा प्रभाव? या आमच्या नष्टचर्यांचें कारण कोठें सांपडेल काय? हा दोष सुधारलेल्यांच्या दृष्टीला चमत्कारिक भासणाऱ्या आमच्या समाजपद्धतीचा नव्हे, किंवा प्रत्येकास यथेच्छ सर्वत्र सारखा व्यवहार करण्यास अडचण पडते त्याचा नव्हे, किंवा कैक प्राच्य राष्ट्रांच्या डोळ्यांत सलत असलेल्या निसर्गकृत सांपत्तिक पंक्तिप्रपंचाचा नव्हे, अगर येथील लोकांच्या कमकुवतेचाही नव्हे. तर हा सर्व घोंटाळा आमच्या हल्लींच्या विचित्र स्थितीचाच आहे. आमचे राज्यकर्ते आमच्या देशाच्या नैतिक उन्नतीविषयीं जितकी कळकळ दाखवितात तितकीच किंवा त्याच्या दशांश कळकळ ते आमच्या आधिभौतिक सुस्थितीविषयीं दाखवीत नाहींत यांतच आमच्या नष्टचर्येचें सारें बीज आहे. शंभरांत ५।६ मुलींवर जुलूम होत असला तर तो बंद करण्याकरितां लाखों लोकांच्या ह्मणण्याला लाथेनें झुगारून देणारें सरकार म्यांचेस्टरच्या शेंपन्नास गिरणीवाल्यांच्या मतांसाठीं हिंदुस्थानाच्या उत्पन्नाची आहुति देण्यास तयार! या देशीं होणाऱ्या मालाला उत्तेजन मिळावें, त्यायोगें त्या त्या उद्योगधंद्यास तेजी यावी, लोकांना शेतीखेरीज अन्य उपजीविकेचें साधन व्हावें, जरूरीच्या व उप-

भोगाच्या अथवा ऐषआरामाच्या हरएक जिनसासाठीं आह्मांस परदेशाकडे पाहवें लागूं नये, तर आह्मींच त्यांना या जिनसा पुरवाव्या इत्यादि केवळ तत्वज्ञानाच्या गोष्टी सरकारी ठरवांतून व राज्यकर्त्या पुरुषांच्या भाषणांतून पुष्कळदा येतात. पण प्राचीन कलाकौशल्याची सुधारणा आणि सुरुवात होऊन नव्या उद्योगांचें स्थापन व्हावयाला पाहिजे ह्मणून पुऱ्या निश्चयाचा, कट्टया अभिमानाचा आणि सततचा असा प्रयत्न मात्र कोठें दिसून येत नाहीं. असो. मिळून सारांश इतकाच कीं हल्लीं आह्मी पक्के कंगाल, पुरे हतभागी आणि निव्वळ दिवाळखोर बनलों आहोंत, बनत आहोंत आणि हल्लींचाच क्रम चालू राहील तर दिवसेंदिवस जास्त बनत जाणार, यांत तिळमात्र संशय नाहीं ! पंचवीस—याउप्पर अठ्ठावीस कोटि—प्रजा आणि त्यांत हंटरसाहेबांच्या ह्मणण्याप्रमाणें सात कोटि उपाशीं ! दोन कोटि लोक—तरणे ताठे—निरुद्योगी आणि बाकीच्यांच्या जमेची आणि खर्चाची गांठ पडत नाहीं. आमच्या देशांत **माणशीं उत्पन्न सरासरी सालिना सत्तावीस रुपये** ! यांत अन्नवस्त्र, पानसुपारी, विडीतंबाकू आणि बायकामुलांची तरतूद सर्व व्हावयाची ! या स्थितीचें खरें चित्र काढलें तर तें फारच हृदयद्रावक होईल. कदाचित् तें पाहून कोणाच्या मनांत देशकल्याणाचीही स्फूर्ति उत्पन्न होईल.

सध्यांची सांपत्तिक स्थिति, शेतकऱ्यांची उपासमार, कारागिरांचें देशोधडी, मातीचे दिवे खात उधळत जाणें, देशी व्यापाराचा आंत पाय, शहाण्या शिकल्यासवरल्या लोकांचे वेडेवेडे चार, दारू, अफू असल्या दुर्व्यसनांची आसक्ति, सामाजिक बाबतींत ओढाताण, धर्माच्या बाबतींत औदासिन्य इत्यादि तमाम, नादान व घरबुडवे ढंग पाहिले ह्मणजे छाती दडपून जाते. पुढें

काय प्रसंग ओढवेल हें कळत नाहीं. तरणोपाय कोणता, कसा आणि कोणीं योजावा याची पंचाईत पडते ह्मणून निराशबुद्धीनें "आह्मी आतां शुद्धीवर येणार तरी कधीं?" हा प्रश्न वारंवार डोळ्यांपुढें उभा राहतो.

---

## आमच्या कंगालगिरीची आतां मात्र कमाल झाली !

या दुनियेंत संसारी मनुष्याला दारिद्र्यासारखें अन्य दुःख नाहीं. "दारिद्र्याहून मरण बरें वाटतें" असा ध्वनि प्रत्येकाचा असावयाचाच. आमच्या समग्र देशाला हल्लीं दारिद्र्यराहूनें पूर्ण ग्रासलें आहे, त्यामुळें त्याला कांहींच सुचत नाहीं व सुचणें मुष्कील आहे, तेव्हां अगोदर तें दारिद्र्य कसें जाईल याचा विचार अगत्य झाला पाहिजे. पण अगोदर आह्मी खरोखर दरिद्री आहों, आह्मांला त्यानें पूर्ण घेरलें, त्याच्या पुढें आमचें कांहींएक चालत नाहीं, अशी सर्वांची पूर्ण खात्री झाली.पाहिजे. अज्ञान मोठें भयंकर ! तें खरा प्रकार कळूंच देत नाहीं ! आणि ह्मणून त्यामुळें निवारणार्थ उपाय योजण्याची बुद्धि सुचत नाहीं; यास्तव आह्मी किती दरिद्री आहोंत हें सांगणें अवश्य आहे.

आदाय काय, खर्च केवढा आणि शिल्लक राहते किती हें पाहिलें ह्मणजे पदरीं श्रीमंती आहे का कपाळीं कंगालगिरी येते याचें अनुमान कळतें. जमेची बाजू प्रथम घेऊं. सरकारांतून प्रसिद्ध झालेल्या आंकड्यांच्या आधारानें दरसाल चारशें कोटि उत्पन्न या देशाचें, अगर व्यक्तिमात्र **वीस रुपये** आहे असा अंदाज देशभक्त दादाभाईनीं काढिला. त्याचें ह्मणणें सोडूं, हवें असल्यास, सरकारी फडणीस सर बेअरिंग "बजेट" भाषणाच्या

वेळीं इ० स० १८८२ त ह्मणाले: "हिंदुस्थानांतल्या लोकांत दरमाणशीं व दरसाल **सत्ताविसां**पेक्षां जास्त उत्पन्न कांहीं नाहीं असें सिद्ध होतें;" वरें आहे, त्यांचेंच ह्मणणें खरें धरूं ह्मणजे माणशीं उत्पन्न आमचें **सत्तावीस रुपये** आहे ! ! ही आमच्या जमेची बाजू. तेव्हां हें आमचें उत्पन्न हें झालें. आतां दुसऱ्यांचें कसें काय आहे हें थोडें पाहूं, ह्मणजे आमच्यापेक्षां कंगाल कोणीच नाहीं असें दिसेल.

---

## दरसाल दरमाणशीं उत्पन्न.

| | | | |
|---|---|---|---|
| इंग्लंड | ४१ पौंड | अथवा | सहाशें पंधरा रुपये. |
| आस्ट्रेलिया | ४३ ,, | ,, | सहाशें पंचेचाळीस,, |
| स्वित्सरलंड | १६ ,, | ,, | दोनशें चाळीस,, |

अगर ९ पौंड किंवा एकशें पस्तीस रुपये सालाचें माणशीं उत्पन्न सर्वांत भिकारी देशाचें आढळतें; पण आमच्या **सुवर्णभूमींत अवघे सत्तावीस** !

आतां खर्चाची बाजू पाहूं. जमा सत्तावीस ही ठरलीच. रेल्वे, अफू वगैरे बाबी सोडल्या तरी सरकारी वसूल **पन्नास** कोटींचा आहे. संस्थानांतली वगैरे लोकसंख्या वगळली आहे ह्मणून—**वीस कोटि** लोकांवर वांटावयाचा ह्मणजे **अडीच** रुपये बसतो. सत्ताविसांतले अडीच कराखातर गेले, बाकी **साडेचोवीस** रु० उरले. यांत पोट भरावयाचें, कपडालत्ता घ्यावयाचा, मुंजीलग्नें करावयाचीं आहेत ! आतां पोटास काय खर्च येतो हें पहावयाचें. इ० स० १८८५–८६ सालीं तुरुंगांतल्या प्रत्येक कैदीस सालिना **तेवीस रुपये पांच आणे** सरकारास **अन्नखर्च** लागला. आमच्या शिपायाला दरसाल अन्नखर्च सरकारांतून **बेचाळीस रुपये** मिळतो. सर जे.

पील यांनीं शेतकऱ्याच्या खर्चाचें—फक्त पोटाबाबत–टिपण दिलें आहे, त्यांत सालिना **पंचेचाळीस रुपये** खर्च येतो असें ह्मटलें आहे. रोजिना दरमाणशीं दोन आणे खर्च येतो असा त्यांचा अदमास. ह्मणजे कैदीस २३ रु०, शिपायाला ४२ आणि पील साहेबांच्या शेतकऱ्यास ४५ असा दरसाल खर्च येतो. हें पोटभर अन्न धट्ट्याकट्ट्याचें झालें. आपणाला सरासरी घ्यावयाची तर याची पाउणपट धरूं; ह्मणजे कैदी १७ रु०; शिपाई ३१ आणि शेतकरी ३३. आपल्याजवळ शिल्लक तर सारी **साडेचोवीस** राहिली. यापैकीं पोटखर्चाला देणार किती आणि इतर बाबी घेणार कोणत्या आणि शिल्लक पडणार कशी? **आह्मी सुखवस्तूंनीं तुरुंगांतील अन्नावर गुजराण करावयाची असेंच समजूं. बाविसांत** पोट कसें तरी **भरून घेऊं** बाकी अडीच रुपये राहिले. यांत कपडालत्ता व्हावयाचा आहे! तुरुंगातल्या कैदीचा "साडेतीन पोषाख" कांबळ्याचा अंगरखा १, कांबळ्याची तुमान दोनी पाय मिळून २आणि टोपी ॥. असे साडेतीन खरेदी करण्यास सरकाराला **सव्वा** रुपया खर्च येतो. आह्मी **दीड** देऊन आपला पोषाख घेऊं ह्मणजे उभ्या वर्षांत धोतर, मुंडासें, बंडी वगैरे सर्व **दीड रुपयाला** खरेदी करणार! ह्मणजे मग **एक रुपया** शिल्लक राहिला! वीस कोटी साऱ्या देशांत उरले, पण दरसाल शेतकी, गुरें, आउतें आणि हत्यार वगैरेची (शेतकऱ्यांची, व्यापाऱ्यांची, उदम्यांची) मोडतोड होते तेव्हां तिकडे थोडीशी नजर दिली पाहिजे. पील साहेब ह्मणतात दरसाल मोडतोडीबद्दल एकरीं **एक रुपया** खर्च होतो. हिंदुस्थानांत **एकोणीस कोटि एकर** जमीन वाहित आहे, त्यांत एकोणीस कोटि गेले! शिवाय ह्यूम शेतकी खात्याचे सेक्रेटरी ह्मणतात; दरसाल कमींत कमी **साडेसात कोटींचीं शेतकी**

**जनावरें मरतात.** हीं पुनः घेतलींच पाहिजेत; ह्मणजे साडे-बावीस कोटींचा दुसरा खर्च आला. तरी तो पंधराच धरूं आणि **पांच कोटींची** शिल्लक काढूं; इतक्या तऱ्हेनें हिशेब केला तरी माणशीं **चार आणे शिल्लक पडतात** !! तेच इंग्लंडांत **त्रेसष्ट** रुपये ! काय येथें आतां बोलावयाचें आहे ? कंगालगिरीची नाहीं का कमाल झाली ? हें जमाखर्ची तऱ्हेनें सिद्ध झालें. आंकडेशास्त्र कोणाला संमत नसेल यास्तव सरकारी कामदारांचा लेखी पुरावा हवा असल्यास पहावा.

वायव्यप्रांतचे ले० गव्हर्नर कालव्हिन ह्मणतातः "या लोकांचें उत्पन्न प्राण राखण्याला सरासरीनें पुरे असें असतें; प्राण तगण्याला अत्यावश्यक अशा पदार्थांवरच त्यांची गुजराण होत आहे." इ० स० १८८९ च्या आक्टोबर महिन्यांत सरकारी ठराव प्रसिद्ध झाला त्यांत खुद्द हिंदुस्थानसरकार ह्मणतें "सर्व हिंदुस्थानभर हातातोंडाशीं गांठ सदैव असणारे, आमरणांत कर्जभरू, **शिल्लक न पाडतां** राहाणारे ( येथें पाडतां न येणारे असें सरकार ह्मणत नाहीं बरें ? ) आणि अस्मानी प्रसंगीं कशाचा भास नसणारे असे पुष्कळ लोक आहेत हें सिद्ध होण्याला पुरावा आहे." सर चार्लस ईलियट, हिंदुस्थानसरकारचे कारभारी तर साफ ह्मणतातः—"आमच्या शेतकऱ्यांपैकीं **निम्मे लोकांस** सबंध वर्षांत पोटभर जेवणें ह्मणजे काय हें माहीत नसतें असें मी बिनदिक्कत ह्मणतों." निम्मे शेतकरी ह्मणजे **सात कोटि लोक** ! फयजाबादच्या कमिशनरांस वाटतें कीं, पुष्कळ लोकांना या देशांत अजी अन्नच खावयास मिळत नाहीं. प्रांतोप्रांतींचीं सरकारेंही हेंच ह्मणतात.

बंगालसरकार ह्मणतें कीं, शेंकडा **चाळीस** लोकांना दोन वेळच्या ऐवजीं एक वेळ मात्र पोटभर खावयास मिळतें. पंजा-

वांत महर्गतेच्या वेळीं अन्न मिळेनासें होतें. मुंबईइलाख्यांत "माणशीं दोनलाखांपेक्षां कमी धान्यावर उदरनिर्वाह करणाऱ्या कैक जाति आढळतात." एक सेटलमेंट आफिसर ह्मणतो:— "ओवडधोवड दोन वेळ अन्न ह्मणजे पक्की मिजास झाली." सिव्हिल सर्जन स्यांडल यांचें ह्मणणें:—"एक वेळेपेक्षां जास्त अन्न न मिळणें हा एक नियमच."

अशीं किती तरी मतें देतां येतील. पण वाचकांची जास्त वेळ घेणें बरें नव्हे; तेव्हां जांभया येण्यापूर्वीं आटोपतें घ्यावें हेंच बरें. तथापि पैसा शिल्लक नाहीं व पोटभर अन्न मिळत नाहीं; या दोन गोष्टी सिद्ध झाल्या तशाच आणखीही कांहीं करावयाला पाहिजे होत्या. त्या आतां पुढें करूं. पण हा सर्व प्रकार पाहून आह्मीं काय शिकावें? सरकारानें काय केलें पाहिजे? आमची धडगत कशी? अखेर आह्मी उपाशींच मरणार कीं काय? वगैरे पुष्कळ प्रश्न सुचतात त्यांचा थोडासा खुलासा होईल तर बरें!

आह्मी होत होत पक्के कंगाल झालों तर झालोंच! तुरुंगांतल्या कैदी लोकांसारखें अन्न आणि त्यांच्याइतका सुद्धां किंमतवान पैसा मिळूं नये हा काय संसार का गृहस्थाश्रम! का सुसंपन्नता! का सुवर्णभूमिपणा! का आहे तरी काय! इतकें जबरदस्त पिशाच बोकांडीं बसल्यानंतर आमच्या हातून पुढें होणार तरी कोणते दिग्विजय? आणि करणार कसली सुधारणा? पोट भरवत नाहीं तर जीव धरून राहवें तरी कशाला? अशा प्रकारचे विचार कैकांच्या मनाशीं घोंटाळूं लागतील. हा सारा प्रकार आमच्या अजागळी मूर्खपणाचा आणि सरकारच्या निर्दयी द्रव्यलोभाचा यांत कांहींएक संशय नाहीं. यास्तव उद्योग करून जास्त सुसंपन्न होण्याचें तूर्त राहो बाजूस, पण पोटभर खाण्यास तरी मिळविण्याच्या यत्नास लागावें, आणि सरकारानें आ-

पल्या सर्वस्वी स्वाधीन झालेल्या अनाथ प्रजाजनांवर आपली, आपल्या देशाची आणि जातभाईची भर करण्याची हांव सोडावी. मेंढरूं जिवंत ताजेंतवानें राहील तर हवीतितकी लोंकर मिळते. एकदम सर्व लोंकर मिळावी ह्मणून कातडें कापूं नये किंवा चाऱ्याचा खर्च येतो ह्मणून त्याला उपाशीं मारूं नये. कोंकरूं लठ्ठ होईल त्या मानानें लोंकरही वाढेल; यास्तव या अठ्ठावीस कोटि प्रजेच्या पोटापाण्याची कशी तरी तजवीज केली पाहिजे. पोटापाण्याची तजवीज ह्मणजे अन्नसत्रें घालणें नव्हे. त्यांना उद्योग दिला पाहिजे. इंग्रजी राज्याबरोबर व्यापारी इंग्रज, शेतकरी इंग्रज, कामदार इंग्रज असें इंग्रजांचें पेंव फुटलें आहे. तें थोडें कमी करावें. थोडथोडा आणि दमादमानें आहार करीत गेलें तर पचेल; नाहीं तर पचावयाचें नाहीं हें तत्व ध्यानांत ठेवलें पाहिजे. आपल्यावर जबाबदारी मोठी आहे. अठ्ठावीस कोटि प्रजेचे प्राण स्वाधीन आहेत; तेव्हां त्यांच्याकडून आशीर्वाद मिळतील असेंच सरकारानें वागावें. अभिप्राय घेण्याचें सहसा काम करूं नये आणि प्रजेनें आपल्या सामर्थ्यानुरूप स्वतःच्या पोटापाण्याची तजवीज प्रथमतः केली पाहिजे. अन्नमय प्राण आहे आणि प्राणमय सर्व जग. प्राण आपला अगोदर राखला पाहिजे. नंतर सर्व गोष्टी. सध्याचें भयंकर काहूर पाहूनही आपल्या पोटापाण्याची तजवीज करण्याचें सुचणार नाहीं तर मात्र आमचें नष्टचर्य मोठेंच खडतर ह्मणावयाचें !

---

## आह्मांस ही नीचतर दैना आली तरी कशानें ?

प्रस्तुत कालीं आह्मां सुवर्णभूमींतील भारतीयांस मोठे कष्टतर दिवस आले ! पोटभर अन्न नाहीं; अंगावर वस्त्र मिळेना; तुरुं-

गांतील कैदीपेक्षां सुखवस्तु लोकांची कंगालगिरी फार; सालोसाल सात आठ कोटि माणसें अन्नाविण उपाशीं मरताहेत; अंगांत तकवा ह्मणून कसा तो नाहींच, वगैरे वर विवेचन झालेंच आहे. आमचे ६ मजूर आणि इंग्लंडचे तीन मजूर सारखे असें काटन साहेब ह्मणतात. चांगलें अन्न मिळत नाहीं ह्मणून ज्वराची सांथ फार येते आणि वीस कोटींपैकीं दरसाल **सत्तरलाख माणसें** या तापानें मृत्युमुखीं पडतात! दरहजारीं आमच्या देशांत मरणाची संख्या **पस्तीस** आहे. विलायतेस **एकवीस;** फ्रान्सांत **तेवीस;** स्वीडन **एकोणीस.** "ब्रिटिशइंडिया आणि तिचे राज्यकर्ते" या ग्रंथकारानें स्पष्ट ह्मटलें आहे कीं, भिकार आणि अपुरें अन्न, यामुळेंच इतके लोक तापानें पटापट मरतात. शिवाय सालोसाल ही मृत्युसंख्या वाढत्या प्रमाणावर आहे. सरकार, रोगराई, हवा वगैरे संबंधानें इतका बंदोबस्त घेतें, इतके दवाखाने वाढताहेत तरी मरणाची संख्या जास्ती कां? इसवी सन १८८० सालीं शेंकडा **वीस** मृत्युसंख्या होती तर पंच्याऐशीं सालीं **सव्वीस** झाली! मीठ प्राणाला अत्यावश्यक, पण तें दिवसेंदिवस कमी कमी मिळत आहे. १७ पासून तेवीस रत्तलपर्यंत तरी दरमाणशीं मीठ अगदीं अवश्य हवें असें मद्रासचे सरकारी स्यानिटरी कमिशनर डाक्टर कारनिश ह्मणतात; पण आह्मांला पुरे **दहा** रत्तल देखील मिळत नाहीं असें सरकारी आंकड्यांवरून सिद्ध होतें; ह्मणजे एकंदरींत आह्मांला पोटापाण्याच्या हालांखालीं मरावें लागतें हें सिद्ध झालें नाहीं काय?

आह्मी ह्मणजे हिंदुस्थानवासी प्रजा **एकंदर जगांतील लोकसंख्येच्या सहाव्या हिशा**इतकी आहों. सर्व दुनयेंत मोठे रूबदार अशी आमची ख्याती, पण या वर्षापासून त्या वर्षापर्यंत घांसभर अन्न नाहीं, दुष्काळभीतीचा भयंकर मेघ सदा डोक्यावर गर्जत असतो, अशा स्थितींत लोळतों आणि तेही सर्व

जगांत फार उमदे, मोठे सच्छील आणि पराकाष्ठेचे चांगले ह्मणून नाणावलेल्या प्रभूच्या कृपाछत्राखालीं असतांना! तेव्हां अशी ही नामोहरम कंगालगिरी आली कशानें? येण्याचीं कारणें कोणतीं आणि इतक्या भयंकर दुःस्थितीप्रत नेण्याजोगा राष्ट्ररूपी शरीरांतला कोणता भाग विघडला? असे प्रश्न सकृद्दर्शनीं आठवतात. या प्रश्नांचीं उत्तरें देणें कठिण आहे, पण उत्तर दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

आमच्या या नीचतर दैनेचीं अनेकांकडून अनेक कारणें सांगण्यांत येतात. पण त्यांपैकीं १ लोकसंख्येची झपाट्यानें वाढ; आणि २ लोकांतला साधारण उधळेगिरीचा संसार हीं मुख्य होत. त्याचाच प्रथम विचार करूं.

सर डब्ल्यु हंटरसारखे निष्णात आंकडेशास्त्री सुद्धां ह्मणतात कीं, या बालविवाहामुळें आणि लग्न लग्न ह्मणून धडपडण्याच्या साहजीक प्रवृत्तीमुळें असंख्यात प्रजा दरसाल वाढते. आतांच त्याचा बंदोबस्त करावा, नाहीं तर पुढें मोठे भयंकर दिवस येतील. तसेंच दुसरे इंग्रज अधिकारी ह्मणतात कीं, लग्नांत आणि सोहोळ्यांत सगळ्या पैशाचा हे लोक चक्काचूर उडवितात आणि अखेर अशा अन्नान्नदशेला येतात!

तेव्हां अशा या लोकांच्या तर्कशास्त्राला आंकड्यांवरून मुद्देशीर असेंच उत्तर दिलें पाहिजे. प्रथमतः लोकसंख्येच्या वाढीची इतर देशांतील व आमच्या येथील अशी तुलना करूं.

## दर शेंकडा लोकसंख्येची वाढ.

| | | | |
|---|---|---|---|
| इंग्लंड आणि वेल्स. | १.३७ | ग्रेटब्रिटन... ..... | १.३२ |
| हालंड........... | १.१३ | जर्मनी........... | १.२४ |
| स्वीडन........... | १.२ | डेन्मार्क. ........ | १.२ |

सर्व युरोप ... १.०६

हिंदुस्थान १.

या आंकड्यांवरून युरोपांत जितकीं मुलें होतात तितकीं आमच्याकडे नाहींत; कारण १८७१ व १८८१ या सालची खानेसुमारी पाहतां शेंकडा •७३ ह्मणजे पुरा एक देखील नाहीं असें प्रमाण आढळतें. पाऊण न घेतां सबंध एक धरला तरी "उंदरासारखीं भराभर पोरें होणारे" आह्मी नव्हेंत असें सिद्ध होतें! विलायतेइतकीच लोकसंख्येंत वाढ आमच्या देशांत होते, जास्त नाहीं, असें सिद्ध झालें ह्मणावयास हरकत नाहीं. तथापि हीही गोष्ट कबूल केली कीं, दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत आहे. पण त्यामुळें उत्पन्नही वाढलें पाहिजे. ग्रेटब्रिटनचें (विलायतचें) उदाहरण पहा.

इ. स. १८०६ सालीं लोक दीड कोटि होते, तर उत्पन्न १७० कोटींचें.

१८४० सालीं २ कोटि ६० लक्ष लोक होते, तर उत्पन्न ५४० कोटी.

१८८२ सालीं तीन कोटि ४० लक्ष लोक, तर उत्पन्न १२४७० कोटि रुपये.

ह्मणजे लोकसंख्येची वाढ तर अर्थात् उत्पन्नाचीही असली पाहिजे. आमचा देश सरकार ह्मणतें अपार संपत्तीचें उत्पत्तिस्थान. खरें आहे. मध्यप्रांत, आसाम, पंजाबांतील अंतर्वेदी वगैरे प्रांत हल्लींपेक्षां दुप्पट प्रजा झाली तरी न डगमगणारे आहेत. लोक वाढले तर **सात कोटि ऐशीं लक्ष** एकर जमीन पडित आहे ती वाहीत आणतां येईल. साऱ्या दुनयेला पुरविण्याइतक्या वनस्पतींचीं जंगलें जय्यत आहेत; हल्लीं सुद्धां आमचा देश दरसाल **दोन कोटि ऐशीं लक्ष हंड्रेटवेट** तांदूळ व **ऐशीं लक्ष हंड्रेटवेट** गहूं बाहेरदेशीं पाठवितो. याखेरीज अद्याप ठावठिकाणा लागतच नाहीं अशा किती तरी खाणी आ-

हेत व शिवाय पुनः सरकार मनांत आणील तर मात्र युरोपांतला शास्त्रीय शोध, अनुभव आणि द्रव्यकोश हात जोडून तयार आहे. त्याच्या योगानें लाखों उद्योग हां हां ह्मणतां उभारतां येतील! इतकें असूनही तुह्मी लग्नें करून भराभर पोरें मात्र जास्त वाढवितां असा आरोप लादणें यास काय ह्मणावें? वाढतील तर मिळवून खातील; त्याची इतकी पंचाईत ती कशाला?

आतां दुसरा मुद्दा आमचा उधळेगिरीचा संसार हा होय; पण तो सुद्धां पहिल्याइतकाच पोकळ आहे असें सिद्ध करावयास फार श्रम नकोत.

आह्मी लग्नाकार्यांस जास्त खर्च करतों ही गोष्ट खरी आहे. पण एकंदर खर्च फार थोडा असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आमचा वास्तविक खर्च जास्त नाहीं, पण उत्पन्नच फार भिकारडें पडलें त्याला नाइलाज आहे. उत्पन्न कसें आहे याचें अनुमान पहावयाचें असल्यास खालचें कोष्टक पहावें. आमचें एकंदर शेतकी उत्पन्न चारशें एक्याऐशीं कोटि रुपये किंवा माणशीं तीस रुपये. शेतकरी सोळा कोटि आहेत. दुसऱ्या बाबीचे साडेएकतीस कोटि रुपये. आमच्या व इतर देशांच्या उत्पन्नाची आतां तुलना करूं.

| देशाचें नांव: | शेतकी उत्पन्न. | | इतर. | | मिळून दर-माणशीं. |
|---|---|---|---|---|---|
| | एकंदर रुपये. | दरमाणशीं रुपये. | एकंदर रुपये. | दरमाणशीं रुपये. | |
| युनायटेड किंगडम (इंग्लंड स्काटलंड). | २६६०० | ३३० | ९८१०० | ४५० | ३५० |
| फ्रान्स. ............ | ४४४०० | २५० | ५११०० | २७० | २५० |
| रशिया ............ | ५०९०० | ९० | २५१०० | ९० | ९० |
| इटली. ............ | १७८०० | १०० | ११४०० | १०० | १०० |
| सर्व युरोप......... | २६१७०० | १५० | २८२३०० | २१० | १८० |
| अमेरिका. ......... | ६०४०० | २४० | ८१६०० | ३३० | २७० |

आणि आमचा देश हिंदुस्थान

| | | | | |
|---|---|---|---|---|
| शेतकी | एकंदर | ३३१०० | माणशीं | २० |
| इतर | ,, | २१००० | ,, | ५० |

एकंदर माणशीं २० रुपये. दहा रुपयांचा पौंड धरिला आहे. हा हिशेब पौंडांवरून घेतलेला.

या कोष्टकावरून शेतकींत व इतर धंद्यांत आमची किफाईत किती आहे हें स्पष्ट कळून येईल. पोट पाणी देखील या उत्पन्नांतून बाहेर पडण्याची मारामार, हें मागें सांगितलेंच आहे; तरी पुनः इतर देशांत पोटखर्चाखातर काय रकम लागते व आह्मी किती खर्चितों याचा अंदाज पाहूं.

माणशीं, सालिना पोटखर्च.

युनायटेड किंगडम......... १०६ रुपये.
( इंग्लंड स्काटलंड ).
फ्रान्स.................. ७८ रुपये.
अमेरिका............... ९५ रुपये.
एकंदर युरोप............ ७९ रुपये.
**आमचा देश**............ २५ रुपये.

यावरून आह्मी अन्न कसलें सुग्रास खातों हें कळून येईल ! असो, हे आंकडे पाहून तरी काटकसर करावी, फाजील खर्च ठेवूं नये वगैरे ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगण्यांत आतां वेळ घालविणें बरें नाहीं; कारण आधींच आमच्या प्रस्तुतच्या दैनेमुळें तें ब्रह्मज्ञान पावलोपावलीं आपसुख शिकत आहों. बेताबाताच्या खर्चापासून होणारे फायदे आणि उधळपट्टीपासूनचे तोटे आह्मांस चांगले कळतात. पण आपला जीव कसा तरी राखिला पाहिजेना ? तुरुंगांतल्या अन्नाइतकें **कसदार** अन्न खाऊन आमची निभा-

वणी कशी लागावी ? ही दैना चुकावी ह्मणून आह्मी आपली पराकाष्ठा करितों. पण ती कपाळाची दैना चुकेना !

ही दैना येण्याला आमचा आळस कारण नव्हे, चैनबाजी नव्हे, उधळेगिरी नव्हे कीं मूर्खपणा व आयदीपणा नव्हे. सारा दिवस खपून बिचाऱ्यांना पोटभर अन्न देखील मिळूं नये हें आमचें खडतर दुर्दैव होय; त्यामुळें कांहींएक सुचेनासें होतें. वास्तविक पाहतां या आमच्या नीचतर दैनेचें मुख्य कारण, अपरिहार्य अशी परदेशाच्या व्यापार उदम्यांची आह्मांबरोबर लागलेली झटापट आणि त्यांच्याशीं सामना देण्याला आवश्य असणाऱ्या साधनांची अननुकूलता हेंच होय.

---

## परकीयांच्या असह्य स्पर्धेमुळें आणि स्वकीयांच्या अक्षम्य औदासिन्यामुळें हा देश रसातळास चालला !

आपल्या देशाच्या कष्टमय दैनेचीं कारणें वर सांगितलीं त्यांत परकीयांची असह्य स्पर्धा आणि ती निवारण करण्याचें आंमच्यांत सामर्थ्य नाहीं, हीं मुख्य होत, असें ह्मटलें आहे; तर आज ह्या असह्य स्पर्धेचा आमच्या देशावर कसा काय परिणाम घडला हें पाहूं.

'परक्यानें स्पर्धा मांडली, त्याला मी काय करूं, नाहीं तर असें केलें असतें' वगैरे प्रकारचीं रडगाणीं गात बसणें नेभळेपणाचें आहे खरें. असेल अंगांत ताकद तर स्पर्धेला डगमगण्याचें कारण काय ? त्यापासून उलटी ईर्षा वाढली पाहिजे. परंतु स्पर्धा तरी समानस्कंधांत किंवा "धर्मरूप" तऱ्हेची हवी. आमच्याशीं स्पर्धा करणाऱ्या युरोपियन कारागीर किंवा भांडवलवाल्यांस किती तरी पट आमच्यापेक्षां जास्त सवलती आपोआप

मिळतात. त्यांची सामुग्री कशी जय्यत आणि त्यांची दृष्टि कशी काटेकाट काव्यानें भरलेली, वगैरे गोष्टी पाहिल्या ह्मणजे दंड ठोकून (मल्लयुद्ध करणाऱ्याबरोबर लढण्यास नंगी समशेर आणि जंगी तोफ घेऊन छापाछुपा वगैरे लपंडावाचा उपयोग करून चाल करणारा) शिपाई जसा यावा तसा प्रकार आमचे कारागीर आणि इंग्रजी उद्योगधंदेवाले यांच्या स्पर्धेत आढळतो. हिंदुस्थानांतला कामकरू कोणीकडेही जावो, त्याच्यापुढें मुबलक भांडवलाचा, पूर्ण चतुर आणि जय्यत पाठिंब्याचा युरोपकर स्पर्धा मांडावयाला दत्त ह्मणून आहेच तयार! त्याच्याशीं टक्कर देणें मोठें मुष्कील पडतें; तरी आपली परांकाष्ठा करून या धंद्यांतून त्या धंद्याकडे आपला मोर्चा वळविणें हिंदुस्थानच्या कामकरूंस भाग पडतें. असें झालें कीं, युरोपकर ती जागा .पटकावतो. कोणताही धंदा असो; त्यांत आरंभीं कितीही नुकसान येवो; हा युरोपकर, तो धंदा नेटानें, प्रसंगीं पुरा तोटा सोसून, आपल्या प्रतिस्पर्ध्यांना दुकान बंद करून परत जावयाला लागेतोंपर्यंत त्यांची पिछा सोडीत नाहीं आणि मागाहून तर पिछा धरण्याची जरूरच पडत नाहीं.

हिंदुस्थानच्या वांट्यास आलेली स्पर्धा दुजोरांतली—आंतून आणि बाहेरून, दोहोंकडून सारखा मारा चालला असतो. आमचा आयात व्यापार ह्मणजे परदेशच्या मोहक, सुबक आणि स्वस्त्या विलायती वस्तूंचा सालोसाल येणारा पूर, हा बाहेरून आमच्या देशाच्या उद्योगधंद्यावर चाललेला मारा. आणि परदेशच्या भांडवलवाल्यांनीं अजस्र शक्तीचे दांडगे कारखाने या देशांत उभारून फार फार तर आह्मांला रोजची मजूरी द्यावयाची आणि सर्व फायदा आपल्याकडे घ्यावयाचा, हा प्रकार आंतून होत असलेल्या माऱ्याचा. ह्मणजे आमच्या देशाला आंतून आणि

बाहेरून अशा दोन्ही प्रकारच्या स्पर्धेत सांपडावें लागलें आहे. मनुष्यें आणि राक्षस, किंवा उंदीर आणि मांजर, यांच्यासारखी ही आमची स्पर्धा आहे. पंचमहाभूतांचें सांहाय्य घेऊन बड्या अकलवाल्यानें एखाद्या नांगऱ्या कुणबटावर कोसळावें, त्यांतलाच हा प्रकार !

ही अशी दुजोरी स्पर्धा रोजरोज जोरानें वाढतच आहे. आगगाडीचा एक मैल रस्ता किंवा आगबोटीचें एखादें बंदर वाढलें कीं तेवढा पाय आमचा मागें हटला. आमचे कारागीर या स्पर्धेमुळें अगदीं निराश आणि निराश्रित असे दीनवाणे, आपले दोन्ही हात पोटावर बांधून घेऊन सैरावैरा हिंडूं लागले आहेत. कोणत्या ना कोणत्या तरी स्वतंत्र रीतीनें आपलें पोट भरीन ह्मणेल तर भांडवल, कल्पकता आणि उरक त्यांच्यांत कोठें असतात! अरेरे! काय करतील विचारे. साऱ्या दुनयेचें मायबाप सरकार ह्मणून त्यांनीं त्यांच्याकडे पाहावें. पण तेथें त्यांची दाद कसची लागणार! पण त्यांच्याशीं सामना करून विजयी झालेल्या-आह्मांस परक्या पण—आपल्या जातभाईकडेसच त्यांची मेहरनजर वळते. मायबाप सरकार या अनाथ कंगालांस साहाय्य करीत नाहीं. सुधारणेनें, कल्पकतेनें आणि धाडसी उद्योगधंद्यानें पुढें पुढें जाणारांसच यांची सर्व प्रकारें मदत! "देवो दुर्बलघातकः !" नद्या समुद्राला जाऊन मिळतात; तसाच हा प्रकार ह्मणावयाचा. सख्या भावापुढें अगोदर गुलाम बनवून मग शिष्टाईखातर दत्तक पुत्र ह्मटलेल्यांची काय पर्वा !

असो; ही अशा प्रकारची आणि रोज रोज जास्त तीक्ष्ण होणारी स्पर्धा आज जवळ जवळ अर्ध शतकावर आमच्याशीं चालू आहे; यामुळें झालें काय ? तर, देशी कारागिरी सफेजंग बुडत चालली, पूर्वापार असलेली उद्योगपरंपरा बिघडली, पर-

देशच्या उद्योगधंद्यांचे पाय रोज रोज अधिकाधिक पसरत चालले. आणि तितक्या मानानें स्वतःच्या कमाईनें किंवा परस्परांच्या मदतीनें आपल्या दैनेंतून मुक्त होण्याची आशा नष्ट होत चालली आहे.

आतां ही स्थिति वास्तविकपणें खरी कितपत आहे हें पाहावयाचें असेल तर, आंकडेशास्त्र्यांकडून उद्योगधंद्याच्या लोकसंख्येचें प्रमाण समजून घ्यावें. आमच्या देशांत **शेंकडा ८६** लोक साक्षात् शेतकीवर निर्वाह करणारे; १२ इतर व्यवसाय– सरकारचाकरी, घरचाकरी इत्यादि; आणि इतर कारागिरी करणारे; व **शेंकडा दोन** व्यापारी आहेत. (हा अदमास १८८१ सालच्या खानेसुमारीवरून घेतलेला आहे.) यावरून पहातां आमचा देश निव्वळ शेतकीवर पोट भरणारा असें ह्मणण्यास हरकत नाहीं. इतर उद्योगधंद्यासंबंधानें तर कांहीं बोलावयासच नको. कलाकौशल्यादि कामें हातून गेल्यामुळें उठला सुटला तो शेतकीकडे. खाणी वगैरे खणून खनिज द्रव्याचें संपादन, आतां आमच्या हातीं उरलें नाहीं. आमच्या देशांतल्या मातीचें परकी लोक सोनें करून विकीत आहेत. परक्याचा शिरकाव फार होत गेल्यामुळें नानाप्रकारच्या धंदेवाल्यांस आपापले कारखाने बंद करावे लागले. आमच्या देशांतल्या व्यापारांत परदेशचे लोक शिरले आणि एकंदर व्यापारांतला नववा हिस्सा आपल्याकडे घेऊन एक हिस्सा तेवढा त्यांनीं आह्मांस सोडिला आहे. दर्यांतून नेआण करणें सर्वस्वी इंग्रज जहाजवाल्यांकडे सोंपविल्यासारखेंच आहे आणि जमिनीवरली नेआण तर दुसऱ्या कोणाकडे नाहींच; ह्मणजे एकंदरींत शेतकीशिवाय बाकी एकंदर धंद्यांस आह्मी मुकलों आणि मुकणें आह्मांला भाग पडलें! कमाईच्या धंद्यांतल्या अर्ध्याहून जास्त

भागाला आणि तो स्वतःच्या देशांतला असतांना, आह्मांला मुकणें भाग पडावें आणि इतक्या विपुल सामुग्रीच्या आणि उमद्या धंद्यास बुडतें टाकून कसा तरी अर्धपोटीं गुजराणा करावा ही खरोखर मोठी दुःखमय दैना! आमच्या देशांतील कैक कारखाने अगदीं उजाड झाले आहेत. कुबेरासारखे महान् धनाढ्य पुरुष, कीं ज्यांनीं गोरगरीबांचा समाचार घेऊन आपल्या देशाला शोभा आणिली ते आतां कोठें आहेत? साऱ्या दुनयेंतील नटव्या लोकांना, रेशमी कापडांनीं मढवून काढणारे आमचे रेशमाचे कारखाने आतां गेले तरी कोठें? प्राचीन आर्यभूला अभिमानास्पद वाटणारे ते कोष्टी कोठें आहेत? डाक्याच्या मलमलीचे कारखाने कोठें गेले? पूर्वी ठाण्यास चार हजार कोष्टी रेशीमकाम करीत असत; तेथें आतां सातच घरें—त्या कोष्टयांचीं—कशीं राहिलीं? अशा प्रकारें कितीही पूर्ववैभवाची आठवण केली तरी ती सर्व व्यर्थ होय! झाली गोष्ट परत येत असते थोडीच! परंतु प्रस्तुतसारख्या शाहण्या व दूरदर्शी सरकारानें असा प्रकार आपल्या अमदानींत होऊं दिला, हें त्यांच्या थोरवीस आणि दूरदृष्टीस बट्टा लावणारें आहे असें मात्र आमच्यानें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं.

आमच्या देशांतल्या लढाया, मारामाऱ्या व हाणाहाणी नाहींशा झाल्या, आणि इंग्रज सार्वभौमाच्या कृपाछत्राखालीं आह्मी आलों तेव्हां, उद्योगधंद्याची आमची स्थिति कशी होती? आमचा खुष्कीव्यापार पक्षघातानें आसन्नमरण होऊन पडला होता. त्याचीं उपांगें सर्व विघडलेलीं. समूहमात्रानें काम करण्याची, कारागीर लोकांतील शक्ति नष्टतेप्रत गेलेली! पत (ह्मणजे उद्योगधंद्याचा प्राण) वहुतेक नष्ट होऊन राष्ट्राचा उद्योग बुडत चाललेला! अशा स्थितींत असतां इंग्रजप्रभूंच्या कृपा-

छत्राखालीं आमचा देश शिरला; त्यामुळें युरोप, अमेरिका इत्यादि सर्वांचें लक्ष आह्मांकडे लागलें. व्यापार, दळणवळण आमच्याशीं त्यांनीं ठेविलें आणि येथें स्पर्धा सुरू झाली. आपल्या उद्योगधंद्याला त्यांनीं अगदीं पूर्णतेस पोंचविलेलें! तेव्हां ती स्पर्धा ह्मणजे मोठी जबरीच ह्मणावयाची. एकाकी–कोणाचें साहाय्य नसतां–व गाफीलपणानें राहतांना अशी स्पर्धा लागली तेव्हां आह्मांला थोडें तरी साहाय्य देणें सरकाराला जरूर होतें आणि त्यांतून सामना देण्यास तयार होई तोंपर्यंत तरी निदान साहाय्य दिलें असतें तर सुद्धां बहार होती. पण आमच्या देशांत राज्यसूत्रें हालवावयासाठीं आलेल्या इंग्रज राजपुरुषांस अशा प्रकारें देशी कारागिरांस साहाय्य करणें उक्त आहे असें वाटलें नाहीं. आपल्या साहाय्यानें एतद्देशीय कलांचें हें घोरतर मरण चुकवावें असें त्यांच्या मनांत सुद्धां आलें नाहीं; ह्मणून आमच्याशीं लागलेल्या स्पर्धेत आह्मांला सरकारानें साहाय्य केलें नाहीं तें नाहीं; पण निदान तिऱ्हाईतपणानें स्वस्थ बसतें तरी काय होतें बरें? आमचें आह्मीं पाहून घेतलें असतें. सरकारानें आह्मांला मदत न करतां आमच्या प्रतिस्पर्ध्यांस लागेल तें साहाय्य दिलें. अप्रतिबंध व्यापाराचें प्रस्थ माजविलें, रेल्वेचा विस्तार वाढविला, अशा एक का दोन तऱ्हेनें ह्मणून आमच्या देशांतील प्रतिस्पर्धी मंडळीस सरकारानें साहाय्य केलें? त्याचा परिणाम कसा काय झाला हें सांगण्याची आतां गरज नाहीं. आज इतकीं वर्षें सारखी आमच्याशीं स्पर्धा चालली आहे, त्यामुळें आणि कोणाचेंच साहाय्य नव्हतें ह्मणून, आह्मां लोकांना तेव्हांच दूर एका कोनप्यांत परक्यांनीं ढकललें. अशा रीतीनें आमच्या तोंडांतला घांस निघाला. परकीयांनीं आमच्या पुढचें वाढलेलें ताट ओढून आपणांपुढें घेतलें. आमचें कलाकौशल्य

ठार बुडालें. उद्योगधंदा पार नाहींसा झाला. तथापि कोणी मनावर घेतलें, आमचे आह्मीं देशकल्याणाचे खरे विचार मनांत आणिले, आज आपल्याला कोणत्या प्रयत्नाची अगदीं जरूर आहे हें ध्यानांत आणून त्याप्रमाणें केलें, जीवापाड श्रमानें मिळविलेला पैसा ब्यांकेंत पुरून टाकण्यापेक्षां अगर तरण्या आडदांड अविचारी लोकांना कर्जाच्या जाळ्यांत गोंवून बुचाडण्याकडे लावण्यापेक्षां उत्पादक धंद्यांत घालून पांचपन्नास लोकांस अन्नाची सोय करून दिली, आपली बुद्धि आणि आपल्यावर शिक्षणानें घडलेला संस्कार यांचा उपयोग केवळ जिव्हालौल्य अगर अंगुलीचापल्य दाखविण्याकडे न करतां हरहुन्नर शोधून काढण्याकडे केला, ह्मणजे सारांश हल्लींच्या कालमानाकडे लक्ष देऊन आपल्या कर्तव्यानुसार जर आह्मी वागलों व त्याचप्रमाणें सरकार जागें होऊन आपल्या कर्तव्याकडे पाहील व स्वतःच्या प्रजेच्या खऱ्या कल्याणाकडे बेपरवाईनें कानाडोळा करणार नाहीं तर, अद्याप थोडीशी आशा आहे. उपासमार काढीनात कां, पण आमचे कारागीर जिवंत आहेत. साळी, कोष्टी, निळारी, रंगारी, तांबट, तेली, आतारी, लोहार, कुंभार, जिनगर, चांभार वगैरे खेड्यापाड्यांतून कां होईनात ते दृष्टि वर फेंकून हताश होत्साते मरणाची वाट पाहत बसले आहेत. त्यांना हातीं धरा, त्यांना हल्लींच्या काळाचें धोरण पढवा, त्यांना साहाय्य व उत्तेजन द्या, नवीन नवीन कल्पना त्यांच्या डोक्यांत घाला. परकीयांचा पाताळयंत्रीपणा आणि दीर्घोद्योग त्यांच्या पक्का लक्षांत भरवा. त्यांच्या हातून एकट्याच्यानें निभाव लागत नाहीं, तेव्हां तुह्मी त्यांच्यांत मिळा आणि जुटीच्या बळाचें फळ मिळवा; ह्मणजे पुनः कदाचित् थोडासा जीव, उद्योगधंद्यांत व कलाकौशल्यांत आला तर येईल.

---

## आमचे उद्योगधंदे परके बळकावताहेत.

उद्योगधंद्यानें पैसा मिळतो; पैसा सुखाचें साधन; पैशाशिवाय मनुष्याचा जन्म व्यर्थ; आणि पैसा नाहीं ह्मणजे मनुष्य कुचकामाचा ठरतो. उद्योगधंदा करावा, पैसा मिळवावा आणि सुखानें कालक्रमणा करावी हा क्रम मनुष्यमात्राच्या साहजिक इच्छेचा. परंतु आमचा देश आणि आमचे लोक दिवसेंदिवस पहिल्या प्रतीचे कंगाल होत चालले आणि झाले आहेत, हें आतां एक प्रत्यक्ष प्रमाणच होऊन बसलें आहे. तुरुंगांतल्या कैदीसारखें सुग्रास अन्न आणि त्याच्याइतका उमदा पोषाख मिळवूं ह्मटलें तर सुद्धां आमच्याजवळ पैसा नाहीं. अवघें उत्पन्न माणशीं अठ्ठावीस रुपये सालाचें आमच्या देशांत पडतें. सात कोटि लोकांस उपासमार काढावी लागते, दोन कोटि लोकांस अजीं उद्योगच नाहीं आणि कदन्नामुळें "मृत्यूच्या दरबारांतली" ज्वरादि मंडळी आह्मांवर सदां मेहरनजर पुष्कळ करते; हें आतां सर्वांस कळतें व कळविलें आहे. आणि असा प्रकार ह्मणजे "नकारघंटा" वाजविण्याचें सुवर्णभूमींतील लोकांचे कपाळीं यावें; त्यांनीं उपासमाराखालीं दिवस काढावेत; स्वतःसिद्ध इतकी विपुल सामुग्री असतांही ढुंगण झांकावयाचें झालें किंवा घरांत चूल पेटवायाची झाली तर विलायतकरांकडे पाहिल्याशिवाय त्यांस गत्यंतर नाहीं, इतकें लंगडेंलुलें परावलंबन त्यांच्या कपाळीं आलें आहे. अशा स्थितीचें कारण तोंडांत मारून पूर्वापार चालत आलेले आमचे एकेक उद्योग परके बळकावताहेत हें होय !

परक्यांनीं कसकसे आणि कोणकोणते उद्योग आजवर बळकावले हें पाहून तरी आह्मीं लौकर जागें व्हावें; गेले उद्योग ते गेले, चार दोन उरले आहेत ते तरी संभाळूं, असें मनांत आणलें तरी सुद्धां थोडीबहुत निराशा दूर होईल. तें असो; आमचे उद्योगधंदे परके कसे बळकावताहेत हें थोडेंसें अगोदर पाहूं.

शेतकी, खनिज संपत्ति, कलाकौशल्य आणि व्यापार याच कायत्या उद्योगधंद्याच्या मुख्य बाबी. शेतकीची आज मित्तीला अहवाल कशी काय आहे याचा विचार पुढें लौकरच स्वतंत्रपणें करणार आहोंत, तेव्हां येथें फक्त परदेशच्या लोकांनीं आपलें घोडें कितपत ढकललेलें आहे हें पाहूं. सर केअर्डसारखे आपल्या देश आणि ज्ञातबंधु इंग्रज सावकारांना वारंवार सांगतात कीं, हिंदुस्थानच्या शेतकीकडे तुह्मीं आपलें भांडवल गुंतवा; जमीनदारी विकत घ्या. तरी अद्याप तिकडे त्या मंडळीचें लक्ष गेलें नाहीं. परंतु चहा, काफी, नीळ वगैरे लागवडी इंग्रज शेतकऱ्यांनीं बळकाविल्या आहेतच. आजमित्तीस **तीन लाख एकर** जमीन चहाच्या लागवडीस लागलेली आहे. सुमारें **एकशें तीस कंपन्या**–अर्थात् इंग्रज–अडीच कोटींचें भांडवल गुंतवून चहाची लागवड करीत आहेत आणि **सहा कोटि पंचवीस लाख** रुपयांचें उत्पन्न अचानक स्वतःला घेताहेत. पण या लागवडीपासून आह्मांस मिळतें काय ? तंर फक्त दोन लक्ष ऐशीं हजार जणांना मजुरी तेवढी उकळतां येते! तसेंच काफीचें. एक लक्ष शहात्तर हजार एकर जमीन काफीच्या लागवडींत गुंतली आहे. तेव्हां सारांश मिळून इतकाच कीं, अशा प्रकारें हे शेतकींतले धंदे परदेशच्या लोकांनीं आह्मांपासून हिसकावून घेतले; ते आमच्या वांट्याचे गेले.

खनिजसंपत्तीसंबंधानेंही पहातां नुस्ती निराशाच दिसते. सर्व उद्योग सर्वस्वी इंग्रजांकडे गेला आहे. निजामहैद्राबाद, आसाम वगैरेकडील खनिज द्रव्यांचा सर्व मक्ता इंग्रजच घेताहेत. **कोळशाच्या अडसष्ट खाणींतून** ७० लाखांचें दरसाल कमींत कमी उत्पन्न होतें. **सोन्याच्या आठ खाणी.** त्यांत इंग्रजांनीं **अठ्ठावीस लक्ष** भांडवल गुंतविलें आहे. **हिऱ्यामाण-**

**कांच्या दोन**; त्यांत भांडवल २५ हजारांचें; दगडाच्या खाणी-करितां दोघां इंग्रज कंपन्यांनीं तीन लाख रुपये खर्चिले; राके-लच्या खाणीसाठीं ४ लाख; स्लेटीसाठीं सव्वा लक्ष. असें एकंदर **एक कोटि अकरा लक्ष** तीन हजार भांडवल खर्चून खनिज द्रव्यें काढण्याची इंग्रज खटपट करीत आहेत, आणि आह्मी उद्योग बुडाला, धंदा गेला, उपाशीं मरतों असा नुस्ता कंठशोष करीत आहों.

कलाकौशल्याच्या बाबतींत तर काय आनंदच! कोणते उद्योग कसे आहेत याची खालीं माहिती दिली आहे.

१ कापसाच्या गिरण्या ८९ त्यांचें सर्व भांडवल दहा कोटींचें. मात्र यापैकीं तिसरा हिस्सा आमच्या लोकांच्या वांट्यास येतो हें एक महाभाग्यच. फक्त ल्यांकेशायरमध्यें तीनशें कोटींच्या कापसाच्या गिरण्या आहेत, आणि मुंबईस आमच्या लोकांनीं तीन कोटि गुंतविलें त्याची त्यांस कृतार्थता वाटते.

२ जूटाच्या गिरण्या २४.

३ लोंकरीच्या गिरण्या ४. भांडवल १८ लक्ष.

४ कागदाच्या गिरण्या ९. भांडवल ३८ लक्ष.

५ निळीचे कारखाने.—युरोपियनांचें भांडवल **एक कोटि.**

६ रेशमाच्या गिरण्या.—भांडवल १ लक्ष ७० हजार.

७ जूट आणि कापसाचे प्रेस.—१९२. नेटिव्ह लोकांच्या स्वाधीन बराच भाग आहे.

८ लोखंड आणि पितळ.—ओतारी कारखाने. ८००० लोकांस मजुरी मिळते.

९ साखरेचे कारखाने.—१२००० लोकांस उद्योग मिळतो.

१० लाखेचे कारखाने.—६००० लोकांस काम मिळतें.

११ तेलाच्या गिरण्या.—१००० लोकांस काम मिळतें.

१२ कौलांचे कारखाने.—१५०० लोकांस काम मिळतें.
१३ कुंभारकाम.—४०० लोकांस मिळतें.
१४ तंबाकूचे कारखाने.—४०० लोकांस काम मिळतें.
१५ सीमेंट.

असे अनेक कारखाने मिळून पांच लाख लोकांना मजुरी मिळते. बाकी सर्व फायदे परक्यांकडे जातात; अगर दरमहा पांच रुपये माणशीं मजुरी धरली तर दरसाल सुमारें सात कोटी पंचाहत्तर लाख रुपये तेवढे आह्मांस मिळून बाकी सर्व पैसा इंग्रजांकडे जातो.

---

## व्यापार.

व्यापार–उदीम ह्मणजे देशाचा प्राण, राष्ट्राचें वैभव, उन्नतीचें साधन आणि पोटापाण्याच्या तजविजीची चांगली सोय, या गोष्टी सर्वांस चांगल्या ठाऊक आहेत. त्याचप्रमाणें व्यापाराच्या जिवावर लहानसान राष्ट्रें जगांत अतिबलाढ्य व अतिप्रतापी अशीं होऊन बसलीं हें आपण पाहतों. एक व्यापार यावा तसा पूर्णतेंप्रत येत नसल्यामुळें महान् श्रीमान् असा अवाढव्य देश देखील एकंदर साधन सामुग्री उशाशीं बाळगून कंगाल, दरिद्री, अन्नास महाग अशा प्रकारें उपासमार काढीत मरणप्राय दुर्धरावस्थेंत पडलेला आह्मांला दिसतो. व्यापारी धोरणानें नग्या समशेरी काम करणार नाहींत असलीं कृत्यें उठतात हें आपणांला कळतें. असें असूनही आपल्या व्यापाराचें एकेक पाऊल पुढें पडावयाचें तें पडत नाहीं; एवढेंच नव्हे, तर दिवसेंदिवस माघारच; आणि तीही मोठ्या जोराची अशी–येत चालली. याला काय ह्मणावें? आपला देश हिंदुस्थान; त्यांत अपार संपत्ति, सर्व गोष्टींची विपुलता आणि त्यावर हल्लीं इंग्रजांसारख्या न्यायी, नीतिमान्, शांतताप्रिय व लोककल्याणदक्ष अशा प्रभूंचें एकछत्री राज्य. इतकीं

साधनें यथेच्छ आहेत. व देशांत आगगाड्या, तारायंत्रें इत्यादि अद्भुत सामुग्री व्यापाराच्या कामांत अत्यावश्यक अशी फार दिसते, आणि कैक परदेशांतल्या पेंठा आमच्या मालाकरितां हपापलेल्या आहेत. अशा वेळीं वास्तविक ह्मटलें तर, आमच्या व्यापाराची भरभराट फार असावयाला पाहिजे. आमचा व्यापार ह्मणजे आमच्या हिंदुस्थानांतल्या लोकांनीं आपल्या देशांतला माल आपल्या देशांत खपवून पुनः बाहेर देशीं पाठविणें आणि परदेशच्या मालाचा शिरकाव न होऊं देतां आपणांला हवा तो माल आपणच पुरविणें, हा होय. आज कित्येक वर्षें दरसाल **तीस कोटींवर** रुपयांचा निव्वळ फायदा आमच्या व्यापारांत परके लोक मिळवीत आहेत. आह्मांस लागणाऱ्या सर्व वस्तु परदेशचे लोक पुरवितात. सुमारें **चारशें एक कोटि** रुपयांचें कापडच आह्मीं आजवर विलायतचें घेऊन फाडलें! ह्मणजे मूळ कापूस आमचा, तो घेणार इंग्रज व्यापारी, जाणार विलायतेला, तेथें गिरणींत कापड बनून तें इकडे विक्रीस येणार. जातांयेतांनाचें भाडें मिळतें इंग्रज व्यापाऱ्यांला; मजुरी विलायतच्या लोकांस आणि व्यापाराचा बहुतेक फायदाही त्यांचाच. हाच प्रकार बहुतेक बाबतींत. ह्मणजे मजुरी, भांडवलाचें व्याज आणि व्यापारी नफा आमच्या वांट्यास कांहीं येत नाहीं. आणि ह्मणूनच हा इतका तोटा सगळ्या आपल्या देशावर वांटला गेला व जात आहे. वस्त्रपात्र इत्यादि बहुतेक वस्तु तिकडून येतात. तेव्हां ही अशा प्रकारें आपल्या देशाची किती हानि होत असेल याची कल्पना देखील मनाला भयंकर भीति उत्पन्न करिते!

आपल्या देशांतल्या गरजा परके भागवूं लागले ह्मणजे आपलें भांडवल, आपले मजूर, आपले कारागीर, निरुपयोगी असून नसल्या सारखे होतात, आणि असलेला पैसा भराभर बाहेर जाऊं

लागतो, ह्या हानि फार भयंकर होत. विलायतचा प्रत्येक मनुष्य सरासरी दोनशें रुपयांचा व्यापार करितो. आणि आह्मी हिंदुस्थानचे, माणशीं अवघा **सात रुपयांचा** ! आणखी या सात रुपयांत देखील आह्मी एकटेच नाहींत, मोठमोठ्या विलायती व्यापारी मंडळ्या यांत आहेत !! ते सोडले तर माणशीं जेमतेम **दोन रुपयांचा व्यापार** आमच्या वांट्यास येतो. तेव्हां व्यापाराच्या कामांत आह्मी किती मागें आहोंत हें यावरून चांगलें कळून येईल. आणि एवढें कळून आलें तरी सध्या पुष्कळ आहे.

आमचा व्यापार इतका कमी ह्मणजे दुसऱ्या देशाच्या मानानें, आगगाड्यांच्या वेगांत आणि बैलगाडीच्या वेगांत जितकें अंतर तितकें परक्यांच्या आणि आमच्या व्यापारांत अंतर आहे ! तें अंतर कमी करण्याकरितां अहर्निश झटलें पाहिजे. हल्लीं गाडीचें भाडें—नेआण करणें—इंग्रजी व्यापाऱ्यांकडे, जहाजाचे भाडेकरी तेच; पैसा कर्जाऊ देणाऱ्या पेढ्या त्यांच्या; दांडग्या खरेदी त्यांच्या; माल परदेशीं पाठविणारे अडते ते; परदेशचा माल इकडे आणणारे दलाल सुद्धां तेच ह्मणजे इंग्रजी व्यापारी ! आमच्या व्यापाऱ्यांचा शिरकाव कोठेंच नाहींसा झाला आहे. सिंहास शिकार आणून द्यावी आणि तो खाऊन उरेल त्या उष्ट्यावर आपलें पोट भरावें अशी आमची दशा तूर्त होत चालली आहे. माल येथला आयता स्वस्त घेऊन परदेशीं पाठवावा. तेथले महागरे मजूर लावून तो तयार करावा आणि नंतर भांडवलवाल्या सावकारांचें व्याज, मजुरांची मजुरी, नेआण करणाऱ्यांचें भाडें, आणि दोनीकडच्या दलाली, या इतक्या सर्वांला व्यापारी धोरण व त्याप्रमाणें वागणें आमच्यांत नसल्यामुळें या सर्व गोष्टींस विनाकारण आह्मी मुकतों. आमचे व्यापारी पुढें सरसावतील तर तो सर्व फायदा आह्मांस मिळून तितक्या लोकांस जास्त अन्न मिळवून दिल्या-

सारखें होईल. स्वतः त्यांना किफायत मोठी होऊन पुष्कळांचीं पोटें भरल्याचें श्रेय त्यांस येईल आणि देशांतला पैसा जो एक-सारखा परदेशांत चालला आहे तो थोडातरी येथेंच सांचूं लागेल. आमच्या दारिद्र्याची किती परमावधी झाली आणि आमचा व्यापार किती भिकारड्या स्थितींत आहे याचें चित्र हुबेहूब वठण्याकरितां आंकडे शास्त्राच्या साहाय्यानें प्रमाणसूद माहिती दिली पाहिजे. परंतु तो विषय कंटाळवाणा होईल. यास्तव तसें करितां येत नाहीं.

व्यापाराला आमच्या देशांत मात्र पुष्कळ सोई आहेत. एक तर येथल्या मालासाठीं पुष्कळ देशांतल्या पेंठा हपापलेल्या आहेत. दुसरें निसर्गदत्त सोईमुळें सर्व दुनयेची उतारपेंठ व्हावी अशी या देशाची स्थिति; ह्मणजे वर उशाला चीनदेश, पायांखालीं आस्ट्रेलियासारखें स्वतंत्र विपुल संपत्तीचें इंग्रजांनीं वसविलेलें खंड, डाव्या हाताकडे अफ्रिकाखंडाचा किनारा आणि इंग्लंडाचा निकट संबंध. पण यांपैकीं एकाही सोईचा फायदा आह्मांस केवळ आमच्या औदासिन्यामुळें आणि अज्ञानामुळें घ्यावयास मिळत नाहीं. आमच्या घरचा व्यापार बाहेरचे लोक अनेक गैरसोई सोसून बळकावतात, आमचा व्यापार जास्त जास्त वाढावयाचा आणि तो वाढतोही पण तो बहुतेक इंग्रजांकडे जातो; ह्मणजे नेआण करणें, अडत इत्यादि बाबीसुद्धां आमच्या वांट्यास येत नाहींत. आमच्या देशाच्या बंदरीं नांगरणाऱ्या आगबोटी व **जहाजें यांपैकीं शेंकडा साडेतीन आमच्या** लोकांचीं असतात; ह्मणजे शंभर जहाजें आलीं तर त्यांत साडेतीन आमच्या देशी लोकांच्या मालकीचीं असतात. बाकी सर्व नोर–जहाजांचें भाडें–इंग्रज जहाजवाल्यांकडे. दर्याकिनारचा व्यापार **पावणे दोनशें कोटींचा** असा अंदाज

आहे. आणि तो सर्वस्वीं इंग्रज व्यापाऱ्यांच्या स्वाधीन असतो. कमींत कमी सात कोटींवर निव्वळ फायदा जहाजांबद्दल इंग्रज व्यापाऱ्यांस मिळत असावा.

त्याचप्रमाणें इकडून विलायतेस व विलायतेहून इकडे माल आणून विकणारे व्यापारी सर्व इंग्रजच. सुमारें दहावा हिस्सा देखील आमच्या व्यापाऱ्यांच्या स्वाधीन नाहीं. गेल्या वर्षींचें आयातनिर्गत पाहिलें तर कमींत कमी **दरसाल तीस कोटि रुपये इंग्रज व्यापारी या आमच्या देशांतून निव्वळ फायदा ह्मणून ओढितात!** असें दिसून येईल. दर्याकिनाऱ्याचा व्यापार सर्वस्वीं इंग्रजांकडे; तसाच देशावरलाही. रेल्वे नेआण आपणाकडे घेते हें सांगणें नकोच. सुमारें पावणेदहा कोटि रुपये दरसाल रेल्वेला खर्चवेंच जातां मिळतात! ह्मणजे चोहोंकडून असे आमचे एकेक उद्योग गेले आणि ते इंग्रजांच्या घरांत शिरले. आमचें वाढलेलें ताट त्यांनीं आपणांकडे ओढून घेतलें आणि आह्मांपुढें कांहीं राहूं दिलें नाहीं तरी सुद्धां आह्मी आपल्या चैनींत! जणूं काय आह्मांला त्याची वार्ताच नाहीं! आह्मांला ढकलीत आपलें घोडें ते पुढें आणीत आहेत तर आपण स्वस्थ बसूं नये, थोडासा तरी प्रतिकार करावा. आपण असे कां होत चाललों, आपल्यांत काय उणीव आहे याचा विचार केला पाहिजे; कारण हा प्रश्न पोटापाण्याचा. या बाबतींत आह्मी स्वस्थ बसूं, या गोष्टीचा विचार करणार नाहीं, तर दुसरें कांहींएक होणार नाहीं; व्यर्थ प्राणास मुकूं, अन्नाविणें तळमळूं. आज चिपटें अर्ध चिपटें मिळतें तें उद्यां कोळवेंभर सुद्धां मिळण्याची मारामार हें अगोदरच पहावें. सरकार मायबाप. तें इकडे जाणूनबुजून कानाडोळा करतें ह्मणा, किंवा या गोष्टींचा विचार करण्याला त्याला फुरसत मिळत नाहीं असें समजा. हा उद्योग ज्याचा

त्यानेंच केला पाहिजे. तो कसा करावा, कोठें कसें नडतें वगैरे पुढें सांगूं. आज आमचा उद्योग इंग्रजांनीं कसा बळकाविला हें साक्षात् उदाहरणांवरून सांगितलें. ह्मणजे, आमच्या देशांत येऊन आमचेच उद्योग बळकावल्यानें आमचें कसें नुकसान होतें हें दाखविलें. परंतु, त्याचप्रमाणें परदेशच्या जिनसा इकडे अधिक खपूं लागल्यानें जो आमचा उद्योग नाहींसा झाला त्याचा उल्लेख करावयाचा आहे. तो करण्यापूर्वी गेल्या चोवीस वर्षांत कोणकोणत्या जिनसांच्या आयात मालाची कसकशी शेंकडा वाढ झाली हें दाखवूं.

| माल. | १८६४–६५ सा. रु. | १८८६–८७सा. रु. | शें. वा. |
|---|---|---|---|
| कापड सूत इत्यादि. | १३२२७०००० | २९१७२०००० | १२१ |
| लोखंडी सामान, चाकू, कातऱ्या इत्यादि. | ५२६०००० | ९२८०००० | ७६ |
| काचेचें सामान. | ३५५०००० | ५०८०००० | ४३ |
| धातूचें सामान. | ६०८०००० | ३८३४०००० | ५३१ |
| तेल. | ७१०००० (७६सा.) | १४०८०००० | १८८३ |
| कागद, पुण्याचे सुद्धां. | ३४५०००० ,, | ३९२०००० | १४ |
| अन्नसामुग्री, बिसकुटें वगैरे विलायती भक्ष्य. | ७१७०००० | ११७९०००० | ६४ |
| मीठ. | ३४१०००० | ७६८०००० | १२५ |
| रेशमी माल. | ४४३०००० | १३८३०००० | २१२ |
| साखर शुद्ध आणि अशुद्ध. | ३१८०००० | २०८००००० | ५५४ |
| छत्र्या. | १९८००००(७६सा.) | २७४०००० | ३८ |
| लोंकरी सामान. | ८६७०००० | १६६००००० | ९० |

पहा या आंकड्यांवरून कसा आपला उद्योग अप्रत्यक्ष रीतीनें सुटत चालला आहे !

---

## आमच्या देशांतील उद्योगधंदे ठार बुडण्याचीं दुसरीं कारणें.

हा वेळपर्यंतच्या विवेचनावरून, आमच्या देशांतले उद्योगधंदे बसत चालले; फायदेशीर बाबी इतरांच्या हातीं गेल्या; आमच्या

त्यांस उपासमार येत चालली; वगैरे गोष्टी सर्वांस कळून चुकल्याच आहेत. आमच्या देशांतल्या उद्योगधंद्यांवर दुहेरी धाड– आंतून आणि बाहेरून अशी–येऊन पडली ! धंदे जास्त बुडत आहेत. आह्मांस लागणाऱ्या सर्व वस्तु बाहेरच्या देशांतून पुरविल्या जातात. शिवाय बाहेरच्या लोकांनीं येथें येऊन अजस्र कारखाने काढल्यामुळें टाकाटुकीनें चाललेल्या लहानसान धंद्यांला राम ह्मणावें लागतें; यामुळें सर्व धंदे अजीबात ठार बुडाले. असा भयंकर कहर आजपर्यंत पृथ्वीतलावरील कोणत्याच देशांत कधींच कोसळला नसेल. आमच्या दुर्धर कंगालगिरीचें आणि असह्य उपासमारीचें आदिबीज, या कलाकौशल्याच्या ठार बुडण्यांत आहे. तेव्हां कलाकौशल्य आणि उदीमधंदे ठार बुडण्याचें कारण, नीट शोधलें पाहिजे. आमच्या देशांतील कारागीर आळशी नसतो, उधळ्या नसतो, इतकेंच नव्हे, तर उलट पराकाष्ठेचा मेहनती, साहसी आणि कल्पक असतो. तथापि अनिवार्य अशा कैक अडचणी त्याच्यापुढें दत्त ह्मणून उभ्या असतात; आणि त्याजवर चोहोंकडून सारखा कहर कोसळतो.

**१ उद्योगधंद्यांची मनस्वी दाटी. २ सशास्त्रधंदेशिक्षणाचें अज्ञान. ३ भांडवलाच्या पुरवठ्याचा अभाव. ४ पत नसणें. ५ पद्धतशीर व शिस्तवार काम करण्याची संवय नसणें. ६ शिल्लक पाडण्याच्या व स्वतःच्या प्रयत्नासंबंधाच्या गैरसमजुती,** हींच कारणें आमच्या अनेक संकटसमूहांतलीं मुख्य होत.

१. कलाकौशल्याचा कामकरू मनुष्य आमच्या देशांतील उद्योगधंद्यास मुकतो. त्याचा उद्योग परदेशचे कारखानदार बळकाविताहेत. येथील लोकांच्या हातचे धंदे सुटतात ते परक्यांच्या घरांत शिरतात, यामुळें यांना उद्योग नाहींसा होतो.

वर्षांतून महिना महिनाभर हिंदुस्थानच्या कामकरूंस अजी कामच मिळत नाहीं. आणि जें थोडेंबहुत मिळतें तेंही अगदीं अपुरें! उद्योगधंदा करणारे पुरुष आमच्या देशांत एकंदर **सात कोटि वीस लाख** आहेत. त्यांपैकीं **४७ लाख ४१ हजार** लोक शहरांत राहतात. आपण घटकाभर या लोकांना भरपूर काम मिळतें आणि त्यांचा उदरनिर्वाह बरा चालतो असें समजूं; पण बाकी खेड्यांत राहणाऱ्या **सहा कोटि बहात्तर लाख ५९ हजार** लोकांची काय वाट? त्यांना उद्योगधंदा तरी कोणता? त्यांची साधारण स्थिति कशी असते? याचा अंदाज करितां यावा ह्मणून खेड्यापाड्यांतल्या धंदेवाल्या लोकांपैकीं फक्त पुरुषवर्गाची धंदेवारीनें संख्या खालीं दिली आहे.

| अनुक्रम. | धंदे. | संख्या. |
|---|---|---|
| **अ** | व्यापारउदमी. | ११३९००० |
| **ब** | कारागीर वगैरे. | ८२८८००० |
| **क** | नेआण करणारे. | १२९०००० |
| **ड** | मजूर. | ६५३९००० |
| **ए** | शेतकरी. | ५००२२००० |

आतां यापैकीं **अ** वर्गाकडे ह्मणजे उदमीवाल्यांकडे पाहिलें तर, त्यांस पुरें काम असतें आणि निर्वाहही चांगला होतो असें वाटतें. या देशांत लहानमोठीं एकंदर ७०८८०२ खेडीं आहेत. इतक्यांला ही इतकी व्यापारउदमी मंडळी ह्मणजे कांहीं जास्त नव्हे. दाटी कमीच आहे ह्मणावयाची. **ब** वर्ग ह्मणजे कारागीर यांस पाहिलें ह्मणजे त्या लोकांना पावसाळ्यांतले चार महिने कांहीं काम नसतें. बाकी आठ महिने तरी उद्योग चांगला मिळतो असें नाहीं; तरी **ब्याऐंशीं लाख** कामकरूंस आठ महिने काम मिळतें असें समजूं. **क** आणि **ड** वर्गांच्या लोकांचे

तर हाल कुत्रासुद्धां खाणार नाहीं. यांचा उद्योग सारा शेतकी-वरला. शेतकीचें काम फार फार तर ५।६ महिने चालणार. तें काम बंद पडलें कीं यांच्या पाठीस शिवरात्र आणि एकादशी लागलेली चुकत नाहीं. हे लोक **अठ्ठयाऐंशीं लाखांवर** आहेत, यांना सहा महिने उपासमार! बाकी उरला शेतकरीवर्ग. बागाईत असणाऱ्याला बारा महिने उद्योग असतो. बागाईत जमीन किती एकर आहे, याचे आंकडे नक्की मिळत नाहींत; तथापि 'इरिगेशन' खात्याचे आंकडे पाहिले ह्मणजे, **दोन कोटि चाळीस लाख** एकर जमीन बागाईत असावी. ह्मणजे **साठ** किंवा **सत्तर लाख** लोक बागाईत जमिनींत गुंतले आहेत आणि बाकीचे **४ कोटि ४० लाख** लोकांस जिराईत जमिनींत दिवस काढावे लागतात, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. सर **पील,** स्वानुभवावरून सांगतात कीं, जिराईत जमिनींत सालाचें दोनशें एकतीस दिवस काम असतें; तेव्हां बाकी एकशें चौतीस दिवस त्यांना उद्योग नाहींसा होतो. बाकीच्या दिवसांत कोठें गाडीवान होतात; कोठें मजूर बनतात. सगळ्या देशभर बैलगाड्या सुमारें **वीस एक लाख** असतील; आणि जास्त असल्या तर काम तरी त्यांना कोठून मिळणार आहे? बरें, हीं **वीस लाख** माणसेंही उद्योगांत आहेत असें समजूं. पण बाकी **चार कोटि वीस लाख** शेतकऱ्यांना १३४ दिवस किंवा **साडेचार** महिने सारखे निरुद्योगांत काढावे लागतात!

या सर्व हिशेबावरून पाहतां **आमच्या देशांत अडीच कोटि लोक वर्षभर निरुद्योगी असतात.** त्यांना उद्योग असा कांहींच नसतो. यावरून उद्योगधंद्यांत किती रिकामटेकडेपणा आमच्या देशांत भरला आहे हें कळून येईल. **अडीच कोटि** लोकांना उद्योग असता तर उत्पन्नाची बाब वाढती हें सांगणें नको. एकेक मनुष्य सालिना कमींत कमी चाळीस

रुपये मिळवितो ह्मटलें तरी ८२ कोटि रुपये बेरीज होते. ब्याऐशीं कोटि रुपये मिळावयाचे, ते काम नसल्यामुळें नाहींसे होतात. रक्कम थोडीथोडकी नव्हे. **ब्याऐशीं कोटि**! हिंदुस्थानसरकारच्या एकंदर उत्पन्नाच्या बरोबरीची! केवढें नुकसान हें? आणखी सालिना ब्याऐशीं कोटि रुपयांच्या नुकसानीवरच हें संकट भागतें असें नाहीं. थोड्या इतर धंद्यांत जी कांहीं बरीचशी किफाईत होण्याचा संभव आहे, तोही या रिकामटेकडेपणानें नाहींसा होतो. मिळविणाऱ्यांस रिकामटेकडी मंडळी पोसावी लागते. याशिवाय रिकामपणामुळें सुचणारे ढंग, जडणारीं व्यसनें इत्यादि निराळींच. हा इतका सारा परिणाम उद्योगधंद्यांत माजलेल्या **मनस्वी दाटीचा**.

२. दुसरी अडचण **सशास्त्र धंदेशिक्षणाचें अज्ञान**. या एका कारणामुळें आमच्या देशांतील कारागीर, प्रतिस्पर्धी धंदेवाल्यांच्या झटापटींत जमीनदोस्त होऊन पडतो. त्याच्या सभोंवतालच्या एकंदर देशांत कारागीर लोक झपाट्यानें पुढें पुढें जातात आणि हिंदुस्थानांतील बिचारा कारागीर जागच्या जागींच थबकून उभा राहिला आहे. या आपल्या अज्ञानामुळें निराश, निराश्रित होऊन उदासीनपणानें दुसऱ्याकडे पहात उभें राहण्याखेरीज त्याला दुसरा मार्गच नाहीं. हिंदुस्थानच्या शेतकऱ्यास शास्त्रशुद्ध शेतकी कळत नाहीं; आणि सुधारलेलीं आउतें इत्यादिकांचें त्याला साहाय्य मिळत नसतें; परंतु त्याला, शास्त्रीय शेतकी-ज्ञान आणि सुधारलेल्या आउतांची पूर्ण मदत अशा अमेरिकन आणि आस्त्रेलियन शेतकऱ्यांशीं भरबाजारांत सामना देणें भाग पडतें. त्याला एकपटीच्या ठिकाणीं दुप्पट पीक कसें आणितां येईल याची माहिती नसते, आणि त्याला कोणी शिकवीतही पण नाहींत. तीच स्थिति साळी, कोष्टी, कुंभार, लोहार इत्यादिकांची. त्यां-

चेंही अज्ञान भक्कम असतें. आमच्या कारागीर वगैरे मंडळीची शस्त्रास्त्रादि सामुग्री तूर्तच्या काळांत अगदीं निरुपयोगी व बोजड असें ठरलें आहे. आमचा नांगर, आमचा माग, आमचें किंकरें, आमचे घण इत्यादि सर्व वाईट, फाजील मेहेनतीचे आणि निरुपयोगी आहेत, असें स्पष्ट झालें आहे. तरी त्यांत सुधारणा करण्याचा प्रयत्न आजवर कोणींही कधींच केला नाहीं. हल्लीं जी उपासमार चालली आहे त्याचें कारण या अज्ञानाकडे कितपत आहे, याचा ठाम निर्णय करणें सोपें नाहीं; तथापि ही एक गोष्ट अगदीं निश्चित आहे कीं, उद्योगधंदे ठार होण्याला हें अज्ञान प्रबळ कारण आहे यांत तिळप्राय शंका नाहीं.

३. **भांडवलाच्या पुरवठ्याचा अभाव** हें तिसरें कारण आहे. भांडवल "तत्त्वमसि;" भांडवलाशिवाय एक पाऊल देखील पुढें पडावयाचें नाहीं आणि त्याचा तर भला दांडगा अभाव दिसतो. भांडवल अपुरें याचीं मुख्य कारणें दोन:—एक पैशाचा सांठाच अजी कमी; आणि दुसरें चांगलीशी पत नाहीं. भांडवल शिल्लक नाहीं याचीं कारणें पुनः अनेक आहेत. त्यांतलीं मुख्य मुख्य ह्मणजे (१) इंग्रजी राज्यापूर्वीची झोटिंगपाच्छाई, ना दौलतीचा ना जिवाचा भरवसा, लुटालूट आणि मारहाणी यांच्यापुढें व्यापार अजी ठार बुडाला. (२) इंग्रजी साम्राज्यांत परदेशाकडे चाललेला द्रव्याचा पूर हें दुसरें कारण. इ. स. १८३५ सालच्या सुमारास हिंदुस्थानांतून अवघे **दोन कोटि** रुपये विलायतेस जात असत, ते आतां १८८९ सालीं ह्मणजे चौपन्न वर्षांत **तीस कोटि** जाऊं लागले. आमच्या देशांतील एकंदर सरकारी वसुलाचा तिसरा हिस्सा, पार निघून सातांसमुद्रांपलीकडे चालता होतो. त्यांतली फुटकी कपर्दिकाही परत मिळत नाहीं. हें काय लहानसान नुकसान! ह्या अशा परदेशाकडे चाललेल्या

द्रव्याच्या पाटापुढें हिंदुस्थानदेशानें ह्मणूनच टिकाव धरिला! निरुपयोगी बाबतींत पैसा यथेच्छ उधळण्यासाठीं सालोसाल इंग्रजसरकार कर्ज काढीत आहे, हें मोठें आश्चर्य होय. मिळेल तितका पैसा या देशांतल्या कित्येक अवश्यक आणि उपयुक्त अशा बाबतींत खर्च व्हावयाला पाहिजे. देशांतील वसुलाची रकम उद्योगधंद्याच्या प्रसारार्थ खर्च केली तरी, आपोआप उत्पन्न वाढत जाईल, पण इतकी दृष्टि आमच्या सरकारची नाहीं. तत्काळ स्वदेशकल्याण त्यांच्या डोळ्यांपुढें दिसतें; (३) वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळें भांडवलाचा बराच फन्ना उडतो. गेल्या पन्नास वर्षांत दुष्काळानें अमूकच हानि झाली असे आंकडे—शास्त्रावरून सिद्ध करतां येणार नाहीं हें खरें आहे; पण दुष्काळामुळें कमींत कमी या इंग्रजी राज्यांत **चारशें कोटींचें** भांडवल तरी नाहींसें झालें असावें असा अंदाज आहे. आमच्यांतल्या शिलकेचें कमी प्रमाणाचें हें शेवटचें कारण आहे. आमच्या सरासरी उत्पन्नाचें आणि खर्चाचें प्रमाण पूर्वीं दिलें आहे, त्यावरून पाहतां आमची शिल्लक पडते ती फारच थोडी आहे. विलायत देशाची सालिना शिल्लक **१८ कोटि ४० लाख**, फ्रान्सची **१४ कोटि**, युनायटेड स्टेट्सची **२१ कोटि**, जर्मनीची **४० कोटि** अशी आहे; आणि आमचा हिंदुस्थान देश लोकसंख्येच्या मानानें विलायत, युनायटेड स्टेट्स, जर्मनी, फ्रान्स या सर्वांतल्या लोकसंख्येच्या बेरजेबरोबर आहे. तरी, पांच कोटि शिल्लक पाडतां पाडतां त्यांच्या नाकीं नव येतात. आतां आमची ही शिल्लक अशी भिकारडी कां, याचींही कारणें पुष्कळ आहेत; पण त्यांमध्यें आमची भिकार प्राप्ति हें पहिलें होय. विलायतकरांपेक्षां आमची प्राप्ति सरासरीनें वीसपट कमी आहे. विलायतकर वीस मिळवितात तर आह्मी एक. दुसरें कारण, कराच्या

बोज्यांमुळें आमची शिल्लक तुटत जाते हें होय. 'इन्कमट्याक्स' प्राप्तीवरील कर, ह्मणजे उद्योगी झाल्याबद्दलचें प्रायश्चित्त—स्थापतेवेळीं आमच्या सगळ्या देशाचें उत्पन्न **पांचशें चाळीस कोटि** असावें असा अजमास सरकारांनीं धरला होता. आमचे अवश्य खर्च कमींत कमी ४५० कोटि आहेत असें धरूं ह्मणजे बाकी ९० कोटि उरले; आणि या नव्वद कोटींवर सरकारचा पन्नास कोटि कर वसूल होतो. सरासरी खर्चाचा बोजा काय प्रमाणावर हें काढावयाचें तर, **निव्वळ उत्पन्नाचा** आंकडा धरावा, एकंदर उत्पन्न धरतां कामा नये; ह्मणून पन्नास कोटि रुपये, दरसाल सरकार कराच्या रूपानें आह्मांपासून घेतें, ते, नव्वद कोटींवर. नव्वद कोटि उत्पन्नाला पन्नास कोटि सरकारदेणें! सरकारकर जाऊन बाकी शिल्लक चाळीस कोटि राहिली. दुष्काळच्या वेळचें नुकसान यांतच भरून काढलें पाहिजे, तें सुमारें वीस कोटि धरूं, बाकी हातीं राहणार वीस कोटि. यानें भांडवलाची वृद्धि व्हावी कशी! (४) शिल्लक पाडण्याचीच आमच्या लोकांत तऱ्हा अकुंचित आहे हें चवथें कारण होय. शिल्लक पाडण्याची प्रबळ इच्छा आमच्यासारख्या कंगाल देशांत सहसा सांपडणें कठिण. इंग्रजी साम्राज्यांत, पुष्कळ प्रजा, तुरुंगांतल्या कैद्यांसारख्या कंगाल अन्नावर उदरनिर्वाह करीत आहे. अनिश्चित तरम जमाबंदी, पावसाची टाळाटाळ, यांमुळें शेतकरी बेजार होतो. परदेशस्थांची स्पर्धा, उद्योगधंद्यांचा अनिश्चय, भिकार मजुरी, यांपुढें कलाकौशल्यकारांचें कांहींएक चालत नाहीं. ओली कोरडी भाकर वेळेवर मिळवितां मिळवितां त्यांस पुरे पुरे होतें. मग शिलकेची गोष्ट कशाला विचारावी? शिल्लक थोडीबहुत पाडणारे ह्मणजे १ जमीनदार, तालुकदार, मालगुजार इत्यादि, दांडगी शेतकी असणारे; २ बडे सरकारी कामदार; ३ वकील,

डाक्तर इत्यादि धंदेवाले; ४ कुशल शिल्पी; ५ परदेशाचा व्यापार करणारे शेट; ६ सावकार, सराफ आणि बडे धंदेवाले व्यापारी हेच होत. इतरांस दमडी सुद्धां शिल्लक पाडतां येत नाहीं.

इंग्रजसरकारच्या साम्राज्यापूर्वीं असलेल्या बेवन्नगरी आणि छोटिंगपाच्छाई कारकीर्दींत उद्योगधंद्याला तेजी नसे, त्यामुळें ह्मणण्यासारखी सांपत्तिक समृद्धि झाली नाहीं. इंग्रजी राज्य सुरू झालें तों दिवसेंदिवस हिंदुस्थानांतल्या संपत्तीचा पाट इंग्लंडाकडे जोराजोरानें वाहूं लागला. रुप्याच्या भावांत चलविचल व सरकारी "पब्लिक वर्कस" खात्याचें विराट स्वरूप, यांमुळें या पाटाला बराच पूर येऊं लागला. आणि वारंवार एकामागून एक येणारे दुष्काळ, मुदलीं शिल्लकच थोडी राहील अशी आमची राहणी, इत्यादिकांमुळें, आमच्या देशांत अपार धनोत्पादक साधनें असूनही, आह्मांस, खांद्यावर दोनी हात आडवे तिडवे टाकून व डोळ्यांत प्राण धरून, स्वस्थ व हताश बसणें भाग पडत आहे! शिवाय आमच्या देशांत जें काय थोडेंबहुत भांडवल आहे, त्याचा उपयोग, कामकरू उद्योगधंदेवाल्यांस अगोदर होत नाहीं, आणि थोडाबहुत होतो त्यापासून या चढाओढीच्या दिवसांत तादृश फायदा होणें कठिण आहे! याचें कारण **पत** नाहीं.

४. **पतीचा अभाव** पिढीजाद आमच्यांत शिरल्यासारखा झाला आहे. ती **पत** उत्पन्न करण्याचे इलाज आजपर्यंत कोणीं योजिले नाहींत. ऋणको आणि धनको या अन्योन्यांस फायदेशीर होऊन परस्परांत सलोखा उत्पन्न होईल अशा **ब्यांका**–पेढ्या–युरोपखंडभर प्रत्येक देशांत आहेत. त्यांचा आमच्यांत पूर्ण अभाव दिसतो. सामाजिक भांडवलावर ठेव घेणाऱ्या व कर्जाऊ पैसे देणाऱ्या पद्धतशीर बड्या ब्यांका विलायतेकडे सर्वत्र आहेत; तशा आमच्यांत नाहींत. पूर्वीं एकटा एकटा सावकार असले उद्योग आ-

मच्या देशांत करीत असे; पण ते या चढाओढींच्या दिवसांत आपलें गांठोडें हळू हळू गुंडाळूं लागले आहेत. व्यापारी आणि शेतकरी यांना साहाय्य देणारे सावकार ह्मणजे ते भले मोठेच पाहिजेत, ते तर येथें मुदलींच नाहींत. थोडेंथोडें कोठें इकडे तिकडे भांडवल आहे, त्याचा उपयोग या देशाला काडीमात्र होत नाहीं. मोठ्या दगदगीनें चार दोन पैसे शिल्लक टाकणाऱ्यांस, उद्योगधंदेवाल्याच्या स्वाधीन आपला पैसा करून स्वतः फायदा कसा मिळवावा हें कळत नाहीं. आणखी चार पैसे वाळगून असणारांची व पैशाच्या गरजेमुळें उद्योगधंदे बंद टाकून उपासमार काढणाऱ्या लोकांची मुळीं दृष्टादृष्टच होत नाहीं. मग देणेंघेणें कोठलें ? सरकारच्या हुकमतीशिवाय किंवा मदतीखेरीज, ऋणको आणि धनको यांच्यांतली पत, आज कित्येक वर्षें उधळेपणाच्या संवयीमुळें, आह्मांला ह्मणण्यासारखी फायदेशीर झाली नाहीं. तूर्त आमच्या सरकारावर सर्वांचा मोठा दृढ विश्वास आहे; सरकाराला अनुकूलता चांगली आहे; सरकारची पत मोठी आहे; तेव्हां तूर्तच्या विपन्नावस्थेंत शिल्लक टाकणारे आणि पैशाचे गरजू अशा लोकांचा अन्योन्यसंबंध, आपण खातरजमा पतकरून किंवा थोडासा हातभार लावून जोडून घ्यावा, हें सरकारचें काम आहे. सरकारानें, निव्वळ आपल्या जातिबांधवांच्या चैनीखातर ह्मणून जमविलेल्या पैशांतली एक तनसडीसुद्धां आमच्याखातर खर्चावी असें आह्मी सांगत नाहीं. तर, थोड्याबहुत सवलती देऊन वसुलीच्या कामांत मदत केली किंवा आपल्याकडे येत असलेल्या ठेवीचा इकडे विनियोग केला ह्मणजे बस्स आहे. सरकारावर प्रजेचा फार विश्वास आहे, त्याचा फायदा त्यांनीं प्रजेलाच देणें अवश्य आहे. आजमित्तीला कमींत कमी, आणि शेंकडा चार किंवा साडेचार अशा भिकारड्या

व्याजावर, सरकाराजवळ आमच्या प्रजेनें, जवळ जवळ **तीस कोटि रुपयांच्या लहानमोठ्या ठेवी ठेविल्या आहेत!** सरकारानें ब्यांका स्थापिल्या त्यांत **पांच कोटींवर** रक्कम लोकांकडून येते. आणखी दागदागिन्यांत रक्कम किती तरी गुंतून पडली आहे. एक लेखक ह्मणतो "गेल्या त्रेपन्न वर्षांत सुमारें एकशें साठ कोटींचें सोनेरुपें आमच्या लोकांनीं घेतलें." ह्मणजे सरकाराकडे तीस कोटींच्या ठेवी, सेव्हिंग्स ब्यांकांतले पांच कोटि आणि दागदागिन्यांतले एकशें साठ कोटि किंवा सर्व मिळून सुमारें दोनशें कोटि झाले. याचा उपयोग उद्योगधंदेवाल्यांस कांहींएक नाहीं. इतकें भांडवल असून नसून सारखेंच; याचें कारण, सरकारची तटस्थवृत्ति व "रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति" हा मंत्र! हें भांडवल, सरकारास उद्योगधंद्यांत सहज घालतां आलें असतें. आपण जिम्मा पतकरून ठिकठिकाणीं ब्यांका उघडावयास लोकांना मदत व उत्तेजन द्यावयाचें होतें. आपणांवर विश्वास ठेवून लोक भराभर ठेवी ठेवतात, या त्यांच्या भलेपणाचा फायदा सरकारानें त्यांस दिला असता तर मोठी बहार उडती. लोकांनीं आपल्यावर विश्वास ठेविला तर त्या विश्वासाचें त्यांना फळ देणें भलेपणाचें लक्षण आहे. फक्त चार किंवा फार तर साडेचार टक्यांवर समजूत काढून सरकार स्वस्थ बसतें. रयतेनें आपल्या मतानें पस्तीस कोटींच्या ठेवी आपल्या स्वाधीन केल्या, तर, लोकांना ब्यांकेचा उद्योग काढावयास सांगून त्यावर आपली देखरेख ठेवावी व आपण हमी घ्यावी, असें सरकारास सहज करतां आलें असतें, नाहीं असें नाहीं. ह्मणजे तेवढ्या भांडवलाचा उद्योगधंद्यांत उपयोग होऊन पुष्कळांची उपासमार चुकती; नवीन नवीन धंदे उठते; थैल्यांत पडलेली लोकांची शिल्लक बाहेर येती;

आणि परंपरेनें सरकारचा फायदा 'इन्‌कमब्याक्सादिकांनीं' झाला असता. पण नाहीं; इतकी रयतेची कळकळ त्यांनीं आ-णावी कोठून? अशा रीतीनें या देशांतील उद्योगधंद्यांस साहाय्य दिलें तर आपल्या इंग्लंडच्या कारखान्यांची पोळी पिकावी कशी? पत ठार बुडाल्यामुळें, आमच्या देशांत, वीस चाळीस, केव्हां केव्हां पन्नास, शेंकडा व्याजाचा भाव होऊन बसला आहे. तेव्हां, असलें जबरें व्याज देऊन युरोपकरांच्या उद्योगधंद्यांशीं टक्कर द्यावयाची, हें युगांतरीं तरी साधेल काय? कधीं साधावयाचें नाहीं.

व्यापारी लोकांतल्या व्यापारी लोकांत शेंकडा सहापासून नऊ टक्के व्याजाचा दर असतो. इतरांना अठरांपासून चोवीसपंचवीस पर्यंत, आणि विणकर इत्यादि उद्योगवाल्यांस व शेतकऱ्यांस चोवीस, छत्तीस अगर शेंकडा चाळीस व्याजाखालीं रकमच मिळत नाहीं. मग उद्योगधंदे वाढणार तरी कसे? ऋणकोची पत नाहीं आणि वसुलीच्या कामांत अडथळे मनस्वी, त्यामुळें हा सारा प्रकार होतो. आमच्या देशांत व्याजाचे हे दर आहेत. आतां तेच परदेशांत कसे आहेत ते पहा.

| देश. | भांडवल. | व्याजाचे दर. |
|---|---|---|
| युनायटेड किंगडम् | ८४०००००००० रुपये | ३·२ शेंकडा. |
| फ्रान्स | २०५००००००० ,, | ३·९ ,, |
| जर्मनी | २८५०००००० ,, | ४·३ ,, |
| हालंड | २६०००००० ,, | ३·४ ,, |
| सर्व यूरोप | १८५२००००००० ,, | ३·७ ,, |
| हिंदुस्थान | ५०००००० ,, | १२·३६ ,, |

यावरून पाहतां व्याजाचे दर चोहोंकडे फार कमी आहेत. कमी व्याजानें मुबलक भांडवल मिळेल तरच उद्योगधंद्यांची बर-कत; नाहीं तर काय आहे? आणि उद्योगधंद्यांची बरकत असेल

तरच पोटाची काळजी दूर व्हावयाची. तेव्हां हलक्या व्याजानें भांडवल, कामकरू उद्योगधंदेवाल्यांस मिळेल तर थोडेबहुत उद्योग वाढतील; नाहीं तर एकेक धंदा दिवसेंदिवस बसतच जावयाचा.

५. आतां उद्योगधंदे ठार बुडण्याचें पांचवें कारण **पद्धतशीर व शिस्तवार काम करण्याची सवय नसणें** हें होय. युरोप, अमेरिका वगैरे खंडांतील कोणताही—उद्योगधंद्यांत श्रेष्ठता मिळविलेला—देश घ्या, त्यांत प्रत्येक धंद्याची आणि व्यापाऱ्यांची सभा आहे. कोणतें काम कसें करावें, कोणत्या अडचणी कशा दूर कराव्यात, काय उपायानें आपलें पाऊल पुढें टाकावें, कोणीकडे कसें पुढें सरकत जावें, याचा विचार करणारी एक मुख्य स्वतंत्र सभा व त्याच्या शाखा, ठिकठिकाणीं आहेत; तसें कांहीं आमच्याकडे नाहीं. एकेक व्यक्ति, आपापलें काम संभाळून फुरसत मिळाली, आणि अक्कल असली, तर इकडे तिकडे पाहणार. पूर्वीं पंचाइती व नगरशेट वगैरे व्यवस्था असे, ती आतां नष्ट होत चालली. अमदाबादेस व्यापारी मंडळींत एक प्रकारची अशी व्यवस्था होती, पण आतां दिवसेंदिवस अडाणी व अदूरदृष्टी संस्था सुद्धां मोडकळीस येत चालल्या. वर सांगितल्या प्रकारच्या व्यवस्था——ह्मणजे आपापल्या धंद्यासंबंधानें बारीक व दूरवर विचार करून उपयुक्त माहिती मिळविणारी, आपल्या हक्कांचें रक्षण करणारी, नवीन कल्पना वगैरे बसविणारी, स्वतंत्र सभा व तिच्या ठिकठिकाणीं शाखा—आमच्यांत नाहींत. याचा परिणाम बिचाऱ्या आमच्या व्यापाऱ्यांस आणि उद्योगधंदेवाल्यांस चांगला भोगावा लागतो. त्यांना आवश्यक इतकें ज्ञान नाहीं, पोंच नसतो, माहिती कळत नाहीं, आणि कळवून देणाऱ्या सभा वगैरे नाहींत, यामुळें त्यांची फार बुडणूक होऊन गेली, व होत आहे. आमच्या देशांतून

माल फार जाऊं लागला आणि परदेशाशीं आमचा व्यापार फार वाढला, तो सुमारें **तीनशें० कोटींचा** व्यापार आहे; पण त्यांचा फायदा अजमासें **तीस कोटि** सगळा परके खाऊन जातात. अशीच स्थिति देशांतल्या व्यापाराची. दिवसेंदिवस तो धंदा आमच्या हातांतून सुटूं लागला. देशावर मुख्य मुख्य व्यापाराचीं दुकानें व त्याच्या समुद्रकिनाऱ्यावर माल रवाना करणाऱ्या शाखा स्थापिल्या ह्मणजे आमच्या लोकांचें कल्याण बरेंच होईल. मध्यप्रांत, वायव्यप्रांत, पंजाब वगैरे ठिकाणांहून गळिताचीं धान्यें, गहूं व कापूस विलायतेस फार जातो. त्या ठिकाणीं खरेदी करणारे युरोपियन व्यापारी आहेत. ते मुख्य ठिकाणीं खरेदी करतात आणि बंदरीं पाठवून विलायतेस रवानगी करतात; ह्मणजे आमचा व्यापार हातांतून सुटत चालला. आमच्या लोकांनीं सामाईक भांडवलावर मुख्य ठिकाणीं खरेदीचीं दुकानें ठेविलीं, त्यांच्या शाखा बंदरोबंदरीं ठेविल्या, तरी पुष्कळ उद्योग मिळणार आहे; पण हा विचार कोणाच्या मनांत येत नाहीं. असा विचार भरविणें कोणास इष्ट दिसत नाहीं. बायकांचा पेहराव बदला, संभोगकालाची ईयत्ता ठरवा, ह्मणून कंठशोष करण्यांतच सर्व कृतार्थता वाटते! इलाज नाहीं. तसेंच आमच्या कलाकौशल्याचें. ह्मणजे उमदें व नक्शीदार काम आह्मीं तयार केलें तर युरोपियन व्यापाऱ्यांच्या भिस्तीवर त्याचा प्रसार आणि खप अवलंबून असावयाचा. **ओरिसा** प्रांतांत उत्तम प्रकारचें रुप्याचें जाळीदार काम आमचे लोक तयार करतात, पण तें काम इंग्रजी व्यापारावर अवलंबून! ह्मणजे तो माल घेऊन विलायतेस रवाना करणारे व त्या उद्योगधंद्यांतली मजुरी लोकांस देणारे विलायतकर व्यापारी. काश्मीरच्या शाली तयार करविण्यासाठीं अमृतसर वगैरे ठिकाणीं फ्रेंच आणि इंग्रज व्यापारी यांनीं दुकानें

घातलीं आहेत. सिंधचे कुंभार, अमदाबादचे सुतार, इंग्रज व्यापारी कंपन्या नौकरीस ठेवून माल तयार करवितात आणि विलायतेला पाठवितात. नकशीदार व सुबक काम करणारे आमचे लोक; पण त्यांना मजुरी देऊन तो माल आपण व्याव-याचा आणि सगळा नफा पटकावयाचा, तर तें काम इंग्रजी व्यापाऱ्यांचें. आह्मी डोळे मिटून बसतों. तसेंच सामाईक भांडवलावर उद्योग उठवावयाचें नांव सुद्धां आह्मांस माहीत नाहीं. नाहीं ह्मणावयाला मुंबई, कलकत्ता वगैरे ठिकाणीं कापूस, जूट वगैरेंच्या कांहीं गिरण्या चारदोन निघाल्या आहेत. विलायतेंतील ल्यांकाशायर परगण्यांत कापसाच्या गिरण्यांत **तीनशें कोटि भांडवल** गुंतलें आहे आणि आमच्या देशांतील सर्व गिरण्यांत दहा कोटींचें सुद्धां नाहीं. ग्रेटब्रिटनांत वीस वर्षांत (१८६२–८२) **वीस हजार** सामाईक भांडवलाच्या नवीन मंडळ्या स्थापिल्या. तो देश फार फार तर मुंबईइलाख्यायेवढा. त्या कंपन्यांत **दोन हजार तीनशें पंचवीस कोटि भांडवल गुंतविलें गेलें**! ही येवढी एकच गोष्ट, आमच्या देशांत सामाईक भांडवलाची, आणि व्यवस्थेशीर व शिस्तवार काम करण्याची पद्धत आह्मांस मुदलीं माहीतच नाहीं, हें सिद्ध करण्यास पुरे आहे. उद्योग उभारला कीं त्यांत लागल्या वांटण्यांवर वांटण्या व्हावयाला. भांडवल जास्त घालावयाचें नाहीं; उद्योग वाढावयाचा नाहीं; सुधारणा करावयाची नाहीं; नवीन कल्पना, नवीन शोध यांचा उपयोग करून घ्यावयाचा नाहीं; ही आमची उद्योगधंद्याची पद्धत. हींत अजूनही सुधारणा होईल तर बरें, नाहीं तर अखेरची नाडी लागलीच मरावयाला ह्मणून समजावें.

आणखी एक मोठें असें कारण आतां सांगावयाचें उरलें आहे. निराश स्थितींत पूर्ण हतवीर्य करून सोडणारी ताकद व हिम्मत यांचा

अभाव होय. **हिंमत व ताकद** आमच्या कामकरू लोकांत आतां बिलकूल उरली नाहीं. त्यांची हल्लींची स्थिति पाहिली ह्मणजे सहृदय मनुष्याच्या डोळ्यांतून पाणी आल्याशिवाय राहणें कठिण ! हायरे बिचाऱ्या आमच्या देशांतील कारागिरा ! तुझी कोण ही दशा झाली ! परदेशच्या कारागिरांच्या टकरीसरशीं घाबऱ्या घाबऱ्या इकडे तिकडे पळत सुटलास; पण तुझें मायबाप सरकार इकडून तिकडे तुला अडवीत सुटलें, आणि कित्येक तुझे धंदे पटकावून घेऊं लागलें, यामुळें तुझी ही निराश दैना पाहून बघणाराच्या पोटांत सुद्धां भडभडतें ! आमच्या सरकारानें राजवेत्र हातीं धरला, तेवढ्यावरच त्यांची तृप्ति नाहीं. उद्योगधंदे करावे असें त्यांस वाटतें. पोस्टल ब्यांका ठेवून व मनीआर्डरींची पद्धत सुरू करून सरकारानें सावकारी पेढीचा व्यापार आटला. सरकारी कारखाने, शाळा, काढून सुतारी, लोहारी चालविली. तगाईच्या पद्धतीनें व्याजबट्टा सुरू ठेवला. लांकूडफांटा विकण्याचें आणि बुकें छापून विकण्याचें सुद्धां काम त्यांनीं पतकरिलें आहे. आणखी आमच्या सरकाराचें विराटस्वरूपी दांडग्या खर्चाचें "पब्लिक वर्क्स" खातें पाहिलें ह्मणजे अशाच प्रकारचे दुसरे पुष्कळ प्रश्न सुचतात. गेल्या चाळीस वर्षांत **एकशें ऐशीं कोटि रुपये रेल्वेकरितां, एकशें सत्तर** इतर इंजनेरी **काम व चाळीस कोटि इरिगेशन**कडे, असे **तीनशें नव्वद कोटि रुपये** सरकारानें खर्चिले; पण त्यांपासून हिंदुस्थानच्या लोकांस औद्योगिक हिंमत किंवा स्वतंत्र काम करण्याची धमक उत्पन्न केली किंवा करण्याचा प्रयत्न स्वप्नांत तरी कधीं केला आहे काय ? हीं कामें पार पडलीं, पैसा खर्चला, इंजिनियर वगैरे लोकांस लक्ष्मीची प्राप्ति करून दिली, पण त्यापासून आमच्या लोकांस काय कळलें ? 'प्ल्यान' सरकारानें तयार केला,

खर्च सरकारांतून चालला, देखरेख सरकारांतून झाली, तीं कामें लोकांच्या डोळ्यांपुढें आहेत, पण त्याचा परिणाम आह्मां हिंदुस्थानवासी रयतेवर काय झाला ? वास्तविक पाहतां आमच्या लोकांस बोलावून त्यांतील काम करण्याची, देखरेख करण्याची वगैरे माहिती देणें सरकारचें काम होतें, पण तसें कांहीं त्यांनीं केलें नाहीं. परक्यांच्या हातून, परक्यांच्या कौशल्यावर, परक्यांच्या देखरेखीखालीं पण आमच्या पैशावर सरकारानें तीं कामें करविलीं यामुळें आह्मांला आमच्या दारिद्र्याचे फारच चटके बसूं लागले. आमच्या देशांतील कारागिरांस स्वतंत्र, उमेदीची आणि शक्तिवर्धक हवा कशी ती श्वासोच्छ्वासास मिळतच नाहीं, आणि परक्या कारागिरांशीं टक्कर देण्याची हिंमतच माझी नाहीं ह्मणून तो हातपाय गाळून बसकण घेईल किंवा चींचीं करीत पळत सुटेल तर त्यांत त्याचा फारसा दोष नाहीं. काय कारणें असतील तीं असोत, आमच्या कारागिरांच्या पोटांत एक धास्ती बसलेलीच, कीं, माझा कांहीं या परदेशच्या कारागिरांपुढें निभाव लागावयाचा नाहीं. आमचा कारागीर डोळ्यांतून टपाटपा टिपें गाळीत, निराश, निरुत्साही व निरुद्योगी असा होऊन बसतो आणि दुसऱ्या देशांतले येथें येतात ते पुऱ्या उमेदीचे, मोठे उल्हासी आणि पुढें पुढें करीत जाणारे आनंदी असे दिसतात. आमच्या कारागिरांतलीं जी ही निरुत्साही व नाउमेदीची स्थिति सर्वत्र दिसते तीमुळें आमच्या देशाचें काय नुकसान होतें याचा अंदाजच करतां यावयाचा नाहीं.

---

## शेतकी.

आमच्या देशांतील **वीस कोटि** लोक शेतकीवर निर्वाह करीत आहेत. कारण त्यांना दुसरे धंदे उरलेलेच नाहींत. शे-

तर्कीवर उदरनिर्वाह करणाऱ्यांचीही संख्या अशीच दिवसेंदिवस वाढतच जाणार. परंतु दुर्दैव आमचें कीं, हा धंदा अतिशय नीचावस्थेंत आहे. जमीन निस्सत्व होत चालली; उत्पन्न भिकारडें येऊं लागलें; सर रिचर्ड टेंपल साहेब ह्मणतात "इंग्लंडांत दरएकरीं एकतीस बुशीलें धान्य पिकतें तेंच हिंदुस्थानांत एकरीं दहा बुशील पडतां पडतां मारामार." इंग्लंडाच्या शंभर पटीनें आमची जमीन सुपीक आणि उत्पन्न हें असें भिकारडें ! अनिश्चित व जबर सारा सरकार चापून घेतें. बहुतेक शेतकरी भयंकर कर्जभरू आहेत. त्यांच्या अज्ञानाची तर अगदीं कमाल होऊन गेली आहे. सर बेअरींग साहेबांच्या मतें आमच्या शेतकऱ्यांचें सरासरी उत्पन्न **दरसाल** दरमाणशीं अवघे **अठरा** रुपये. मुंबई इलाख्यांत दरमाणशीं दरसाल वीस रुपये आणि वायव्य प्रांतांत पंधरा रुपये !

आमच्या शेतकऱ्यांपाशीं पुरेशीं आउतांचीं अगोदर जनावरेंच नाहींत. मद्रास इलाख्यांत दर **अठरा एकरां**ला एक **बैलजोडी पडते.** मुंबई इलाख्यांत २७ एकरांला एक बैलजोडी आणि सर्व हिंदुस्थानची सरासरी ह्मणजे १३ एकरांला २ बैल!! **एक कोटि ऐंशी लाखांचीं** जनावरें आमच्या देशांतून नाहींशीं होतात. एक कोटीचीं रोगराईनें, **पन्नास लाख उपासमारीनें** आणि **पसतीस लाख** खाटकांच्या सुरीखालीं दरसाल मरतात. **एकोणीस कोटि सत्तर लाख** एकर जमीन आणि **वीस कोटि शेतकरी** असून ही स्थिति ! ! कांहींएक बोलतांच येत नाहीं.

प्रांतवारीनें शेतकऱ्याच्या उत्पन्नाची स्थिति सरकारी कामदारानें सरकारापुढें ठेविली ती खालीलप्रमाणें आहे.

---

१ बुशील ह्मणजे मुंबईचे दोन मण.

| | | | रु० | आ० | पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ मुंबई इलाखा.—दरमाणशीं दरसाल. | | | २० | १४ | ५ |
| २ मध्यप्रांत. | ,, | ,, | २० | ३ | ४ |
| ३ मद्रास. | ,, | ,, | १७ | ४ | ९ |
| ४ बंगाल. | ,, | ,, | १५ | १ | ७ |
| ५ पंजाब. | ,, | ,, | १७ | ४ | ९ |
| ६ वायव्यप्रांत. | ,, | ,, | १४ | १२ | ९ |

हें आमच्या शेतकऱ्यांचें उत्पन्न. १ फारेष्टखातें, २ सरकारचा जबर सारा, ३ गुरांचा स्वाहाकार, ४ पावसाची टंगळमंगळ, ५ पूर्ण अज्ञान, ६ कर्जाचा बोजा, ७ कसदार अन्नाचा अभाव आणि अर्ध्या शहाण्या लोकांचें तिकडे दुर्लक्ष, ही आमच्या शेतकीची साडेसाती होय!

तूपलोणी सुद्धां आह्मांला आतां परदेशांतून आणवावें लागतें, ह्मणजे याला ह्मणावें तरी काय? व्यापारी रिपोर्टावरून परदेशांतून आमच्या देशांत आलेल्या तुपालोण्याचा हिशेब खालीं देतों, त्यावरून काय वाटेल तें पाहावें.

| | १८८५ सालीं. | १८८९ सालीं. |
|---|---|---|
| तूप | ६८१७३२ रु. | १०१३४६२ रु. |
| लोणी | १६५३३५ ,, | ३००६८६ ,, |

आह्मांला तूपलोणी सुद्धां परदेशांतून आणविलें पाहिजे !! नशीब, दुसरें काय?

याजपेक्षां शेतकीबद्दल येथें जास्त सांगण्यांत अर्थ नाहीं. एवढ्यावरूनच चांगली कल्पना येईल.

**नौकरी.** आपल्या देशांत कोणती नौकरी करणार किती लोक

आहेत याचें प्रमाण मात्र १८८१ सालच्या खानेसुमारीवरून खालीलप्रमाणें निघत आहे.

| | |
|---|---|
| इंग्रजसरकारचे नौकर.[१] | ५८६५१०. |
| म्युनिसिपल, लोकलबोर्ड वगैरेचे ,, | ८०९१४३. |
| एतद्देशीय संस्थानिकांचे कामदार नौकर. | १३४१५०. |
| लष्करी नौकर. ( शिपाई, नाईक इ. ) | ३१२७००. |
| आरमार. | ३००. |
| मास्तर. ( पंतोजी. ) | १७०७६१. |

आतां या नौकऱ्यांच्या संबंधानें खुद्द आमच्या लोकांची कशी काय स्थिति आहे याचा विचार केला पाहिजे. पण त्यापूर्वी हीही एक गोष्ट विसरतां कामा नये ती ही कीं, इतर बाबींप्रमाणें या नौकरीच्या बाबींतही मायबाप सरकार पंक्तिप्रपंच करितें. आमच्या लोकांस सवतीच्या पोराप्रमाणें लेखून सर्व धन आपल्या लोकांची —गोऱ्यासाहेबांची—करितें आणि करितें ती करतें आणि तसें करणार नाहीं अशीं मोठमोठालीं वचनें, लेखी व तोंडीं, देऊन!! तें असो. त्या संबंधानें बोलण्याची किंवा उहापोह करण्याची ही जागा नव्हे. सबब नौकरीच्या बाबतींत आमच्या लोकांच्या हातीं करटी पडून खोबऱ्याची खिरापत कशी अचुक गोऱ्यांच्या हातीं पडते हें चांगलें कळण्यासाठीं खालील माहिती जोडिली आहे. ती देण्याचा उद्देश त्या बाबतींत कशी काय आमची हाल अहवाल आहे हें चांगलें कळून यावें हा होय!

**सरकार देतें त्या पगारांची वांटणी जातवारीनें कशी आहे याचें प्रमाणः—**

---

१ यांत शिपाई, पटेवाले, गडी वगैरे येत नाहींत.

| दरसाल पगार. | जातवारी. | | |
|---|---|---|---|
| | अस्सल इंग्रज. | हाफ् कॅस्ट इं० | आमचे लोक. |
| ८० हजारापेक्षां ज्यास्त. | १२ लोक. | कोणी नाहीं. | कोणी नाहीं !! |
| ६० ,, ,, | ८ ,, | | |
| ५० ,, ,, | २४ ,, | | |
| ४० ,, ,, | ४७ ,, | | |
| ३० ,, ,, | १३५ ,, | | |
| २० ,, ,, | ३६० ,, | २ | |
| १० ,, ,, | १०५२ ,, | १८ | ५८ |
| ५ ,, ,, | २०३६ ,, | १३९ | ३०३ |
| २ ,, ,, | १३६६ ,, | ३३५ | १२८६ |
| १ हजारापेक्षां जास्त. | १८८७ ,, | १०२१ | ५९५४ |

अगर **सहा हजार नऊशें सत्तावीस** गोऱ्या कामदारांना दरसाल ७ कोटि ३३ लाख ६८ हजार रुपये दरसाल पगारादाखल मिळतात! तेंच प्रमाण आमच्या लोकांकडे लाविलें ह्मणजे **सात हजार सहाशें** लोकांना २४ लाख ८३ हजार रुपये मिळवितां मिळवितां मारामार पडते.

आमच्या देशांतून **वीस कोटि रुपये,** पगार पेनशन वगैरे बद्दल विलायतेला **दरसाल** रवाना होतात. हिंदुस्थान देशावर इंग्लंड खुशाल चरत आहे, आणखी काय?

जास्त आंकडे मांडण्यांत अर्थ कांहींएक नाहीं. नौकरीसंबंधानें आमच्या लोकांस खुला दरवाजा ह्मणजे **पंचप्राणात्मक** देहविक्रीला दरमहा **१२** रुपयांपासून सुरुवात व्हावयाची ती फार फार तर हजारावर येऊन ठेपली ह्मणजे शिकस्त झाली! असा प्रकार आहे.

## सूचना.

पहिला भाग देशबंधूंस सादर केला आहे. दुसऱ्या भागांत व्यापार, शेतकी, कलाकौशल्य आणि विद्याव्यासंग या चारींचें संपूर्ण विवेचन करण्यांत येईल.

धनुर्धारी.

मुंबईः–जावजी दादाजी यांच्या "निर्णयसागर" छा. छा.